भारत परिचय पुस्तक माला : : : : ५

# राजस्थान

लेखक :
पं. महादेवशास्त्री जोशी

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

REFBK-0013667
REFBK-0013667

मूल्य तीन रुपये

# ाजस्थान

ग्र. सं. ठाणे
प्र-प्रवास
332



ी जोशी

REFBK-0013667



# रा ज स्था न

# राजस्थान

क्र. १३२६७

लेखक :
पं. महादेवशास्त्री जोशी

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

मूल्य तीन रुपये

प्रकाशिका
सौ. सुधा जोशी
ज्ञानराज प्रकाशन,
४२१, शनिवार पेठ
पुणें २.

●

ठसे
ब. शं. दाते
कलाभुवन,
पुणें २.

●

अंतर्गत सजावट
सुधाकर खासगीवाले
दत्ता महाबळेश्वरकर

●

मुखपृष्ठ
सुधाकर खासगीवाले

●


सर्व हक्क लेखकाधीन.

●

प्रकाशन
दत्तयजंति
शके १८८५
३० नोव्हेंबर १९६३

●


मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ, पुणें २.


राजस्थान
रस्ता
नदी
मीटर गेज [रेल्वे]
ब्रॉड गेज [रेल्वे]
आंतरराष्ट्रीय सरहद
राज्याची सीमा

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | मरुभूमि राजस्थान | १ |
| २ | वीरपरंपरा | १४ |
| ३ | भाट-चारण | ४१ |
| ४ | भाषा व साहित्य | ५७ |
| ५ | संस्कृतीचे धागेदोरे | ६७ |
| ६ | स्थलयात्रा | ९१ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
७३६६७
अनुक्रम ३६६८० वि: भूगोल
क्रमांक ३३२ नों: दि: १६।१।६४



# मरुभूमि राजस्थान

राजस्थानचें विहंगम दर्शन घ्यावयाचें असेल तर अरवली पर्वताच्या शिखरावर जाऊन उभें राहायला हवें. सह्याद्रि हा जसा महाराष्ट्राचा कणा मानतात तसाच अरवली हा राजस्थानचा मानदंड समजतात. सह्याद्रीनें कोंकण अन् देश असे महाराष्ट्राचे दोन भाग पाडले, त्याचप्रमाणें अरवलीनेहि मारवाड आणि मेवाड असे राजस्थानाचे दोन प्रमुख विभाग बनवले आहेत. त्यांपैकी मारवाड येतें अरवलीच्या पश्चिमेला अन् मेवाड येतें पूर्वेला.

दक्षिणेच्या अंगाने या अरवलीचें एक टोक विंध्य पर्वताच्या कुशींत घुसलें आहे. तिथूनच माळव्याचा प्रदेश सुरू होतो. तिथून उत्तरेला आकाशाचा वेध घेऊं पाहणारीं अरवलीचीं एकाहून एक उंच शिखरें आक्रमावीं लागतात. पहिलें प्रमुख शिखर भेटतें तें अबूच्या पहाडावरचें 'गुरुशिखर.' तिथून उत्तरेला अजमेरपर्यंत अरवलीची कक्षा जाऊन भिडते. तिथून पुढे तो पर्वत अलवारच्या प्रदेशांत आपल्या अनेक भुजा पसरून बसतो.

अरवलीची उंची सुमारें साडेपांच हजार फूट आहे. हा गिरिराज साधासुधा नसून दुर्गम आहे. त्याला अनेक खिंडी अन् खिंडारें आहेत. उभेच्या उभे

तुटलेले उंच कडे जागोजाग उभे आहेत. उंच कडे तशा पाताळाला भिडणाऱ्या खोल गुहा आणि या सर्व दुर्गमतेच्या भरीला दाट जंगल! त्याची ही भव्यता आणि दुर्गमता, तसेच त्याचें सौंदर्य आणि वैचित्र्य पाहून कर्नल टॉड या पाश्चात्य पंडिताने 'हिंदुस्थानचा ॲपेनाइन' म्हणून त्याला गौरविलें आहे.

पण सांगण्याजोगी गोष्ट ही, की राजपूत वीरांनी अरवलीची ही दुर्लंघ्यता कःपदार्थ मानली. इतिहासकालांत त्यांनी अरवलीचा कानाकोपरा धांडोळून काढला आहे. त्याच्या अनेक शिखरांवर अन् खिंडीच्या तोंडावर त्यांनी गड उभारून ठेवले आहेत. जागोजाग मंदिरें अन् मठहि उभारले आहेत. अरवलीच्या दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेऊनच ते यवन आक्रमकांशीं लढले आहेत. तिथल्या शिळेशिळेवर त्यांनी आपल्या पराक्रमाचे अन् बलिदानाचे अभिलेख खोदले आहेत. त्यामुळे अरवली म्हणजे राजपुतांच्या स्वातंत्र्यप्रीतीचें चिरस्थायी प्रतीक ठरलें आहे.

पूर्वेस चंबळ आणि यमुना यांचा संगम, पश्चिमेस सिंधु नदी, दक्षिणेस अगस्त्याने नमवलेला विंध्य पर्वत आणि उत्तरेस सतलुज नदी अशा चतुःसीमांत राजस्थान मांडलें आहे. या एकंदर प्रदेशाचें क्षेत्रफळ साडेतीन लक्ष चौरस मैल एवढें भरतें. अरवलीचा अडसर मधे उभा झाल्यामुळे राजस्थानचे दोन विभाग पडतात, हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळे आणखीहि कांही भौगोलिक वैषम्य निर्माण होतें. पूर्व विभाग क्षेत्रफळाने लहान असून पश्चिम विभाग त्याच्याहून दुपटीपेक्षाहि मोठा आहे.

जोधपूर, बिकानेर, जेसलमीर हीं शहरें आणि त्यांच्या आसपासचा प्रदेश पश्चिम विभागांत येतो. यालाच मारवाड अशी संज्ञा आहे. यालाच प्राचीन काळी मरुभूमि किंवा मरुकांतार म्हणत. काशिका या व्याकरणग्रंथाने मारवाडचें नांव पुरातन काळी 'धन्व' असें होतें असें सांगितलें आहे व 'धन्वशब्दो मरुदेशवचनः' असा त्याचा खुलासा दिला आहे. सिंधु प्रदेशांतून मरुभूमि पार करून अलीकडे आलेल्या व्यापारी मालाला त्या काळी 'पारे धन्वक' म्हणत.

कोण्या अज्ञात काळीं आजच्या या मरुभूमींत निळा दरिया हेलावत होता. हा सारा रेगिस्तानचा प्रदेश त्या काळीं खाऱ्या पाण्याखाली होता. पण त्या

सागराच्या तळाशीं कांहीतरी भौम उत्पात होऊन ती भूमि सगळीच्या सगळी वर उचलली गेली. त्यामुळे आपोआप तिथला समुद्र हटला आणि त्याचें सगळें पाणी घळाघळा वाहत पश्चिम सागराला जाऊन मिळालें. जाग्यावर उरली ती फक्त वाळू! ती रेतीच पण त्या भागांतली जमीन झाली. आजहि त्या प्रदेशांत शंख, शिंपले, सांगाडे वगैरे समुद्राच्या समीक्षा मिळतात. या रेताड प्रदेशांत कांही पिकत नाही अन् फुलत नाही. त्यांतून पावसाचाहि दुष्काळच. जेमतेम पांच इंच पाऊस पडला की डोक्यावरून पाणी गेलें.

अरवलीच्या या पश्चिम अंगाला लहान मोठ्या नद्या बऱ्याच आहेत. लूणी आहे, जावी आहे अन् अशा कितीतरी! पण त्या सगळ्या लूणी नदीला क्षेम देतात आणि लूणी आपली सारी जलसंपदा कच्छच्या मोठ्या रणांत नेऊन भूमिगत करते. या साऱ्या नद्यांचें पाणी मारवाडला डोळ्यांना लावायलाहि भेटत नाही.

पूर्वेची परिस्थिति याच्या उलट आहे. तिकडे जलसंपत्तीचे अतूट ओघ वाहतांना दिसतात. तें मेवाडची भूमि भिजवून आणि समृद्ध करून मगच आपलें समुद्राचें निर्वाण गाठतात. चंबळ अन् बेतवा या तर पूर्व भागांतल्या महानद्याच होत. यांशिवाय बनास, खारी, दायी अशा आणखी कितीतरी सरितांचें पाणी मेवाडची भूमि प्राशन करते. त्यामुळे राजस्थानच्या या भागांत पाण्याचा दुष्काळ नाही. या भागांत मोठमोठीं सरोवरेंहि विपुल आहेत. त्यामुळे 'राजस्थान म्हणजे निपाणी प्रदेश' अशी कल्पना उराशीं बाळगून या भागांत आधी प्रवास करणाऱ्याची मोठी गोड फसवणूक होते.

चंबळचें पौराणिक नांव आहे चर्मण्वती! या नांवाचा चर्माशीं म्हणजे चामड्याशीं संबंध दिसतो, तोहि पौराणिकच आहे. रंतिदेव नांवाच्या एका थोर राजाने या नदीच्या तीरावर इतके बहुसंख्य यज्ञ केले, की त्यांत हनन झालेल्या पशूंच्या चर्मांचे ढीगच्या ढीग या नदीच्या काठीं पडले. त्यामुळे लोक हिला चर्मण्वती म्हणूं लागले. त्यापूर्वीचें तिचें नांव काय होतें, देवाला ठाऊक! चर्मण्वतीचेंच पुढे अपभ्रंशानें बनलें चंबळ.

चंबळ ही विंध्यकन्या आहे. महूजवळच्या जानापाव गावीं हिचा उगम होतो. ही सहाशे मैलांचा प्रवास करून सागराला भेटते. त्यापैकी राजस्थानाच्या वाट्याला आलेला तिचा प्रवास १२० मैलांचा आहे. तिथून ती पुन्हा तोंड

वळवते अन् इटाव्याजवळ यमुनेशीं संगति करते. आजवर इतर अनेक लहान मोठ्या नद्यांप्रमाणे हिचेंहि पाणी नुसतें वाहून जात होतें. तीरस्थ लोकांना तिचा उपयोग होत होता; पण तो अगदीच मर्यादित. केवळ स्थान-पानापुरता!

पण भारताचें भाग्यचक्र प्रगतीच्या दिशेने फिरूं लागलें आणि कोण्या शोधक अन् योजक माणसाला स्फुरलें, की 'चंबळचें हें फुकट वाहून जाणारें पाणी कुठे तरी अडवलें तर!'......तर मग केवढा तरी गोडया पाण्याचा एक सागरच आपल्याला निर्माण करतां येईल. मग त्या पाण्यावर राजस्थानांतल्या चिरतृषित भूमीला 'जीवन' दान देतां येईल. थाडीथोडकी नव्हे; तर १४ लक्ष एकर जमीन पाण्याने भिजवतां येईल. राजस्थानांतल्या गावागावांतून, घराघरांतून वीजहि खेळवतां येईल. शेतीला पाणी अन् घरांत विद्युत्प्रकाश! एवढें मिळालें, तर त्यांतूनच आणखी कितीतरी मिळवतां येईल. चंबळ म्हणजे 'चंगळ होईल नुसती......'

आणि आज ती कल्पना हवेंत न राहतां प्रत्यक्षांत अवतीर्ण झाली आहे. आज चंबळवर बांधलेल्या धरणाने जो प्रचंड जलसाठा निर्माण झाला आहे, त्याला नांव दिलें आहे गांधीसागर. आजवरच्या मानवनिर्मित सर्व सरोवरांत हा गांधीसागर अति महान् आहे. चौरासीगढ या किल्ल्याजवळ उभारलें गेलेलें हें धरण आता सुफळ संपूर्ण झालें आहे. चंबळवर अशीं एकूण तीन धरणें बांधलीं जाणार आहेत. चंबळवरच्या या धरण योजना म्हणजे तें राजस्थानाला एक शाश्वत वरदानच ठरणार आहे.

या प्रदेशांतल्या बहुतेक साऱ्या जातीजमाती जवळून किंवा दुरून राजपुतांशीं आपला संबंध जोडतात. 'राजपूत' या एकाच सामान्य नामाने त्या समस्त प्रदेशाच्या मानवगणाचें ग्रहण होऊं शकतें. पूर्वी या प्रदेशाला 'राजपुताना' म्हणत. आज 'राजस्थान' म्हणतात. दोहोंचाहि अर्थ एकच! पण या दोन शब्दांच्यामध्ये आणखी एक शब्द होता तो म्हणजे 'रायथान' त्याचेंच पुढें राजस्थान असें रूपांतर झालें. ज्या प्रदेशावर राजपुतांचीं राज्यें उगवलीं, मावळलीं, तो प्रदेश म्हणजे राजस्थान. पौराणिक काळांत यालाच 'पारियात्र मंडळ' असें म्हणत.

राजस्थानाचा दक्षिण सीमान्त, गुजरातचा रेवाकाठ, आणि त्याच्याहि वर भोपाळपर्यंत पूर्वपश्चिम पसरलेली एक तिहेरी पर्वतमालिका आहे. नर्मदेने या पर्वतश्रेणीचा भांग पाडला आहे. नर्मदेच्या उत्तरेस असलेल्या पहाडी मुलखाचें प्राचीन नांव 'पारियात्र' होतें, दक्षिण अंगाच्या पर्वतराजीला 'ऋक्ष' म्हणत. ऋक्ष पर्वतालाच हल्ली सातपुडा म्हणतात. पारियात्र आणि ऋक्ष या दोहोंच्यामध्ये आजचा निमाड प्रदेश पडतो. हा सर्व जनवनविभाग आजहि एक विशिष्ट सांस्कृतिक साधर्म्य बाळगून राहिलेला आहे. या सर्व प्रदेशाचा मनःपिंड एकाच कोणत्या तरी तत्त्वाचा बनला आहे, असें प्रत्ययाला येतें.

लाखांच्या गोष्टी आपण सोडून देऊं; पण चारपांच हजार वर्षांपूर्वीच्या इथे वावरणाऱ्या माणसाच्या समीक्षा आज मिळाल्या आहेत. चंबळ खोऱ्यांत आणि चितोडजवळ मध्याश्मयुगीन मानवासंबंधीचे अवशेष सापडले आहेत. मध्य अश्मयुगांत राजस्थानाच्या मरुभूमींत कोणता तरी मानवसमाज वस्ती करून राहिला होता. त्याचींहि कांही चिन्हें सांप्रत गवसलीं आहेत. लूनी नदीच्या पात्रानेहि त्या मानवांच्या कांही वस्तु मातीखाली राखून ठेवल्या आहेत.

आहाड म्हणजे पूर्वीचें आघाटपुर. आहाड नदी उदेपूर भागांतल्या ज्या टेकड्यांमधून वाहते तिच्या काठीं हें नगर वसलें होतें. तें वसवणारा मानवसमाज वर उल्लेखिलेल्या मरुभूमींतल्या मानवांहून वेगळा होता. तो वरच्यापेक्षा अधिक सुसंस्कृतहि होता. बाहेरून कुठून तरी येऊन तो इथला वस्तीकर झाला असावा. या मानवसमूहाचा आहाडवसनाचा काळ किमान चार हजार वर्षांमागे जातो. आजचे विंध्य-सातपुड्यांतले भिल्ल हे याच लोकांचे वंशज असावे असें म्हणतात.

या लोकांनी आहाडच्या काठीं निर्मिलेली जीवनसामग्री आहाड संस्कृति म्हणून ओळखली जाते. उत्खननांत त्यांच्या वापरांतलीं नाना प्रकारचीं मृत्तिकापात्रें हातीं लागलीं आहेत. तीं भांडीं अंतर्बाह्य सुबक आहेत. त्यांवर रेषा आणि बिंदु यांची कलाकारी आहे. आहाडी लोक सामान्यपणे दरिद्रीच होते असें म्हणायला हवें. पण तरीहि त्यांची अभिरुचि परिष्कृत होती. ते दगडी पायांवर विटांचीं घरें बांधीत. तीं कलाकुसरीने चांगलीं सजवीत, बांबूच्या पण सुरेख खिडक्या बनवीत. त्यांचे दागिने अल्पच होते; पण ते सुबक बनावटीचे असत. ते मातीचे मणी इतके छान बनवीत, की पाहतच

राहावें. ते मातीचेच गायी, बैल, कुत्रे, हत्ती वगैरे प्राणी बनवून ते रंगवीत. पुण्याच्या डेक्कन कॉलेजने उदेपूर स्टेशनाजवळ उत्खनन करून या लोकांच्या संस्कृतीविषयी बरीच नवी माहिती उजेडांत आणली आहे.

आपलीं पुराणें धांडोळल्या अंतीं राजस्थानांतल्या अनेक मानवगणांची थोडीबहुत माहिती उपलब्ध होते. आर्य जन सप्तसिंधूंच्या प्रदेशांतून बाहेर पडून आपला क्षेत्रविस्तार करूं लागले, तेव्हा राजस्थानांत त्यांच्या संपर्कांत दोन जमाती आल्या. त्यांतली एक जमात अगदीच रानटी होती. ती नरभक्षकहि होती असें सांगतात. आपल्या पुराणांनी यांनाच राक्षस म्हटलें आहे. दुसरी जमात दैत्य किंवा दानव यांची. हे असुर वर्गांतले लोक. हे आर्यांपैकी नव्हते; पण ते असभ्यहि नव्हते. शारीरिक सामर्थ्यांत तर ते आर्यांहूनहि बलदंड होते. त्यांची अशी एक खास संस्कृति होती. सभ्य मानवांचीं बरींच लक्षणें त्यांच्या व्यवहारांत दिसत होतीं. त्यामुळेच ते आर्यांना सहजासहजी 'साध्य' झाले नाहीत. त्यांचें 'दैत्यराज्य' मोडून 'देवराज्य' जोडण्यासाठी आर्यांना रक्ताचें पाणी करावें लागलें आहे.

पुष्करारण्य म्हणजे आजचा अजमेरभोवतालचा प्रदेश. हा या दानवांचा बालेकिल्ला होता. मधु आणि कैटभ हे त्या दानव जमातीचे सरदार. श्रीविष्णूने सुदर्शन चक्र फिरवून त्यांचा संहार केला आणि त्यामुळे त्याला 'मधुसूदन' आणि 'कैटभारि' हीं दोन नवीं नांवें प्राप्त झालीं.

धुंधु नामक आणखी एक दैत्य होता. तो वर उल्लेखिलेल्या मधु दैत्याचाच मुलगा. त्याने आपला एक कबिला मारवाडच्या उत्तर भागांत वसवला होता. या धुंधूला अयोध्येच्या कुवलयाश्व राजाने ठार केलें आणि मग त्या क्षेत्राला 'धुंधुमार' असें नांव पडलें. हें धुंधुमारच आज 'ढुंढाड' या नांवाने प्रसिद्ध आहे. कुवलयाश्वाच्याच वंशांतल्या निकुंभ नांवाच्या एका पुरुषाने पुढे तिथे आपलें राज्य स्थापलें. त्यांच्या वंशांतल्या क्षत्रियांचें इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत त्या प्रदेशावर राज्य होतें. राजस्थानांतले कित्येक गड-कोट याच निकुंभवंशी क्षत्रियांनी बांधले आहेत, असें कनिंगहॅम हा पुरातत्त्वपंडित सांगतो.

दुसरी जमात शाल्वांची. शाल्व हे आर्यजनांपैकी असावे असें वाटत नाही. त्यांचा मूळ इतिहास अंधारांत आहे. कदाचित् हे इराणी असुरांचे वंशज

असावे. ते आपल्या मूळ गृहांतून बलुचिस्तान, सिंध अशा मार्गे सिंधूच्या काठाकाठाने उत्तरेकडे जात जात, राजस्थानांत येऊन थडकले असावे. कसेंहि का असेना; उत्तर राजस्थान म्हणजे बिकानेर, अलवार हा प्रदेश या शाल्वांनी आपल्या सत्तेखाली आणला होता, एवढें खरें. त्यांचें जनपद राजाधीन होतें. महासाध्वी सावित्री हिचा पति सत्यवान् हा शाल्व होता, एवढें सांगितलें म्हणजे तुम्हांला त्या शाल्वांविषयी आत्मीयता वाटूं लागेल.

केकय देश हें सावित्रीचें माहेर. हा देश पंजाबांत राजस्थानाच्या सीमेला लागून होता. तिथून सावित्री राज्यभ्रष्ट सत्यवानाला वरण्यासाठी ज्या अरण्यांत आली, तें अरण्य अलवार भागातच कुठेतरी असावें. त्याच अरण्यांत सावित्रीने आपल्या पतीचा प्राण यमराजाच्या फासांतून सोडवून घेतला आणि ती भारतीय नारीजातीची आदर्श पतिव्रता ठरली.

या शाल्वांचीं कांही वैशिष्टयें होतीं. त्यांचें पायदळ नामांकित होतें. त्यांच्या राज्यांत बैल चांगले निपजत आणि त्यांचें आवडतें भोजन म्हणजे लापशी. आजहि बिकानेर भागांतल्या लोकांचें राबडी (लापशी) हेंच मुख्य भोजन आहे.

गोपथब्राह्मणांत या शाल्वांचा मत्स्यांबरोबर उल्लेख येतो. अलवार आणि जयपूर यांच्या उत्तर भागांत मत्स्यांचें राज्य नांदत होतें. मत्स्य हे शाल्वांचे शिमशेजारीच म्हणायला हवे. महाभारतकाळीं विराट हा मत्स्य देशाचा राजा होता. त्याच्या राजधानीला विराटनगर म्हणत. आजहि त्याची ती राजधानी बैराठ या नांवाने जयपूर ते दिल्ली या राजरस्त्यावर दिसते. तिथे गेल्यावर पांडवांच्या त्या अज्ञातवासाचें स्मरण झाल्यावाचून राहत नाही.

पांडवपत्नी द्रौपदी सैरंध्री बनून एक वर्षभर सुदेष्णेच्या अंतःपुरांत अपमानित जीवन कंठित राहिली ती इथेच. तिच्यावर डोळा ठेवणाऱ्या कीचकाला बल्लवरूपी भीमाने यज्ञांतल्या बोकडागत बुकलून बुकलून ठार मारलें तें इथेंच. अर्जुनाने बृहन्नडा बनून पायांत चाळ बांधले आणि विराटाची नृत्यशाळा संभाळली, तीहि इथेच. मत्स्य हे गोधनाच्या समृद्धीविषयी प्रसिद्ध होते. पांडवांचा तपास करण्यासाठी म्हणून कौरवांनी प्रथम धाड घातली ती मत्स्यांच्या गोधनावरच!

मत्स्यांच्या पूर्वेस म्हणजे रामगढ, गोविंद्गढ, भरतपूर, धोलपूर या भागात शूरसेन राज्य करीत होते. हे चंद्रवंशी याद्वांची एक शाखा होते. अंधक, वृष्णि, सात्वत, अशीं त्यांचीं गणराज्यें राजस्थान, गुजरात आणि सौराष्ट्र या भागांत विस्तारलीं होतीं. श्रीकृष्ण हा वृष्णि गणराज्याचा नायक होता. याच सोम-वंशांतले पौरव आणि कुरु हे जन प्रथमपासूनच एकतंत्री म्हणजे राजाधीन होते. पण याद्वांच्या शाखोपशाखांत मात्र गणतंत्र मानण्याची प्रवृत्ति होती. श्रीकृष्णाने महाभारतांत गणतंत्र पद्धतीचें यशापयश कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून असतें, याचें मार्मिक विवेचन केलें आहे.

बिकानेर आणि मारवाड यांच्या उत्तर अंगाला जांगल देश म्हणत. त्याच नांवाचे लोक तिथे आपलें राज्य थाटून बसले होते. एका बाजूने पंजाबांतील मद्रांचे अन् दुसऱ्या बाजूने कुरूंचे ते शेजारी होते. म्हणूनच त्यांचा उल्लेख नेहमी माद्रेय जांगल आणि कुरुजांगल अशा जोडनांवाने होत असे. सांप्रतचे नागौर ही जांगलांची राजधानी होती.

भारतीय युद्ध आणि याद्वांचा संहार या दोन घटना पुराणकाळांत मोठ्याच क्रांतिकारक ठरल्या आहेत. त्या घटनांनी समग्र भारताचीच राजकीय आणि सामाजिक घडी विस्कटून गेली. समाज सर्व अंगांनी खिळखिळा होऊन गेला. त्यानंतर राजस्थानाच्या राजनैतिक परिस्थितीवर अंधकाराचा पडदा पडलेला दिसतो. त्यानंतर या प्रदेशाचे थोडे थोडे उल्लेख मिळूं लागतात, ते बुद्धाच्या काळापासून.

भारतीय युद्धानंतरहि राजस्थानांत कांही गणराज्यें हापका प्राण घेऊन जगत होतीं. पण त्यांच्यामध्ये आता एक मोठा फरक पडला होता. ते लोक त्या काळांत 'जन' या शब्दापेक्षा 'जनपद' या शब्दाला प्राधान्य देऊं लागले होते. याचा अर्थ जनांपेक्षा ते जन ज्या प्रदेशांत नांदत होते, त्या भूप्रदेशावर लोकांचें अधिक प्रेम जडलें होतें. आता तीं गणराज्यें राहिलीं नसून जनपद-राज्यें बनलीं होतीं. त्यांतले कांही जनपद मोठे आणि शक्तिशाली बनले होते. त्यांच्यांत राज्यविस्ताराची तृष्णाहि निर्माण झाली होती. त्यामुळे कित्येक छोटे जनपद आपलें स्वतंत्र अस्तित्व यापुढे फार काळ टिकणार नाही अशा जाणिवेने राजीखुषीने मोठ्या जनपदांत समाविष्ट होत. जे थोडेच ताठरपणा धरीत त्यांना शस्त्रबळाने जिंकून त्यांचें सामीलीकरण केलें जाई. अशा प्रकारे

शेजारचीं राज्यें कवळामून मोठे झालेले जनपद मग स्वतःला 'महाजनपद' अशी उपाधि लावून घेत. बुद्धाच्या जन्मापूर्वी भारतांत असे सोळा महाजनपद निर्माण झाले होते आणि मत्स्य हा त्यांपैकीच एक महाजनपद होता.

त्यानंतर या महाजनपदांनाहि महावाईट दिवस आले. राजस्थानाच्या बाबतींत बोलायचें तर यवनसम्राट् सिकंदराने या प्रदेशावर धाड घालून तिथल्या जनपदांचीं हाडें खुसळून काढलीं होतीं. हीं इवलालीं भातुकलीसारखीं जनपद-राज्यें सिकंदराच्या वादळी आक्रमणाचा प्रतिकार करूं शकत नव्हतीं. त्याच काळांत इकडे मगधांत मौर्यांची साम्राज्यसत्ता उदयाला येत होती. अनेक छोट्या मोठ्या राज्यांना आपल्या पोटांत घेऊन ती वाढत होती, सर्वव्यापी बनत होती. या साम्राज्याच्या उभारणींत राजस्थानहि अलग राहूं शकला नाही. मत्स्यांच्या महाजनपदांसह तोहि मौर्यांच्या अंकित झाला. त्या साम्राज्य-सत्तेचें आधिपत्य मान्य करून तिथल्या जनपदांनी विदेशी आक्रमणाच्या प्रसंगी स्वतःला पाठबळ मिळवून घेतलें. राजस्थानांतल्या पूर्वीच्या मत्स्यराज-धानींत सम्राट् अशोकाचा एक स्तंभलेख आणि भीमजीकी डुंगरी येथे एक शिलालेख सापडला आहे. राजस्थान मौर्यशासित बनल्याचा तो पुरावाच म्हटला पाहिजे.

अशोकाचा नातू संप्रति मौर्य. त्याचा राजस्थानशीं विशेष संपर्क होता. संप्रतीने बौद्ध धर्म त्यागून जैन धर्म स्वीकारला होता. जैन धर्माच्या प्रसारा-विषयी त्याला विलक्षण आस्था होती. अशोकाने ज्या प्रकारचें कार्य बौद्ध धर्मासाठी केलें त्याच प्रकारचें कार्य संप्रतीने जैन धर्मासाठी केलें, असें सांगतात. प्राचीन कालापासून राजस्थानांत जैन धर्माची प्रतिष्ठा चालत आली आहे आणि या प्रतिष्ठेंत सम्राट् संप्रतीचा फार मोठा वाटा आहे.

या संप्रतीनंतर मौर्यांची शक्तिहि क्षीण होऊं लागली. मौर्य साम्राज्य आतून बाहेरून खिळखिळें झालें आहे असें पाहून बल्खचा यवन राजा दिमित्रिस याच्या मनांत भारत जिंकण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. त्याने प्रचंड सेनादल घेऊन भारतावर स्वारी केली. तो थेट पाटलिपुत्राला येऊन भिडला. दुसऱ्या बाजूने राजस्थानांतल्या मध्यमिका या नगरीला त्याने वेढा घातला. पतंजलीच्या महाभाष्यांत या घटनेचा सुगावा लागतो.

दिमित्रियसच्या या आक्रमणाला तोंड देण्याचें धैर्य विदिशेंतल्या एका नव-युवकाने दाखवलें. त्याचें नांव पुष्यमित्र असें होतें. त्याने उदंड पराक्रम करून त्या दिमित्रियसला यथास्थित खडे चारले. म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'मर्दी यवन पुष्यमित्र हा' असा त्याचा पवाडा गायिला आहे. तो प्रथम मौर्य सम्राटाचा सेनापति होता. पण पुढे शेवटचा मौर्यसम्राट बृहद्रथ याची आंधळी अकर्मण्यता पाहून त्याने त्या सम्राटाविरुद्धहि बंड पुकारलें. ज्या हाताने त्याने दिमित्रियसला लोळवलें, त्याच हाताने पुढे समस्त मौर्यसाम्राज्यहि ताब्यांत घेतलें.

भारतांत मौर्य राज्याचें पतन झालें, त्याच काळांत मध्य एशियांतल्या यवनांचा भाग्यरविहि अस्तगमी झाला. तिकडे शकांचें नवोत्थान झालें. त्यांनी यवन राज्य धुळीला मिळवलें. पुढे याच शकांची एक शाखा भारतविजयार्थ तिथून उग्र प्रस्थान करती झाली. इराण, मकरान, सिंध अशा मार्गाने हे शकयोद्धे काठियावाडांत उतरले. तिथून पुढे गुजरातमार्गें त्यांनी थेट अवंतीची सीमा गाठली.

त्यांच्याच दुसऱ्या एका शाखेने दुसऱ्या बाजूने वायव्य सीमेवरच्या यवनांचा पट उधळून पंजाबांत प्रवेश केला. तिथून खाली उतरून त्यांनी राजस्थानालाहि घेरलें. राजस्थान, अवंती, लाट, पश्चिम खानदेश, नाशिक इथपर्यंत ते जिंकीत जिंकीत पुढे आले. क्षत्रप नहपान हा या शकांचा नेता होता. भारतात एवढा भरघोस विजय मिळाल्यावर त्याने स्वतःला महाक्षत्रप असें बिरुद लावून घेतलें. पण या महाक्षत्रपालाहि शेरास सव्वाशेर भेटला आणि तो आपल्या महाराष्ट्रांत भेटला. तो पैठणच्या सातवाहन वंशाचा कुलदीप होता. त्याचें नांव गौतमी पुत्र सातकर्णी. त्याने या क्षत्रपांचे कंद छेदले. त्याच्या राज्याचा गाभा म्हणजे अवंती. पण सातकर्णी तिथपर्यंत 'धेमार' करीत पोचला आणि त्याने तिथूनहि त्यांना उखडून काढलें.

पण एवढ्यावरच हीं बाहेरचीं आक्रमणें थांबलीं नाहीत. क्षत्रपांच्या मागून त्यांचेच भाईबंद असलेले कुशाण टोळीवाले भारतावर चालून आले. सातवाह-नांनी सतत ५० वर्षें त्यांच्याशीं संग्राम केला. पण कनिष्क या कुशाण योद्ध्यापुढे सातवाहनांचा टिकाव लागला नाही. त्यांना या संग्रामांत मागे

हटत हटत नर्मदेच्या ऐलतीरावर यावें लागलें, आणि कुशाणांच्या या विजयानें सारा उत्तर भारत कुशाण सत्तेखाली गेला.

पण या कुशाणांनाहि पाणी पाजणारी एक जमात या भारतांत निर्माण झाली, हें आवर्जून सांगायला हवें. यौधेय गण म्हणून या जमातीची प्रसिद्धि आहे. सांप्रत त्यांच्या वंशजांना जोहिया म्हणतात. हा एक आयुधजीवी संघ होता. क्षत्रप रुद्रदामन्‌नें त्यांच्याविषयी लिहून ठेवलें आहे, कीं 'यौधेय लोक समस्त क्षत्रियांमध्ये अदम्य आहेत.' त्यांनी आपल्या निधड्या पराक्रमानें राजस्थानांतूनच नव्हे; तर समस्त भारतांतूनच कुशाण सत्तेची गठडी वळली. या महान् विजयाच्या आनंदाप्रीत्यर्थ त्यांनी आपल्या नाण्यांच्या टाकसाळींत एक नवी मुद्रा पाडली आणि तिच्या एका बाजूवर ऐटीनें अक्षरें कोरलीं, कीं 'यौधेयानां जयमंत्र धराणाम्!'

कुशाणांच्या पराभवानंतर थोड्याच काळांत पाटलिपुत्र येथे एका नव्या राज्याचा उदय झाला. थोड्याच काळांत त्या राज्याचें साम्राज्यांत रूपांतर झालें. यालाच गुप्त साम्राज्य असें म्हणतात. समुद्रगुप्त हा त्या साम्राज्याचा प्रतापभास्कर होय. त्यानें सारें आर्यावर्त तर जिंकलेंच. पण त्याबाहेर दक्षिणच्याहि कित्येक राजांना आपली अधिसत्ता स्वीकारायला लावलें. कुशाणांची दुर्दशा करणाऱ्या भीमबली यौधेयांचेंहि समुद्रगुप्तापुढे कांही चाललें नाही. तेहि त्याला 'त्वमेव शरणं मम' म्हणाले. अशा प्रकारें राजस्थानहि गुप्तसाम्राज्याच्या पंखाखालीं गेलें. त्या साम्राज्यांतलीं वैभवशाली सुखें राजस्थानालाहि अनुभवायला मिळालीं.

पण सहाव्या शतकांत परिस्थिति पुन्हा पालटली. एका बाजूनें गुप्त कमजोर झाले अन् दुसऱ्या बाजूनें भारतावर हूणांचीं आक्रमणें सुरू झालीं. हूणराजा तोरमाण हा गुप्तसाम्राज्याचा पश्चिम भाग जिंकून राजस्थानावरहि घसरला. हूणांशीं होणाऱ्या संघर्षांत गुप्त राजे एकेका आघाडीवर हरूं लागले, माघार घेऊं लागले.

राजस्थानांतली जनता या आक्रमणांनी उद्विग्न झाली. तिच्या अंतरांत या विदेशी शत्रूंच्या प्रतिकाराची आग धुमसत होती; पण तिला कोणीतरी दुर्दम्य नेता हवा होता. थोड्याच काळांत तो निर्माण झाला. यशोवर्म विष्णुवर्धन हें त्याचें नांव होतें. तो राजा नव्हता, तर केवळ 'जनेंद्र' म्हणजे जनांचा

पुढारी होता. दशपूर अर्थात् मंदसौर हें त्याचें वास्तव्यस्थान! त्या हूण आक्रमकांच्या विरुद्ध तो खवळून उठला. त्यांना देशांतून हाकलून लावण्यासाठी त्याने बळ बांधलें. त्यांच्या अत्याचारांनी संत्रस्त झालेला राजस्थानी वीरसमुदाय तावडतोब यशोधर्म्याच्या झेंड्याखाली शस्त्रसज्ज होऊन उभा राहिला. यशोधर्म्याने त्या लढाईत अद्भुत पराक्रम दाखवला. थोड्याच काळांत भारतांतलें हूणांचें राज्य कथाशेष करून टाकलें. हूणमर्दन करून यशोधर्मा अमर कीर्तीचा महापुरुष ठरला.


त्यानंतर राजस्थान कनौजच्या हर्षवर्धनाच्या साम्राज्यांत समाविष्ट झालें. तो थोडासा काल बरा गेला. पण भारताचें दुर्भाग्य एवढ्यावरच संपलें नव्हतें. त्यापुढच्या दुर्घटना इस्लामी आक्रमणांच्या. इ. स. च्या ८ व्या शतकांत अरब लोक इस्लामच्या झेंड्याखाली संघटित होऊन भारतविजयासाठी गर्जत, उफाळत बाहेर पडले. त्यांनी मकरानच्या मार्गें सिंधवर प्रथम धाड घातली. दाहिर नामक एक राजा त्या काळीं सिंधवर राज्य करीत होता. अरबांच्या टोळधाडीला त्याने तोंड दिलें; पण त्या युद्धांत तो मारला गेला. दाहिरच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी त्याची राणीहि फुंफाटत समरांगणांत उतरली. पण तीहि मारितां मारितां मरून गेली.

तें युद्ध अरबांनी जिंकलें. सिंध अरबाच्या ताब्यांत गेला. सिंधला लागूनच राजस्थान वसलेला. त्यामुळे राजस्थानलाहि पारतंत्र्याचे वेध लागले. राजस्थानांत या काळीं अनेक छोटीं छोटीं राज्यें होतीं. त्यांचा या अरबांशीं आता साक्षात् संबंध येऊं लागला. अरब कांही केवळ सिंधविजयावरच संतुष्ट राहणारे नव्हते. त्यांना कच्छ जिंकायचें होतें. गुजरात खायचें होतें. राजस्थान घशांत घालायचें होतें. सारा भारत देशच इस्लामशासित करायचा होता.

ही परिस्थिति राजस्थानी राजांना आणि लोकांनाहि उमगली. पुन्हा त्यांना नव्या नेत्याची गरज निर्माण झाली. तसा कोणी पुरुषार्थी नेता पुढे आला, तर ते त्याच्या झेंड्याखाली एकत्र येणार होते, त्याची आज्ञा मानणार होते आणि त्याच्या आधिपत्याखाली जिवाच्या कराराने यवन आक्रमकांशीं लढणार होते. याच त्यांच्या तळमळीच्या आकांक्षेतून एक नवा नेता राजस्थानच्या रक्षणासाठी उदयाला आला. कालभोज किंवा बाप्पा रावळ हें त्याचें नांव!

इथूनच पुढे राजपुतांचा इतिहास सुरू होतो. बाप्पा रावळपासून पुढे राजस्थानला एक महान् वीरपरंपरा लाभली. तिच्यामुळे राजस्थानचा इतिहास ज्वलंत ठरला. शौर्य, त्याग, निष्ठा, चारित्र्य, धर्माभिमान, प्राणार्पणबुद्धि इत्यादि लोकोत्तर गुणांनी राजस्थानाने स्वतःला आणि भारतालाहि गौरवून ठेवलें. राजस्थान स्वनामधन्य झालें.





# वीर परंपरा

राजपुतांच्या इतिहासांत शिरतांना पहिला प्रश्न पुढे उभा राहतो तो हा, की ' हे राजपूत कोण ? आर्य की आर्येतर ? ' कर्नल टॉडने हा प्रश्न उपस्थित केला नसता, तर राजपुतांची कुळकथा चर्चिलीच गेली नसती.. संशोधकांत त्यावर वादंग माजण्याचेंहि कारण उरलें नसतें. पण त्याने राजपुतांच्या मुळालाच हात घातला आणि कांही ठाम विधानें केलीं. टॉड हा मोठा विद्वान् मनुष्य. विलक्षण साक्षेपी. आधुनिक काळांत राजपुतांचा तपशीलवार इतिहास लिहिणारा तोच पहिला ग्रंथकार ठरतो.

टॉडच्या मनांत राजपुतांविषयी विलक्षण प्रेमादर आहे. त्यांच्या एकेका गुणावर तो लुब्ध आहे. अत्यंत रसाळ लेखणीने त्याने आपला तो ग्रंथराज लिहिला आहे. पण राजपुतांच्याविषयी लिहितांना त्याने एक कल्पना गृहीत धरली, की राजपूत हे पराक्रमी, शूर राजे असले तरी ते आर्य क्षत्रिय नसून शक - हूणांचे वंशज आहेत ; अर्थात् आर्येतर आहेत. ते मध्य आशियांतून भारतांत

आले आणि त्यांनी इथे आपलीं राज्यें स्थापलीं. आपल्या या कल्पनेवर त्याचें राजपुतांच्याइतकेंच प्रेम आहे. किंबहुना त्याचा तो आग्रही मतवाद आहे.

आपलें हें मत सजविण्यासाठी त्याने भाषाशास्त्र, मानववंशशास्त्र, पुरातत्त्व-विद्या अशा विविध शास्त्रांचा आधार घेतला आहे. शक म्हणजे शाकद्वीपांतले सिथियन लोक होत. हे लोक मोठे लढाऊ, क्रूर आणि रक्तपिपासू होते. लढाया मारणें अन् जातील तिथे मानवसंहार करणें हेंच बाळकडू पिऊन ते वाढले होते. जसे युद्धप्रिय, तसेच मदिराभक्त. तेंच रक्त राजपुतांतहि उतरलें आहे. त्या सिथियन शकांचा, गेट, जोट किंवा जिट यांचा हर नामक देव होता. हर म्हणजे शिव अर्थात् एकलिंगजी. तो राजपुतांचाहि आहे. गेट लोकांत सतीची चाल होती, तीच राजपुतांतहि आहे. ते 'असि' म्हणजे खड्ग आणि 'अश्व' म्हणजे घोडा यांची पूजा करीत होते, तशीच ती राजपूतहि करतात. आपला मुद्दा सजवण्यासाठी त्याने हीं धर्मसादृश्यें पुढे केलीं आहेत आणि पिंकरटन, हिरोडोटस या शास्त्रज्ञांचा आधार घेतला आहे.

हें मत आग्रहाने प्रतिपादितांना कर्नल टॉडच्या पोटांतला कावा वेगळा होता, असें श्री. विद्यालंकार हे आपल्या 'हमारा राजस्थान' या ग्रंथांत सांगतात. भारतांत इंग्रजांची राजवट हळूहळू दृढमूल होत असतां टॉडला राजपुतांची जात संघटित रूपांत पाहायला मिळाली. त्यांचे शौर्यधैर्यादि गुणहि त्याच्या निदर्शनास आले. मराठे हे त्या काळांतले इंग्रजांचे प्रमुख शत्रु. तेव्हा त्यांच्यापासून राजपुतांना फोडणें, त्यांचें वेगळेपण प्रस्थापित करणें हें इंग्रजांच्या हिताच्या दृष्टीने त्याला आपलें कर्तव्य वाटलें. 'फोडा आणि झोडा' हेंच तत्त्व सूक्ष्म रूपाने या गोष्टीच्या मुळाशीं होतें. त्याचा दुसरा पैलू असा : इंग्रज लोक सातां समुद्रांपलीकडून भारतांत येतात आणि इथल्या लोकांना दाबून दडपून त्यांच्यावर राज्य करतात, यांत भारतीयांनी मनाला लावून घेण्याजोगें कांहीच नाही. पुरातन काळापासून इथे असेंच घडत आलें आहे. राजपुतांनीहि मध्य आशियांतून भारतावर आक्रमण करूनच इथे आपलीं राज्यें मांडलीं आहेत.

पण कर्नल टॉडचें हें मत आता असिद्ध आणि अमान्य ठरलें आहे. प्रथम इतिहासाचार्य राजवाडे यांनी, नंतर श्री. चिंतामणराव वैद्य यांनी आणि त्यानंतर पं. गौरीशंकर ओझा या भारतीय पंडितांनी कर्नल टॉडच्या वरील मताचा साधार आणि सप्रमाण धुव्वा उडवला आहे. राजपूत ही एक स्वतंत्र जात

आहे, असें टॉड मानतो खरा; पण राजपूत असा शब्दच्च मुळी सोळाव्या शतकाच्या पूर्वी आढळत नाही. तो साहित्यांत नाही किंवा शिलालेखांतहि नाही. तो अरबी किंवा फारसी तवारिखांतहि नाही. कल्हण कवीने काश्मीरच्या इतिहासावर 'राजतरंगिणी' नामक एक ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिला आहे. या ग्रंथाचीं परिशिष्टें निरनिराळ्या लेखकांकडून अकबराच्या काळापर्यंत लिहिलीं जात होतीं. शेवटचें परिशिष्ट प्रालभट्ट या कवीच्या हातचें आहे. राजपूत हा शब्द त्या परिशिष्टांत पहिल्याप्रथम दिसतो. बिकानेरचा राजा राजसिंह आणि त्याचे सैनिक यांना तो लावलेला आहे. तात्पर्य हें, की राजपूत नांवाचा वंश कधी नव्हता आणि नाही. राजस्थानांतले राठोड, शिसोदिये, महाजन, जाट, माळी, पोखरणा ब्राह्मण, गुजर, अहीर हे सगळेच आपल्याला राजपूत म्हणवतात. या सर्व राजपुतांचा इतिहास धांडोळून श्री. चिंतामणराव वैद्य यांनी त्यांचें आर्यत्व ठामपणें सांगितलें आहे—

राजपूत हे वैदिक आर्यांचेच वंशज होत. हे प्रथम पंजाब आणि गंगा-यमुनांचा प्रदेश इथले वस्तीकर होते. हा सगळा मैदानी प्रदेश आहे. त्यावर शक, कुशाण, हूण, आणि अखेरीस तुर्क या लोकांचीं आक्रमणांमागून आक्रमणें झालीं. त्या आक्रमणांमुळे ज्यांची वाताहत झाली, असे कित्येक लोंक आपलें स्वातंत्र्य आणि आपला धर्म रक्षिण्यासाठी शतकानुशतकें राजस्थानाच्या डोंगराळ प्रदेशांत उतरत राहिले. तिथे येऊन त्यांनी आपला मांड मांडला व आपला धर्मध्वज फडकत ठेवला. पुढे इथेहि जेव्हा अरबांनी त्यांच्यावर आक्रमण केलें, तेव्हा या आर्य क्षत्रियांनी त्या परकी आणि परधर्मी लोकांशीं पर्वतांच्या आणि दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयाने जोरदार मुकाबला केला. धर्म आणि स्वातंत्र्य यांच्या रक्षणासाठी त्यांनी पराक्रमाची शर्थ करून दाखविली.

याच आर्य क्षत्रियांना आपण आजमितीस राजपूत म्हणतों. त्यांची परंपरा सुरू होते ती गुहिलोत या राजघराण्यापासून. हें घराणें स्वतःला सूर्यवंशी रघुकुलोत्पन्न म्हणवतें. श्रीरामचंद्राच्या लव नामक पुत्रापासून त्यांची वंशवेल सुरू होते. त्याने प्रथम पंजाबांत आपल्या नांवाचें लवकोट म्हणजेच आपलें लाहोर नगर वसवलें आणि तिथे आपलें राज्य स्थापलें.

त्याच्या वंशांत पुढे गुहादित्य नांवाचा एक पुरुष जन्मला. एका महान् राजकीय अनर्थाच्या प्रसंगी एका गुहेंत त्याचा जन्म झाला. म्हणून त्याचें नांव

गुहादित्य ठेवण्यांत आलें. त्याचेंच पुढे गुहिल झालें. त्याने मेवाडांतलें नागदा नांवाचें शहर वसवून राजस्थानाच्या फार मोठ्या भागावर राज्य केलें. त्याच्याच वंशवृक्षाला पुढे एक अमृतफळ लागलें, त्याचें नांव कालभोज किंवा बाप्पा रावळ होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२८० दि: ९/५/७१
क्रमांक 332 नों. दि. ९/५/६८

## बाप्पा रावळ

आपली वडिलार्जित राजधानी त्याला पटली नाही. त्याने चितोडच्या परमार राजाला जिंकून तिथे आपली नवी राजधानी स्थापन केली. दर्‍याखोर्‍यांतल्या भिल्ल युवकांना सैनिकी शिक्षण देऊन त्याने आपलें सैन्यबळ वाढवलें आणि त्याच्या जोरावर अरब आक्रमकांना खडे चारून पार खंबायतपर्यंत नेऊन पोचवलें.

बाप्पा हा एक अफाट पुरुष होता. तो भीमपराक्रमी, कुशल सेनापति आणि कट्टर धर्माभिमानी होता. एका स्वाभिमानी, धर्मनिष्ठ अशा स्वतंत्र राज्याची त्याने चितोड येथे प्राणप्रतिष्ठा केली. पुढिलांना आपला आदर्श निर्माण करून ठेवला. राजस्थानांतल्या जनतेने बाप्पाला अतिमानव पुरुषपुंगव मानलें आहे. त्याच्याविषयी शेकडो दंतकथा निर्माण केल्या आहेत.

तो हारीत नामक मुनीचा शिष्य होता. त्याला एकलिंगजीची उपासना या हारीतानेच दिली. त्याने बाप्पाला उपदेशिलें, की 'राज्य वाढवायचें तूं; पण त्याचा मालक हा एकलिंगजी ! तूं त्याचा दिवाण !' बाप्पाने ती 'दिवाण' ही पदवी शिरोधार्य मानली. पुढे त्याच्या वंशजांनीहि या पदवीचा मान राखला.

## मेवाडचा साक्षर

बाप्पाच्या मागून त्याचे पुत्र-पौत्र चितोडचे राज्यधर झाले. पण त्यांचीं चरित्रें भाट-चारणांनी गावीं, इतक्या योग्यतेचीं झालीं नाहीत. तो मान मिळाला तो बाप्पा रावळनंतर पांचव्या पिढींत राज्यावर आलेल्या खुमान या नरवीराला ! 'खुमान रासो' या नांवाचें त्याच्यावर महाकाव्य निर्माण

झालें आहे. त्या महाकाव्यांत त्याने मारलेल्या लढायांचें रोमहर्षक वर्णन आलें आहे. खुमानची कारकीर्दच तशी पेचदार होती.

त्याच वेळी म्हणजे ९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत बगदाद येथे अलमामून हा खलिफाच्या गादीवर बसला होता. खुमानच्या काळांत तो भारतावर चालून आला. त्याने चितोड जिंकण्याचा चंग बांधला होता. बाकी सगळी भूमि भुसभुशीत होती. कोण्याहि आक्रमकाला ठेच लागत होती ती फक्त मेवाडवर; त्यांतल्या त्यांत चितोडवर. आणि म्हणूनच अलमामूनने आपलें होतें नव्हतें तेवढें सगळें सामर्थ्य चितोडवर पणाला लावायचें ठरवलें.

त्याने खुमानला खलिता धाडला, की 'खंडणी भरून खलिफाचें मांडलिकत्व स्वीकार.' या खलित्याला खुमानने उत्तर दिलें तें तलवारीचा खणखणाट करून. तो युद्धाला उभा ठाकला. त्याला आजूबाजूच्या अन्य राजांनीहि मदत केली. त्याने एकूण २४ लढाया मारल्या. अरबांच्या अंतरांत त्याने विलक्षण धडकी भरवली. म्हणूनच कर्नल टॉड त्याची रोमचा बादशहा ज्यूलियस सीझर याच्याशीं तुलना करतो. त्याला मेवाडचा सीझर म्हणतो. राजपूत त्याच्या नांवाची जपमाळ ओढतात. त्याला तारणहार मानतात. आजहि उदेपुरांत एखाद्याला ठेच लागली, तर शेजारचा माणूस त्याला म्हणतो, 'खुमान तेरी रक्षा करे!'


राजपूत वीर

त्यानंतर बाराव्या शतकाच्या अखेरीपर्यंतचा चारशे वर्षांचा काळ राजस्थानाला सुखशांतीचा गेला असें दिसतें. कारण मधल्या काळांतल्या विशेष घडामोडी इतिहासाने नमूद केलेल्या नाहीत. या मधल्या काळात गुहिलोत वंशाच्या दोन शाखा झाल्या. रावळ आणि राणा अशीं त्यांचीं दोन नांवें

आहेत. राण्यांनी शिसोदा येथे आपली नवी गादी स्थापन केली. म्हणून पुढे त्या शाखेला शिसोदिया म्हणूं लागले. छत्रपति शिवाजीमहाराज हे याच शिसोदिया कुळांतले कुलप्रदीप होत. राजस्थानांत राजपुतांना जें साध्य करतां आलें नाही, तें हिंदवी स्वराज्य शिवछत्रपतींनी महाराष्ट्रांतून निर्माण करून आकाराला आणलें.

राजस्थानाच्या इतिहासांत तेरावें शतक हें अत्यंत आणीबाणीचें ठरलें आहे. बाराव्या शतकाच्या अखेरीस शहाबुद्दिन घोरीने पृथ्वीराजाचा वध केला. पृथ्वीराजाच्या पाडावामुळे दिल्ली येथील हिंदूंचा प्रतापसूर्यच मावळला. हिंदवी स्वातंत्र्यावर तो एक जबरदस्त घाला बसला. त्यामुळे जनतेचें मन निराशेनें ग्रस्त झालें. यापुढे आपल्याला परक्यांच्या गुलामगिरींत खितपत जगावें लागणार, ही जाणीव हिंदु प्रजेच्या अंतरांत घर करून बसली. मुसलमानांच्या सद्दीचा तो काळ होता. दिल्लीच हिंदूंच्या हातची गेली असें नव्हे; तर भारताच्या अन्य भागांतहि मुसलमानी सत्ता बळ धरूं लागली. सगळीकडेच हिंदूंची पडझड सुरू झाली.

## राणी पद्मिनी

पण राजस्थानांतलें मेवाड हें अजून शाबूत होतें. मुसलमान आक्रमकांच्या काळजांत तें काट्यासारखे खुपत होतें. एकदा मेवाडचा आदित्यध्वज खाली पडला, की त्यांना ‘निर्वीरमुर्वीतलम्’ होणार होतें. त्यांनी त्यासाठी मेवाडची अनेकवार कुरापत काढून पाहिली. कधी दमाने तर कधी बळाने मेवाड जिंकण्याचा प्रयत्न केला; पण मुसलमानांची तिथे डाळ शिजली नाही. मेवाडचे अधिपति खमके होते अन् प्रसंगी स्वातंत्र्यरक्षणासाठी प्राणहि फुंकून टाकायला सिद्ध होते, हें त्याचें कारण होय.

इ. स. १३०३ मध्ये अल्लाउद्दिन खिलजी मेवाडच्या राजधानीवर म्हणजे चितोडवर धडकला. त्याला सर्वत्र विजयावर विजय मिळत होते. त्याचा बाटून मुसलमान झालेला सेनापति मलिक काफूर याने देशभर नुसता धुमाकूळ उडवून दिला होता. अनेक हिंदु राजांना त्याने आपल्या धन्याच्या चरणधुळींत लोळायला लावलें होतें. पण तेवढ्यावरच त्या दिल्लीपतीचा आत्मा संतुष्ट

नव्हता. मेवाड़चा आदित्यध्वज खाली पाडल्याशिवाय त्याला सुखाची झोप येणार नव्हती आणि चितोडची सौंदर्यसम्राज्ञी पद्मिनी आपल्या जनानखान्यांत आल्याशिवाय त्याच्या विलासांना रंग भरणार नव्हता. पद्मिनीच्या लावण्याची कीर्ति किती तरी दिवस त्याच्या कानीं येत होती आणि तो तिच्या प्राप्तीसाठी बेचैन झाला होता. अखेर त्याने ठरवलें, ' एक पंथ दो काज ! ' चितोड जिंकायचें आणि पद्मिनीची लावण्यलता आपल्या अंतःपुराच्या उद्यानांत आणून लावायची.

प्रचंड सैन्य आणि डोंगराएवढा खजिना घेऊन तो स्वतः त्या मोहिमेवर आला. चितोडला त्याचा वेढा पडला. पद्मिनीचा पति रत्नसिंह थोड्याच वर्षांपूर्वी गादीवर आला होता. या अफाट आक्रमणामुळे क्षणभर त्याच्या डोळ्यांपुढे अंधारच पसरला. पण त्याचा दूरचा एक चुलता लक्ष्मणसिंह हा रत्नसिंहाच्या धावण्या धावून आला. एकटाच नव्हे; तर आपले सिंहाच्या छाव्यांसारखे सात पुत्र घेऊन आला. मेवाडचें स्वातंत्र्य आणि पद्मिनीचें शीलसंरक्षण अशी उभयविध जिम्मेदारी त्या पोलादी छातीच्या लक्ष्मणसिंहाने स्वतःच्या शिरावर घेतली. अनेक राजपूत सरदार, सामंत त्याला येऊन मिळाले. घनचक्कर लढाईला प्रारंभ झाला.

पण हळूहळू तें युद्ध राजपुतांच्या अंगावर येऊं लागलें. राजपुतांना या परिस्थितीचें थोड्याच दिवसांत आकलन झालें. शत्रु घनघोर होता. सैन्य, द्रव्य, दाणागोटा, शस्त्रास्त्रें यांचे जणु लोंढे तो चितोडकडे वाहवून आणीत होता. त्यामानाने राजपुतांचें सैन्य आणि सामर्थ्य हीं दोन्ही कमी पडलीं होतीं. चितोड पडणार, मेवाड हातचें जाणार, असें त्यांना मनोमन कळून चुकलें. त्यांना मरणाची खंत नव्हती. मृत्यूला मित्र मानूनच ते आजवर जगले होते, झगडले होते. प्रश्न त्यांच्या मृत्यूचा नव्हता. प्रश्न चितोड पडण्याचाहि नव्हता. प्रश्न होता तो गडावर विजयाची प्रार्थना करीत बसलेल्या सती पद्मिनीचा ! तिचा एकटीचाच नव्हे; तर तिच्याबरोबरच्या हजारो राजपूत रमणींचाहि. पुरुष धारातीर्थी पडल्यावर आणि अल्लाउद्दिन विजयी झाल्यावर त्या सती साध्वींची धडगत नव्हती. अल्लाउद्दिन त्यांना जितेपणीं नरकांत कुजवणार

होता. लक्ष्मणसिंहाच्या पुढे समस्या उभी राहिली, की आता या स्त्रियांचें काय करायचें! ही राजपूत कुळाची अब्रू कशी सलामत राखायची!

पण तो प्रश्न विचारायच्या आधीच त्या धीरोदात्त साध्वीने लक्ष्मणसिंहाला त्याचें उत्तर दिलें, 'माझ्या जोहाराची तयारी करा!'

तें अग्निदिव्य, तो जोहार ही चितोडच्या इतिहासांतली एक रोमांचकारी घटना आहे. गडाखाली लढाईचा हलकल्लोळ आणि गडावरच्या एका तळघरांतून वर उठलेले आगीचे आणि धुराचे लोळ! गडावरच्या हजारो राजपुतिनी त्या एका घटकेंत आपलीं पवित्र देहफुलें अग्निनारायणाला समर्पून मोकळ्या झाल्या. आपण चितेंत जळून त्यांनी आपल्या पतिपुत्रांनाहि चितेंतून मोकळें केलें. ते मग उसिण्या घाई झुंजले आणि मातृभूमीसाठी मरून कृतार्थ झाले.

अखेर ती लढाई अल्लाउद्दिनने जिंकली. विजयाच्या उन्मादाने बेहोष होऊन तो गडावर चढला. राजपुतांनी तिथे जें जें उभारलें होतें, तें सगळें मोडीत, फोडीत, तुडवीत तो पद्मिनीच्या महालाकडे गेला. पण तिथे आता जिता जीव शिल्लक नव्हता. तिथे शिल्लक होती ती जोहारची धुमसती आग! अल्लाउद्दिनला चितोड मिळालें; पण पद्मिनीचें मात्र नखहि दिसलें नाही. ती निराशा त्याला अगदी असह्य झाली. कपाळावर हात मारून हाय हाय करीत तो म्हणाला—

"आये थे गुल के वास्ते
बस खार ले चले।
हिजरौंका पदिमनि के
यह आजार ले चले।
दिल की जो थी हविस
वो न निकली हजार हैफ।
जो जेवरो जवाहर
बेशुमार ले चले।"

लक्ष्मणसिंह तर त्या युद्धांत कामी आलाच; शिवाय त्याच्या सातांपैकी सहा पुत्रहि वीरगतीला गेले. सातवा मुलगा जयसिंह. तोहि घायाळ झाला होताच;

पण तो कसाबसा जगला. पण चितोड पडल्यावर त्याला तिथे स्थानच उरले नाही. तो आपल्या सुरक्षितपणासाठी अरवली पर्वताच्या पोटांत शिरला. तिथल्या खेलवाडा नांवाच्या गावीं जाऊन राहिला.

## राणा हम्मीर

त्याच्या मृत्यूनंतर राणा हम्मीर हा लक्ष्मणसिंहाचा एक नातू नव्या जोमाने पुढे आला. मेवाडचें हरवलेलें स्वातंत्र्य परत मिळवण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या हृदयांत जागृत झाली. त्याने प्रथम आपलें सामर्थ्य वाढवलें, संघटित केलें. त्याने आपल्या यवन शत्रूवर प्रथम राजकीय बहिष्काराचें शस्त्र उपसलें. मेवाड-मध्ये पारतंत्र्यांत काळ कंठणाऱ्या आपल्या राजपूत प्रजेला त्याने चितोड सोडून खेलवाड्यांत येण्याचें आवाहन केलें. ती प्रजाहि या नव्या राजपुरुषाच्या आवाहनाला जागली. लगेच खेलवाड्याकडे राजपूत कुटुंबांची रीघ लागली. थोड्याच काळांत चितोड ओस पडलें अन् खेलवाडा गजबजला.

राणा हम्मीरचें हें राजकीय बहिष्काराचें शस्त्र मुस्लीम राज्यकर्त्यांना चांगलेंच झोंबलें. त्याचें हें हत्यार दुधारी होतें. त्याची एक धार होती बहिष्काराची अन् दुसरी होती गनिमी काव्याची. या कामीं त्याला अरवलीचें खूपच साह्य मिळालें. त्याच्या दऱ्याखोऱ्यांचा त्याने शहाणपणाने उपयोग करून घेतला. डोंगरांत खूप खोलवर राहत असल्यामुळे शत्रु राणा हम्मीरच्या केसालाहि धक्का लावूं शकत नव्हता. हम्मीर मात्र डोंगरी वाटा अन् खिंडी अडवून शत्रूची रसद मारीत होता. प्रसंगी कुठून तरी बाहेर उपटून शत्रूच्या वाहतुकीवर धाड घालीत होता. गनिमाला यथास्थित चेपून काढीत होता. त्याने थोड्याच काळांत दिल्लीचें मेवाडशीं असणारें राजकीय अन् आर्थिक दळणवळण पार तोडून टाकलें. मेवाडला अलग केलें, असहाय्य केलें.

चितोड जिंकल्यावर अल्लाउद्दिनने खिजरखाँ नांवाचें एक आपल्या पुढ्यातलें बाहुलें चितोडवर सुभेदार म्हणून नेमलें होतें. हम्मीरच्या या उल्का-पाती हल्ल्यांनी तो खिजरखाँ जर्जर झाला आणि मालदेव नांवाच्या एका राठोड राजपुताला आपल्या जागीं बसवून त्याने दिल्लीला प्रयाण केलें. मालदेव राजपूत असला तरी तो शत्रूचा हस्तक असल्यामुळे हम्मीरने त्याचीहि

गय केली नाही. मालदेवहि थोड्याच काळांत हैराण होऊन गेला. हम्मीरची आपल्या मागची साडेसाती संपवण्याच्या उद्देशाने त्याने त्याच्याशीं मैत्री करायचें ठरवलें आणि त्या मैत्रीचें सुंदर प्रतीक म्हणून आपली मुलगी त्याला दिली. हम्मीरनेहि ती सोयरीक पत्करली. त्या निमित्ताने तो खेलवाड्याहून चितोडला गेला आणि प्रसंग साधून त्याने मालदेवाला दूर करून चितोडची गादी हस्तगत केली.

हम्मीरच्या या कुशल प्रयत्नाने पुनश्च मेवाड राजपुतांच्या अंकित झालें. अवघ्या पंचवीस वर्षांत मुसलमानांचें तिथलें निशाण खाली उतरलें. मेवाड पुनश्च स्वातंत्र्याच्या तेजाने तळपूं लागलें. समस्त जनतेने या स्वातंत्र्याचा आणि त्याबरोबरच राणा हम्मीरचाहि जयजयकार केला. एक महनीय राष्ट्रपुरुष म्हणून भाट-चारणांनी त्याचे पवाडे गायिले.

या काळापर्यंत अल्लाउद्दिनचा अंत झाला होता. त्याच्या जागी आता महंमद तुघलख गादीवर आला होता. मेवाडच्या स्वातंत्र्याचे भेरी-नगारे त्याच्या कानावर इतक्या प्रखरतेने आदळले, की त्याच्या कानठळ्याच बसल्या. त्याने हम्मीरला पराजित करण्यासाठी मेवाडवर बहुत सैन्य धाडलें. पण हम्मीर कमालीचा सावध होता. त्याने त्या सैन्याचा मंडा असा कांही फोडला, की पुसूं नका. त्यानंतर पुढे दीडशे वर्षें दिल्लीच्या सुलतानांनी मेवाडकडे भुवई उंचावून पाहिलें नाही. ते पाहूंच शकले नाहीत. चितोड येथील महावीराच्या मंदिरांत एक शिलालेख आहे. त्यांत या ‘महावीर’ हम्मीराचें दिलखुलास वर्णन आहे—

“ वंशे तत्र पवित्रचित्रचरितस्तेजस्विनामग्रणीः ।
श्रीहम्मीरमहिपतिः स्म तपति क्ष्मापाल वास्तोष्पतिः ॥
तोरुष्कामितमुण्डमण्डलमिथः संघट्टवाचालिता ।
यस्याद्यापि वदन्ति कीर्तिमभितः संग्रामसीमाभुवः ॥

त्या गुहिलोत वंशांत पवित्र आणि आदर्श चारित्र्याचा तेजस्वी नेता महाराणा हम्मीर विराजत आहे. तुर्क लोकांचीं असंख्य मुंडकीं जिकडे तिकडे विखुरलीं आहेत, असे समरांगणाच्या चारी सीमांचे प्रदेश अद्यापि त्याचें चहू बाजूंनी यशोगान करीत आहेत.

## राणा कुंभ

इ. स. १३६४ सालीं हम्मीर मृत्यु पावला. त्याने अर्ध्या शतकाच्यावर मेवाडचें राज्य केलें. पहिल्या पंचवीस वर्षांत गेलेलें परत मिळविलें. आणि पुढील पंचविशींत अनेक नव्या गोष्टींची उभारणी केली. असा हा त्याचा 'योगक्षेम' झाला. त्याचा पुत्र क्षेत्रसिंह. याने मंडलगडचा किल्ला अन् हाडावतीचें राज्य जिंकून बापाच्या कीर्तिचंद्राला एक नवी कळा चढविली. क्षेत्रसिंहाचा मुलगा लाखाराणा. त्याची कारकीर्द त्याच्या पराक्रमापेक्षा त्याच्या पुण्यकृत्यांबद्दलच अधिक गाजली.

इ. स. १४२० नंतर महाराणा कुंभाची कारकीर्द सुरू होते. हा महाराणा मोकलचा सुपुत्र. राजपूत राजवंशाच्या अज्ञात तपस्येचें सुकृत फळ! राजस्थानच्या इतिहासांत हा नरश्रेष्ठ मध्याह्नीच्या सूर्यासारखा तळपतांना दिसतो. त्याच्या काळांत दिल्लीच्या महंमद तुघलखाची सत्ता क्षीणबल होऊं लागली होती. पण दुसऱ्या बाजूने गुजरात अन् माळवा येथील सुलतान जोरावर येऊं लागले होते. माळव्याच्या सुलतानाचें नांव महंमूद खिलजी. तो आजूबाजूच्या परिस्थितीचा वास घेऊं लागला असतां राणा कुंभ हळूहळू बळावतो आहे, असें त्याला कळून आलें. त्यामुळे त्याचें डोकें गरम झालें. 'या माणसाला खाली घातलाच पाहिजे' अशा अभिनिवेशाने तो कुंभावर चालून आला. कुंभ म्हणाला, 'तूंच कुरापत काढलीस तें बरें झालें!' त्याने पुढे होऊन सारंगपूरच्या मैदानावर महंमूद खिलजीची गाठ घेतली. उभयपक्षी घनचक्कर उडाली. महंमुदाला कुंभाचा घेमार सहन झाला नाही. तो मागच्या मागे पळाला अन् मांडवगडावर जाऊन लपला. कुंभाने तिथपर्यंत त्याचा पिच्छा पुरवून त्याला बाहेर खेचलें. सरळ चाल करून त्याला पकडलें. आणि चितोडगडावर आणून बंदिखान्यांत कोंबलें. सहा महिने महंमूद खिलजी राणा कुंभाच्या कैदेंत राहिला. पुढे त्याचे पंख झडले आहेत असें पाहून कुंभालाच त्याची दया आली आणि त्याने त्याला एक दिवस बिनशर्त सोडून दिलें.

पण महंमूद खिलजी त्याबद्दल कुंभाचा कृतज्ञ राहिला नाही. तो दूध पिणारा सापच ठरला. त्याने राणा कुंभाला नेस्तनाबूत करण्याचे मनसुबे सुरू केले. गुजरातच्या सुलतानाशीं त्याने संधान बांधलें. तो त्याला म्हणाला,

'आपण मुसलमान. एकमेकांचे धर्मबंधु. पण आमच्यांतच मेळ न राहिल्यामुळे गनीम वरचढ होत आहेत. त्यांतल्या त्यांत आपणां दोघांचा दुष्मन् राणा कुंभ हा आहे. आपण दोघे दोन बाजूंनी त्याच्यावर एकदम हल्ला करून त्याची गठडी वळूं या.'

आणि त्या दोघांनी खरोखरच तसें केलें. पण राणा कुंभ धूर्त होता, सावध होता. त्याने त्या दोघांना वेगवेगळ्या ठिकाणी गाठून त्यांचीं हाडें नरम केलीं. त्यांना अपेशाचें काळें तोंड घेऊन परतायला लावलें. त्यानंतर तिसरा उरला तो नागौरचा सुलतान. तो तिथल्या हिंदु प्रजेला छळीत होता, हिंदूंच्या डोळ्यां-देखतां गोहत्या करून त्यांना दुखवीत होता. राणा कुंभाने पंचवीस हजार सैन्यानिशी त्याच्यावर धाड घालून त्याचाहि यथास्थित समाचार घेतला. त्याला पार माळव्यापर्यंत पिटाळूनच तो माघारा फिरला. या लढाईत नागौरचा किल्ला त्याच्या हातीं पडला.

कुंभाच्या दणकट व्यक्तिमत्त्वापुढे अन् त्याच्या संघटित सामर्थ्यापुढे आजू-बाजूच्या या सगळ्या सुलतानशाह्या गलितगात्र होऊन पडल्या. पुन्हा म्हणून कुठल्या सुलतानाने राणा कुंभाची कागाळी काढली नाही. सर्वांना त्याची विलक्षण जरब बसली. रामपूरचा शिलालेख सांगतो, की त्याने मुसल्मान राजकर्त्यांकडून 'हिंदु सुरत्राण' म्हणजेच हिंदूंचा सुलतान अशी किताबत मिळवली होती. शत्रूनेहि किताब देऊन गौरवावें, यावरून राणा कुंभाच्या मोठेपणाची कोणालाहि कल्पना करतां येईल.

श्री. हरिहर वामन देशपांडे लिहितात—

"राणा कुंभाच्या ठिकाणी त्याच्या पूर्वजांचे सर्वच गुण युगपत् वास करीत होते. बाप्पाचा पराक्रम व युद्धचातुर्य, हम्मीरचा दांडगा उद्योग व संतत उत्साह, लाखाराण्याची कला व सौंदर्यप्रीति, चुण्डयाची दीर्घदर्शीता, शहाणपण व प्रजाहिततत्परता, हे सर्व गुण त्याच्या ठिकाणी एकवटले होते. याशिवाय त्याच्या कुशाग्रबुद्धीची मौलिकता तर कांही औरच होती."

त्याने बत्तीस किल्ले बांधले. त्यांतला सर्वश्रेष्ठ किल्ला म्हणजे कुंभलगड. शत्रूवर चौफेर हल्ला चढवण्यासाठी अन् प्रसंगी आत्मरक्षणासाठी त्याच्यासारखा सोयिस्कर किल्ला नव्हता. चितोडगडावरचें कुंभश्याममंदिर आणि राणपूरचें

ऋषभनाथमंदिर हीं त्यानेच बांधलीं. त्याच्या या सर्व बांधावळींतला कौस्तुभमणि म्हणजे चितोडगडावरचा तो कीर्तिस्तंभ! माळवा अन् गुजरात येथील सुलतानांवर त्याने जो प्रचंड विजय मिळवला, त्याचें चिरस्मारक त्याने या कीर्तिस्तंभाच्या रूपाने उभें केलें. पुराणांतले राजे अश्वमेध करीत, राजसूययज्ञ करीत अन् त्या जागीं त्या कृत्याचें स्मारक म्हणून यूप उभारून ठेवीत. राणा कुंभाच्या रणयज्ञाच्या पूर्तीचा हा एक कलासंपन्न यूपच आहे. घो घो वाहणारा मैदानी वारा त्या कलाशिल्पाच्या शिखराला बिलगतो अन् त्याच्याकडून राणा कुंभाची गुणगाथा ऐकून ती दशदिशांना सुगंधासारखी फैलावून देतो.

राणा कुंभाची कारकीर्द गाजली ती अशी. पण त्या धुरंधर पुरुषाचा शेवट मात्र चांगला झाला नाही. कां कोण जाणे; पण आयुष्याच्या अखेरीस तो भ्रमिष्ट झाला. उन्माद रोगाचाच तो प्रकार होता. थोड्याच काळांत त्याची जीवनज्योत स्वाभाविकपणेच मावळली असती. पण त्याचा पुत्र उदयसिंह ऊर्फ उदा याला तेवढा दम धरवला नाही. त्याला राजा होण्याची घाई झाली होती. त्या भरांत त्याने एक दिवस एका तलावाच्या काठीं विमनस्कपणे बसून राहिलेल्या राणा कुंभाच्या पाठींत आपली कट्यार खुपसली.

सारा राजस्थान नव्हे; सारी हिंदु जात राणा कुंभाच्या या दुर्दैवी मृत्यूने हळहळली. उदा मेवाडच्या गादीवर बसला खरा; पण लोक त्याला राजा समजण्याऐवजी खुनी म्हणून धिक्कारूं लागले. थोड्याच दिवसांत राजस्थानांतील सरदार त्याच्याविरुद्ध उठले आणि त्यांनी उदाला पदच्युत करून त्याचा धाकटा भाऊ रायमल्ल याला सिंहासनावर चढवलें. त्याने सुमारे छत्तीस वर्षे राज्य केलें.

त्याच्या मागून त्याचा पुत्र राणा संग अधिकारावर आला. हा राणा संग खूप चढला, वाढला अन् तितकाच शेवटी अपेशीहि ठरला. तो राज्यारूढ झाला, तेव्हा १६ व्या शतकाचें पहिलें दशक संपायला आलें होतें. भारतांत ज्याने मोगल साम्राज्य स्थापलें तो बाबर हा त्यापूर्वी दोनच वर्षे सिंधु नदीच्या तीरावर येऊन थडकला होता. याचा अर्थ बाबर आणि राणा संग या दोघांची कारकीर्द एकाच वेळी झाली असा होतो.

## राणा संग

राणा संगाचें स्थान राजस्थानाच्या इतिहासांत फार उच्च आहे. तो राज्यावर बसण्यापूर्वी मेवाडचा बाह्य दरारा कायम असला तरी राज्यांत अंतःकलह धुमसूं लागला होता. हें लक्षण ठीक नव्हतें. राणा संगाला प्रथम या अंतर्गत कलहांना ताड द्यावें लागलें. तें त्याने समर्थपणें दिलेंहि. त्यानंतर त्याला ईडरवर चालून आलेल्या गुजरातच्या सुलतानाचाहि समाचार घ्यावा लागला. ती लढाई जिंकून तो उत्तरेकडे वळला. दिल्लीच्या राज्यावर अनेक ठिकाणी स्वाऱ्या करून त्याने दिल्लीश्वराच्या सलतनींतले कित्येक प्रदेश आपल्या राज्याला जोडून घेतले.

१५१७ सालीं इब्राहिम लोदी हा दिल्लीच्या गादीवर आला. राज्यावर बसतांच त्याला समोर प्रबळ शत्रु दिसला, तो राणा संग. त्याचा बंदोबस्त करणें हें त्याने आद्य कर्तव्य मानलें. त्यासाठी त्याने फार मोठा फौजफाटा गोळा केला. पुरेशी तयारी होतांच तो मेवाडच्या स्वारीवर निघाला. पण त्या युद्धपिपासू इब्राहिमखानावर राणा संगाने थोडे पुढे जाऊन उलट चढाई केली आणि त्याची खाशी फजिती केली. आपला निभाव लागत नाही असें दिसतांच इब्राहिमने त्याला पाठ दाखवून पलायन केलें. राणा संग दिल्ली-पतीच्या विरुद्ध लढून विजयी झाला.

इब्राहिम लोदीने त्या पराभवाचा सूड उगवण्यासाठी पुनरपि एकदा संगाविरुद्ध उठाव केला; पण त्यांतहि त्याला यश मिळालें नाही. दुसऱ्या बाजूने माळव्याचा सुलतान त्याच्यावर चालून आला; पण तोहि मार खाऊनच परत फिरला. त्याच्याशीं संधान बांधून गुजरातचा सुलतान पुनश्च त्याच्यावर उलटला. पण राणा संगाने त्याचा फिरून एकदा गर्वभार उतरवला आणि त्याला आपले पाय चाटायला लावलें.

अशा प्रकारे सभोवतीच्या साऱ्या सुलतानशाह्यांना निस्तेज आणि हतबल करून राणा संग मेवाडचा मुकुटमणि बनला. त्याने आपल्या राज्याच्या सीमा विस्तृत केल्या. पराक्रमहि मोठा केला. त्याच्याविषयी मित्र काय म्हणतात तें पाहण्यापेक्षा त्याचा महान् शत्रु बाबर काय म्हणतो, तें पाहणें बरें. बाबरने

आपल्या आत्मचरित्रांत राणा संगाच्या पुरुषार्थाविषयी पुढील पंक्ति लिहिल्या आहेत—

"राणा संग आपल्या तलवारीच्या अन् पराक्रमाच्या बळावर फार बलाढ्य झाला होता. माळवा, गुजरात किंवा दिल्ली येथील कोणीहि सुल्तान एकटा त्याचा पाडाव करूं शकत नव्हता. सुमारे दोनशे मशिदी त्याने जमीनदोस्त केल्या. कितीतरी मुसल्मान कैदेंत टाकले. त्याच्या राज्याचें उत्पन्न दहा कोट रुपये होतें. एक लक्ष स्वार त्याच्या सैन्यांत होते.'

याच बाबरची आणि राणा संगाची पुढे मुठभेड झाली अन् राणा संग त्या लढाईत हरला. बाबर अनेक प्रदेश पादाक्रांत करीत दिल्लीवर येऊन थडकला आणि त्याने तिथला सुल्तान इब्राहिम लोदी याला पाणी पाजलें. दिल्ली बाबराच्या हातीं आली. पण तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याइतकी त्याची साम्राज्यतृष्णा सौम्य नव्हती. पण त्यापुढे पाय टाकायचा, तर राणा संग त्याच्यासमोर उभा होता. संगाचें सामर्थ्य तो ओळखून होता. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' या तयारीनेच त्याला राणा संगाशीं टक्कर द्यायला हवी होती. म्हणून शस्त्र चालवण्याच्या आधी त्याने आपली बुद्धि चालवली. राणा संगाकडून वेळोवेळी पराभूत झालेले सगळे मुसल्मान सुल्तान संगाविरुद्ध आपल्याला मदत करतील, असा त्याने होरा बांधला आणि त्याच्या सुदैवाने तो खराहि ठरला. त्याप्रमाणे थोड्याच काळांत राजस्थानाभोवतालच्या साऱ्या मुस्लिम शक्ति बाबराच्या आधिपत्याखाली संघटित झाल्या. आणि मग एक दिवस बाबराने आपलें रणशिंग फुंकलें. १७ मार्च १५२७ रोजीं सिक्रीजवळच्या खानवा मुक्कामीं बाबर आणि राणा संग यांचीं सैन्यें एकमेकांना भिडलीं. युद्धाचा गदारोळ उठला!

तें युद्ध निर्णायक झालें. राणा संगाच्या सेनादळांनी अद्‌भुत पराक्रम केला. पण बाबराच्या एक लाख फौजेपुढे राणा संगाला सपशेल पराभव खावा लागला. बाबराची सद्दी सुरू झाली आणि राणा संगाची संपली. जगांतल्या क्रांतिकारक लढायांत खानवा येथील ही लढाई गणली जाईल, असें श्री. हरिहर वामन देशपांडे म्हणतात. त्या पराभवाने भारतांतली हिंदु जनता कांही काळ तरी गलितगात्र होऊन पडली. तिच्या राजकीय आशाआकांक्षा मरगळून गेल्या. सर्वत्र घन अंधार पसरला!

राणा संग त्या लढाईंत जबर जखमी झाला होता. त्याचा एक पाय लंगडा झाला होता. एक हात तुटला होता. त्याच्या अंगावर एकूण ऐंशी जखमा होत्या असें सांगतात. त्याच्या विश्वासू सैनिकांनी त्याला बाबराच्या हातीं लागूं दिलें नाही. त्यांनी त्याला उचलून मेवाडच्या पहाडांत नेलें आणि योग्य ती शुश्रूषा करून त्याचे घाव भरून काढले. तो पुनश्च उभा झाला. पुनश्च सैन्य संघटित करूं लागला. 'झाल्या पराजयाचें उट्टें काढीन, तेव्हाच चितोड-मध्ये पाय ठेवीन' अशी त्याने प्रतिज्ञा उच्चारली. पण तें उट्टें त्याच्या हातून निघूं शकलें नाही. त्याला तितकें आयुष्यहि लाभलें नाही. १५२८ सालच्या जानेवारींत तो हें जग सोडून निघून गेला. श्री. ओझा त्याच्याविषयी म्हणतात—

'राणा संग हा एक सच्चा क्षत्रिय होता. लहानपणापासूनच प्रतिकूल परिस्थितींत वाढल्यामुळे तो निर्भय, काटक अन् साहसी बनला होता. भारतांतून तुर्कांना हाकलून देण्यासाठी ज्याच्या झेंडयाखाली हिंदु राजे अन् हिंदु सेना गोळा झाल्या असा हा राजस्थानांतला अंतिम हिंदु राजा होय!'

राणा संगानंतर त्याचा पुत्र विक्रमाजित राज्यावर आला. तो दुर्व्यसनी निघाल्यामुळे त्याच्या हातून राज्याचें कांही भलें झालें नाही. आजवर मेवाडच्या गादीशीं निष्ठा धरून राहिलेले राजस्थानांतले सरदार विक्रमाजिताच्या नालायकीला कंटाळून आपापल्या जागी स्वस्थ बसले. बहादुरशहा हा मेवाडचा हाडवैरी. तो मेवाडच्या नाशासाठी टपूनच बसला होता. विक्रमाजिताचे मित्र त्याच्यावर रुष्ट आहेत असें समजतांच १५३४ सालीं त्याने पुनश्च मेवाडवर आक्रमण केलें.

## कर्मवती

कर्मवती ही तेजस्विनी स्त्री विक्रमाजिताची माता होती. आल्या प्रसंगाचें गांभीर्य मुलाच्या आधी तिला उमगलें. तिने सर्व सरदारांना एक हृदयस्पर्शी पत्र लिहून गादीच्या रक्षणासाठी आवाहान केलें. त्याचबरोबर हुमायून बादशहाला राखी पाठवून त्यालाहि आपल्या रक्षणासाठी धावून येण्याबद्दल विनवलें. पण हुमायून तिथे पोचण्याच्या आंतच त्या लढाईचा निकाल

लागला. बहादुरशहा राजपूत सैन्याचा पराभव करून शिरजोर झाला आणि तो आता गडावर कबजा करणार, असें समजतांच राणी कर्मवती हजारो राजपूत स्त्रियांसह जोहार करून दिव्य लोकीं निघून गेली.

हुमायून माळव्याच्या मार्गें चितोडच्या कुमकेला येतो असें समजतांच चितोडगडावर कांही मोजके सरदार ठेवून बहादुरशहा हुमायूनला सामोरा गेला. मंदसोर येथे त्या दोघांच्या लढाईला तोंड लागलें. पण राजपुतांना अजिंक्य ठरलेला बहादुरशहा हुमायूनपुढे फुसका ठरला. हुमायूनने खरपूस मार देऊन त्याला पिटाळून लावलें.

विक्रमाजिताने कांही मुत्सद्देगिरी, कांही तेज दाखवलें असेल, तर तें या वेळी. बहादुरशहाचा पराभव होतो असें समजतांच त्याने चितोडवरच्या मुसलमान सैन्यावर कडाडून हल्ला चढवला आणि त्यांना गडावरून हुसकलें. कर्मवती अग्निदिव्य करून निघून गेली खरी; पण तिच्या पुण्याईने चितोड पुन्हा एकदा वाचलें.

पण या प्रसंगाचा योग्य तो बोध विक्रमाजिताने घेतला नाही. त्याचा उर्मटपणा कमी होण्याऐवजी वाढतच गेला. आपल्या सरदारांना तो कःपदार्थ मानूं लागला. घडोघडी त्यांचा अपमान करूं लागला. त्यामुळे त्याच्याविरुद्ध असंतोषाची आग सर्व राजस्थानांत धुमसत राहिली होती. अखेर एक दिवस ती आग भडकली आणि सर्व सरदारांनी एकजूट करून विक्रमाजिताला गादीवरून उखडून काढलें.

## पन्नादाई

विक्रमाजिताची मोकळी झालेली राज्यगादी त्यांनी त्याचा शैशवावस्थेंत असलेला धाकटा भाऊ उदयसिंह याला बहाल केली. बनबीर नांवाचा पृथ्वीराजाचा एक दासीपुत्र होता. तो बलवान् आहे असें पाहून त्यांनी त्याला उदयसिंहाचा पालक आणि सल्लागार म्हणून नियुक्त केलें. तो बलिष्ठ होता; पण राजनिष्ठ मात्र नव्हता. थोड्याच काळांत तो राक्षसी महत्वाकांक्षेने पेटला आणि त्याने पहिल्याप्रथम विक्रमाजिताला कंठस्नान घातलें. तीच तलवार घेऊन तो उदयसिंहाचाहि खून करायला धावून आला. त्या प्रसंगी त्या

कोवळ्या उदयसिंहाचे प्राण वाचवले ते पन्ना नांवाच्या त्याच्या दाईने. 'कुठे आहे तो कारटा उदयसिंह?' या बनबीराच्या प्रश्नाला उत्तर देतांना तिने अंगुलिनिर्देश केला तो उदयसिंहाकडे नव्हे; तर त्याच्या शेजारी झोपलेल्या आपल्या पोटच्या गोळ्याकडे! बनबीराची तलवार तिच्या पोराच्या उरांत घुसली. तो मेला; पण मेवाडचा राजवंश शाबूद राहिला. पन्नादाईच्या या त्यागाला अन् कर्तव्यनिष्ठेला तोड क्वचितच सापडेल.

आपण उदयसिंहाला ठार करून निष्कंटक झालों, अशा समजुतीने बनबीर परत फिरतांच पन्नादाई त्या बालजीवाला पोटाशीं धरून गुपचूपपणे गडाखाली उतरली. तिने सरळ कुंभलगडाचा रस्ता धरला. तिथल्या रावळ राजाच्या आश्रयाला राहून तिने उदयसिंहाची जिवापलीकडे जपणूक केली.

कित्येक वर्षें हा बनाव राजस्थानांत कोणालाच कळला नाही. बनबीरा-प्रमाणेच राजस्थानांतले लोकहि समजत होते, की उदयसिंह मारला गेला. त्यामुळे बनबीर उन्मत्त झाला होता आणि लोक दबून राहिले होते. बन-बीराला स्वर्ग ठेंगणा झाला होता आणि लोकांना त्याची राजवट जळत्या नरकासारखी असह्य झाली होती. उदयसिंह सोळा वर्षांचा झाल्यावर मग एक दिवस राज्यांत बातमी पसरली, की उदयसिंह मारला गेला नसून तो कुंभलगडावर सुरक्षित आहे. त्यासरशी सर्व राजस्थानांत हर्षाचें उधाण आलें. मग दबून राहिलेल्या सरदारांच्या अंगांत हत्तीचें बळ आणि सिंहाचें शौर्य संचरलें. त्यांनी तात्काळ एकजूट करून बनबीराला गादीवरून खाली ओढलें आणि उदयसिंहाला सन्मानाने वाजत गाजत चितोडला आणून राज्यावर बसवलें.

१५३७ सालची ही घटना आहे. तिथून पुढे ३० वर्षें उदयसिंह मेवाडच्या गादीवर राहिला. या काळांत मेवाडवर कोणाचेंहि परचक्र आलें नाही. खरें म्हणजे मोडलेली घडी नीट बसवायला, राज्याला बळकटी आणायला हा काळ अत्यंत अनुकूल होता. पण उदयसिंहाच्या हातून यांतलें कांहीहि झालें नाही. त्याच्या अंगीं ती कुवतच नव्हती. ख्यालीखुशालींत रमणें एवढेंच त्याला जमत होतें आणि तें तेवढें त्याने मनसोक्त केलें.

त्यामुळे १५६७ सालीं अकबरासारख्या मातबर बादशहाने जेव्हा मेवाड गिळंकृत करायचें ठरवून त्याच्यावर आपला सेनासागर लोटला, तेव्हा उदयसिंह गांगरूनच गेला. त्याच्याजवळ कसलीहि सिद्धता नव्हती. होती ती फक्त दोन नररत्नें. एक जयमल राठोड आणि दुसरा पत्ता सिसोदिया. ते श्रेष्ठ धारिष्ट्याचे पुरुष होते. त्यांनी उदयसिंहाला सल्ला दिला, की त्याने पहाडांत पळून जाऊन आपला जीव वाचवावा. उदयसिंह त्या गोष्टीला कबूल झाला. त्याला खरें म्हणजे तेंच हवें होतें. दुसरा कर्तव्यतत्पर राजा असता, तर त्याने लगेच म्हटलें असतें, 'तुम्हांला मरणाच्या तोंडीं देऊन मी जीव वाचवूं? तें कदापि शक्य नाही. जगलों तर तुमच्याबरोबर जगेन; मेलों तरीहि तुमच्या-बरोबर मरेन!'

पण उदयसिंहाच्या मुखांतून हे कणखर शब्द निघाले नाहीत. त्याने जयमल आणि पत्ता या दोघांना सेनापति नेमून सर्व अधिकार त्यांच्या हवालीं गेले आणि एका रात्रीं तो गुपचुप अंधारांत अदृश्य झाला.

मग अकबराच्या मुसंडीला तोंड दिलें तें जयसिंह आणि पत्ता या दोघांनी. पण ताज्या दमाच्या आणि 'मेवाड घेईन तरच नांवाचा' अशा जिद्दीने स्वतः रणक्षेत्रांत उतरलेल्या अकबरासारख्या शत्रूपुढे त्या दोघांचा टिकाव लागला नाही. ते दोघे मरेपर्यंत लढले अन् मरून अमर झाले. त्यानंतर अकबराने चितोड सर केलें. तिथून पुढे रणथंबोरचा अजिंक्य किल्लाहि जिंकून त्याने 'जैत रे जैत' म्हटलें.

उदयसिंह एकदा जो गडाखाली उतरला, तो पुनश्च कांही गडाला पाय लावूं शकला नाही. त्याने नंतर कैलाशपुरीच्याजवळ, पर्वतवेष्टित भूमीवर, पिशोला तलावाच्या काठीं आपल्या नांवाने एक नगर उभारलें आणि तिथे आपली नवी राजधानी स्थापली. तेंच सांप्रतचें उदयपूर होय.

चितोडच्या पराभवानंतर उदयसिंह चार पांच वर्षे जीवन्मृताचें जिणें जगला. १५७२ सालीं तो मरण पावला. त्याच्यामागून गादीचा कायदेशीर वारस प्रतापसिंह हा होता. पण मरते वेळी उदयसिंहाने तीहि न्याय्य गोष्ट डावलली आणि जयमल नांवाच्या आपल्या नवव्या पुत्राला युवराजपद दिलें. कारण तो त्याच्या आवडत्या राणीचा पुत्र होता.

पण त्याची लायकी काय ती ओळखून राजपूत सरदारांनी त्याला औटघटकेचेंहि राज्य भोगूं दिलें नाही. कारण त्यांच्या डोळ्यांसमोर राणा प्रताप हा हिरा चमकत होता. जयमलला पदच्युत करून त्यांनी त्या सिंहासनावर प्रतापसिंहाची प्रतिष्ठापना केली. महाराणा प्रतापसिंह म्हणून ज्याचें नांव भारताच्या इतिहासांत गाजतें आणि पुण्यश्लोक नृपावळींत ज्याची गणना केली जाते तोच हा धुरंधर महापुरुष होय.

## राणा प्रताप

राणा प्रताप अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत मेवाडच्या गादीवर आला. त्याच्या काळांत मेवाडच्या भाग्यचंद्राला क्षयपक्ष लागला होता. आजवर झालेल्या अनेक लढायांत मेवाडच्या तरुण पिढीचें मोठ्या प्रमाणावर बलिदान झालें होतें. बहुतेक मोक्याच्या गडांवर मोगली ध्वज फडकत होता. बहुसंख्य राजपूत सरदार आणि सामंत अकबराचें मांडलिकत्व पत्करून त्याचे गुलाम बनले होते. जोधपूरच्या राठोड राजाने अकबराला आपली मुलगी देऊन त्याच्याशीं मैत्री जोडली होती. मानसिंहासारखा शूर सेनापति आणि मुरब्बी मुत्सद्दी आपला स्वाभिमान गुंडाळून ठेवून अकबराच्या गोटांत शिरला होता. अकबराच्या कृपाकटाक्षासाठी सर्व राजपूत राजे त्याच्यापुढे गोंडा घोळीत होते.

पण हें सर्व पाहून, पारखूनहि न कचरता एकटा राणा प्रताप अकबराने जिंकलेला मेवाड परत मिळवण्यासाठी त्याच्याविरुद्ध दंड थोपटून उभा राहिला. अकबरासारख्या सर्व दृष्टींनी मातबर असलेल्या शत्रूशीं सामना देण्याइतकें द्रव्यबळ आणि सैन्यबळ त्याच्यापाशीं नव्हतें. त्याच्यापाशीं होता तो एक जाज्वल्य स्वाभिमान ! तो आपल्या अदम्य आत्मिक बळावरच एका अतुबळी सम्राटाशीं झुंज घ्यायला निघणार होता. त्यासाठी त्याने सर्व राजभोग तुच्छ केले. सर्व सुखें लाथाडलीं. तो उदयपूर सोडून पहाडांच्या आश्रयाला गेला. तिथें त्याने प्रथम तिथल्या भिल्लांची संघटना बांधली. शेकडो भिल्ल जवान त्याच्या झेंड्याखाली मरण–मारणासाठी उभे झाले. ज्यांना देशाची अन् धर्माची थोडीबहुत लाज होती, असे कांही राजपूत सरदारहि त्याला

येऊन मिळाले. राणा प्रतापने त्यांच्यासमोर एक घनघोर प्रतिज्ञा उच्चारली. ती जणु दुसरी भीष्मप्रतिज्ञाच होती —

" चितौड का उद्धार कर
विध्वंस कर यवनध्वजा।
शिसौदिया कुलकेतु
फहरा न दूं डंका बजा॥
तब तक न शय्याशयन
नृपप्रासाद वास करूं कभी।
यह प्रण किया मैंने
सुनो सरदारगण श्रुति दे सभी॥"

'ऐकलेंत माझ्या सरदारांनो! जोवर चितोड मुक्त झालें नाही, जोवर तिथला यवनध्वज मोडून शिसोदिया वंशाचा आदित्यध्वज तिथे फडकला नाही, जोवर त्या विजयाचा डंका वाजला नाही, तोवर राजप्रासादांत वास्तव्य करणें नाही आणि शय्येवर शयन करणें नाही!'

राणा प्रतापची ही असामान्य प्रतिज्ञा त्याच्या सरदारांनीहि मान्य करून घेतली. नंतर राणा प्रतापने आणखी एक परिणामकारक गोष्ट केली. अकबराचे गुलाम बनलेल्या सर्व राजपूत घराण्यांशीं असलेले आपले संबंध तोडून टाकले. त्यांच्यावर जातीय बहिष्कार घातला आणि जो जातीचा राजपूत असेल त्या प्रत्येकाने हा बहिष्कार आचरावा, असें सर्वांना आवाहन केलें.

या आवाहनाने वादळी वाऱ्यासारखें काम केलें. त्यामुळे समग्र राजस्थानांत देश आणि धर्म यांच्या अभिमानाची लाट उसळली. जनतेच्या मनांत त्या भ्रष्ट, देशघातकी राजपूत राजांविषयी आणि सरदारांविषयी घृणा उत्पन्न झाली. जनतेच्या अंतरांत ते भ्रष्ट वृत्तीचे गुलाम नीच ठरले आणि त्या मानाने राणा प्रतापचें स्थान उंचावलें.

राणा प्रतापचें सामर्थ्य अशा प्रकारे दिवसेदिवस वाढूं लागलें. थोड्याच काळांत या सर्व गोष्टी अकबराच्या कानावर गेल्या. त्यामुळे त्याच्या मस्तकांत तिडीक उठली. त्याने लगेच ठरवलें, की राणा प्रतापचें मानमर्दन करून त्याला आपल्या पायांशीं आणायलाच हवें. त्यासाठी अकबर स्वतः त्या

मोहिमेवर निघाला. अजमेरपर्यंत येऊन थडकला. तिथून पुढें त्याने राणा प्रतापच्या अंगावर घातलें तें मानसिंहाला. तो जातीचा राजपूत अकबराच्याच लष्कराच्या भाकऱ्या भाजायला निघाला होता.

मानसिंह ताज्या दमाने चालून येतो असें समजतांच राणा प्रतापने कुंभलमीर गडाचा आश्रय घेतला. त्याने शत्रूला सरळ सामना न देता गनिमी काव्याने तोंड दिलें. पहाडांच्या खिंडीखिंडींत चोपून काढलें. त्याने अनेक ठिकाणी शत्रूची रसद मारून ती स्वतःसाठी मिळवली. सर्व बाजूंनी मानसिंहाच्या फौजेची दाणादाण उडवून दिली. त्यानंतर मानसिंहाला चहू बाजूंनी घेरीत घेरीत त्याने हळदीघाटाच्या खिंडींत पकडलें.



राणा प्रताप

तिथे लढाईला खरें तोंड लागलें. हळदीघाटाचा युद्धप्रसंग म्हणजे राणा प्रतापच्या जीवनांतलें एक तेजस्वी प्रकरण होय. त्या रणांगणांत तो आपल्या चेतक घोड्यावर स्वार होऊन एकदम पुढे घुसला. प्रतापचें तें एक विलक्षण साहस होतें. तो जीवघेणाच प्रसंग होता. हें साहस आचरिण्याचें एकमेव कारण म्हणजे मानसिंह! अकबरापेक्षाहि प्रतापचा त्याच्यावर कडवा राग होता. कारण तो देशद्रोही होता. स्वहस्तें त्याचा निकाल लावून एक जितेजिवतें पातक जगांतून नष्ट करावें, असें प्रतापला वाटत होतें.

मानसिंह हत्तीच्या पाठीवरून सैन्यसंचालन करीत होता. प्रतापचा चेतक विद्युद्वेगाने पुढे येऊन त्याच्या हत्तीला भिडला. पाठोपाठ प्रतापचा भाला मानसिंहाच्या रोखाने घुसला. पण मानसिंह सावध होता. त्याने आत्मरक्षणार्थ मान वाकवून शरीर तिरकें केलें. त्यामुळे तो भाला त्याच्या छाताडांत घुसायच्या ऐवजी बरगडीला चाटून गेला. प्रतापला त्यापुढचा आक्रमक पवित्रा टाकायला मिळायच्या आंतच सगळें मोगल सैन्य त्याच्याभोवती घेरून आलें. राणा प्रताप जणु चक्रव्यूहांत सापडला. पण अभिमन्यूला जें साधतां आलें नाही, तें प्रतापने साधलें. त्याच्या लाडक्या चेतकने त्या वेळी विलक्षण अवसान दाखवलें. तो जखमी झाला होता तरी जिवाच्या कराराने तो उधळला आणि त्याने आपल्या धन्याला सुरक्षित त्याच्या गोटांत आणून उभें केलें. प्रतापने त्याच्या पाठीवरून खाली उडी टाकली मात्र; त्या इमानी जनावराने धरणीवर अंग टाकून आपला प्राण सोडला.



हळदी घाट

तिथून पुढे राणा प्रतापने आपली आघाडी उघडली आणि मानसिंहाच्या सैन्याची मिळेल त्या ठिकाणी लांडगेतोड चालवली. त्यामुळे मानसिंहाच्या आघाडींत पांगापांग झाली. जो तो सैनिक संधि मिळेल तिथून पळत सुटला. मानसिंहाला काय धरावें अन् काय सोडावें, हें उमजेनासें झालें. त्या लढाईत मानसिंह प्रतापच्या तडाख्यांतून वाचला खरा; पण त्याला विजय मात्र मिळाला नाही. तो भग्न, हताश होऊन गोगुंद्याहून परत अजमेर येथे

अकबराच्या छावणींत आला. या त्याच्या पळपुट्या शौर्याने अकबर त्याच्यावर बराच नाराज झाला, हें काय सांगायला हवें ?

मग मानसिंहाला बाजूला करून अकबराने मोहिमेचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. अजमेरचा तळ उठवून तो गोगुंद्याला येऊन डेरेदाखल झाला. त्यानेहि सतत सहा महिने राणा प्रतापचा पिच्छा पुरवला. पण मानसिंहाल जें मिळालें त्यापेक्षा अकबरालाहि कांही वेगळें मिळालें नाही. त्यालाहि निराशेने दातओठ खात तिथून काढता पाय घ्यावा लागला. अकबराची पाठ वळतांक्षणीच राणा प्रतापने पहाडी मुलखांतून बाहेर पडून अकबराने जिंकलेलीं सर्व ठाणीं पुनश्च आपल्या कबजांत घेतलीं.

त्यामुळे परांच्या गादीवर निजत असूनहि त्याची झोप उडाली. कंसाला कृष्ण दिसावा तसा त्याला जळीं स्थळीं, ध्यानीं मनीं प्रताप दिसूं लागला. त्याची त्या बाबतींत एक माफक इच्छा होती. राणा प्रतापने 'बादशहा' म्हणून एकवार स्वतःला कुर्निसात करावा. आणि मग मांडलिक म्हणून मेवाडचें राज्य करावें. पण राणा प्रतापच्या तोंडून 'बादशहा' हा शब्द कधीहि बाहेर पडला नाही. तो अकबराला यावज्जीव 'तुर्क'च म्हणत राहिला. आणि अकबरालाहि तीच गोष्ट सदैव सलत राहिली.

तें शल्य उपटून निघावें म्हणून त्याने आपले एकाहून एक मातबर सरदार प्रतापवर घातले. सतत चौदा वर्षें असा प्रतापचा पिच्छा पुरवला. पण त्या सगळ्या आक्रमणांना राणा प्रताप पुरून उरला. मोगली फौजांनी अविरत हैदोस घालून मेवाडचा बहुतेक सपाटीचा प्रदेश काबीज केला. पण त्या प्रदेशावरहि राणा प्रतापने अकबराला सुखाने राज्य करूं दिलें नाही. १५८४ सालापर्यंत राणा प्रतापने चितोड व मंगळगड सोडून उदयपुरासह बाकीचा सर्व मेवाड पुनश्च आपल्या ताब्यांत आणला.

या चौदा वर्षांच्या अवधींत राणा प्रतापचें तेज काय आहे, तें अकबराला कळून चुकलें. त्याला नमवण्याच्या घोरांदर प्रयत्नांत अकबराच्या खजिन्याचें दिवाळें निघायची वेळ आली. यापुढे प्रतापच्या वाटेला जाणें म्हणजे दगडावर डोकें आपटून घेणें, हें अकबराला चरचरीत डाग बसावा, तसें कळलें. त्यानंतर त्याने राणा प्रतापवर चढाई करण्याचें साहस केलें नाही.

त्यामुळे राणा प्रतापला थोडेंबहुत स्वास्थ्य लाभलें, ही गोष्ट खरी; पण त्या स्वास्थ्याचें त्याला काडीमात्र सुख नव्हतें. त्याला चितोड परत मिळवायचें होतें. आपल्या सूर्यवंशाचा ध्वज पुनश्च त्या किल्ल्यावर फडकवायचा होता.

ही गोष्ट घडत नाही तोवर चितोडच्या यवनकृत पायमल्लीचें उट्टें निघणार नव्हतें. तोवर राजपूत जातीचा यशोगौरव प्रस्थापित होणार नव्हता. आणि तोवर प्रतापची प्रतिज्ञाहि पूर्ण होणार नव्हती. पण तीच गोष्ट अवघड होती. अकबराने गिळलेलें चितोडचें माणिक त्याच्या जबडयांतून ओढून काढण्याइतकें सामर्थ्य त्याच्यापाशीं शिल्लक उरलें नव्हतें. तो त्यासाठी अहर्निश तळमळत होता, तयारी करीत होता, अनुकूल संधीची वाट पाहत होता. पण त्याच्या आयुष्यांत ती अनुकूल संधि, तो सोनियाचा दिवस त्याला दिसला नाही.

राणा प्रतापला एकूण सतरा पुत्र होते. अमरसिंह हा त्या सर्वांत वडील. प्रतापच्या मागून देशसंरक्षणाची धुरा त्याच्या मानेवर यायची होती. पण तो आपलें 'असिधाराव्रत' चालवील आणि चितोड परत मिळविण्याविषयी जिवाची शर्थ करील, याची त्याला खात्री नव्हती. प्रतापचें अंतर्दुःख यामुळे अधिक गंभीर आणि वेदनामय झालें होतें. त्याचा अंतरात्मा जणु तुषाग्नींत जळत होता.

१५९७ सालीं राणा प्रतापनें इहलोक सोडला. त्याला आतडयाचा विकार जडला. निमित्त झालें वाघाच्या शिकारीचें. त्या शिकारींत धावतां पळतांना कुठे तरी त्याच्या आतडयाला पीळ पडला आणि तेंच दुखणें पुढे बळावलें. प्रताप मृत्युशय्येवर पडला. पण गात्रें गार आणि निश्चेष्ट पडत चाललीं तरी त्याचा पवित्र प्राण मात्र देहांतून बाहेर पडेना. 'महाराज, आपला प्राण कां घुटमळतो ?' असें त्याच्या जवळच्या सरदारांनी त्याला विचारलें. त्यावर राणा प्रतापच्या मरत्या वाणींतून अस्पष्ट असे शब्द उमटले, 'चितोड... !'

त्यावर सरदारांनी प्रतिज्ञापूर्वक त्याला अभिवचन दिलें, 'महाराज, आपण सुखाने स्वर्गवासी व्हा. आमच्या जिवांत जीव असेतो आम्ही चितोडच्या मुक्तीसाठी झगडत राहूं.' आणि तेवढे शब्द ऐकतांच राणा प्रतापचें शांत अवस्थेंत प्राणोत्क्रमण झालें!

राणा प्रताप गेला ; पण आपला प्रताप, आपली जिद्द, आपला चारित्र्यवान् आदर्श मागे ठेवून गेला. त्याने प्रादेशिकतेच्या मर्यादा तेव्हाच ओलांडल्या. तो केवळ राजस्थानाचा पूजाविषय न राहतां अखिल भारताचा प्रातःस्मरणीय राष्ट्रपुरुष ठरला. जोवर भारतांत वीरपूजा चालू राहील, तोवर त्या पूजेंत प्रत्येक भारतीयाला राणा प्रतापच्या पुण्यस्मृतीवर एक भावपुष्प वाहावेंच लागेल !

प्रा. इंद्र म्हणतात : जगाच्या इतिहासांत वीरतेचीं उदाहरणें असंख्य आहेत ; पण चितोडच्या संरक्षणासाठी राजपुतांनी जें शौर्य धैर्य प्रकट केलें, तें खरोखरच अतुलनीय आहे. ते हरले, पराजित झाले ; पण इतिहासांत तेच विजयी समजले जातील. ज्यांना प्रत्यक्ष विजय मिळाला तेच खरे इथे पराभूत आहेत. प्रचंड हत्तींची पुढे भिंत उभी करून त्यांनी राजपुतांचा पाडाव केला आणि निरपराध स्त्री-पुरुषांच्या हत्येचें पाप मात्र आपल्या माथीं घेतलें.


शेकडो वर्षे त्यांच्यावर घोर आणि भयानक अत्याचार झाले. पण तरी त्यांचें सत्त्व मेलें नाही. त्यांनी आपला धर्म सोडला नाही. विपत्तीच्या सहाणेवर आपलें खड्ग पाजळून ते आक्रमकांशीं समराला उभे ठाकले. उत्तर–पश्चिम भारताच्या भूमीला त्यांनी आपल्या पवित्र रक्ताचा अभिषेक केला. रस्त्यारस्त्यांत खिंडीखिंडींत त्यांचीं कबंधें पडलीं आहेत. राजस्थानांतला प्रत्येक किल्ला त्यांच्या बलिदानाची साक्ष द्यायला अजून खडा आहे. ते सारे गडकोट म्हणजे राजपुतांच्या अनंत स्मृतींचीं भांडारें आहेत.

राजपुतांना भूमीचें विलक्षण प्रेम वाटतें. लहानसा का होईना ; पण भूमीचा एखादा तुकडा आपल्याजवळ असावा, ही प्रत्येकाची आकांक्षा असते. भूमि नसेल, तर तो स्वतःला राजपूत समजायलाहि संकोचतो. आपली भूमि कोणी छिनून नेतो असें दिसलें, की राजपूत आपलें शिर तळहातावर घेऊन त्याचा प्रतिकार करायला उठतो. तो त्यांच्या रक्ताचा गुणधर्म आहे. तिथल्या एका लोककवीने एक दूहा लिहून राजपुतांचीं तीन मर्मस्थानें सांगितलीं आहेत.

वर जातां भ्रम पलटतां
त्रियां पडन्ता नाव

तीन दिवस ये मरण रा,
कूण रंक कुण राव

घर किंवा जमीन हातची जायला निघाली, धर्मांतराचा प्रसंग ओढवला आणि स्त्रियांच्या अब्रूवर घाला आला, की प्रत्येक राजपूत आपल्या जिवावर उदार होतो. मग तो राव असो वा रंक असो!



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3६२८०० वि:
क्रमांक 332 नों: दि:



# भाट-चारण

भाट आणि चारण ह्या राजस्थानांतल्या दोन प्रमुख जाती. राजपुतांच्या आश्रयाने त्या वाढल्या, वावरल्या. राजस्थानाच्या इतिहासांत तर त्यांचा हात वावरलेला आहेच; शिवाय तो इतिहास जतन करून पुढील पिढ्यांना सादर करण्याचेंहि फार मोठें कार्य ह्या दोन जातींनी केलें आहे. त्यांपैकी प्रथम आपण भाटांची थोडी भाटगिरी करूं.

**भाट**

मूळ संस्कृत शब्द 'भट्ट'. त्यावरून सांप्रतचा भाट शब्द बनला आहे, असें सांगतात. भाट शब्दाचाच 'बारहट' असा आणखी एक अपभ्रंश झाला आहे. ह्या बारहटांच्या चातुर्याच्या, लुब्रेपणाच्या अन् लोभीपणाच्या कितीतरी गोष्टी राजस्थानी लोकांत कर्णोपकर्णी चालतात. वैदिक काळांत जे गाथागायक होते, त्यांचीच ही संतति असावी, असें कांही संशोधकांचें मत आहे. महाभारतांत ब्रह्मराव, सूत, मागध, बंदी इत्यादि नांवांनी उल्लेखिले जाणारे लोक हेच असावे, असेंहि म्हणतात.

आपला मूळ पुरुष 'कवि' नांवाचा एक ऋषि होता, असें स्वतः भाटांचें म्हणणें आहे. ते आपल्याला ब्राह्मण समजतात. यज्ञोपवीत घालतात. स्वतःची अशी एक वेदशाखाहि सांगतात. पण कित्येक समाजशास्त्रज्ञ त्यांना ब्राह्मण मानीत नाहीत. कित्येक मानतात आणि सांगतात, की भाट हे मूळचे ब्राह्मणच ; पण त्यांचा दीर्घकाळ राबता राजपूत क्षत्रियांच्याकडे झाल्याने ते ब्राह्मणकर्तव्यांपासून च्युत झाले, आचारहीन झाले.



भाट

भाटांच्या उत्पत्तीची आणखी एक लोककथा सांगितली जाते. शिवपार्वती हीं जगाचीं मातापितरें कैलासावर राहणारीं. शिव सदा ध्यानमग्न; त्यामुळे

पार्वतीला एकटेपण जाचूं लागलें. तिला कुठेच करमेनासें झालें. शिवाला तिच्यासाठी कांहीतरी सोय — साधन करण्याची गरज निर्माण झाली. त्याने मग आपल्या निढळाच्या घामांतून एक पुरुष निर्माण केला. तोच पुरुष आजच्या भाटांचा पूर्वज ! शिवाने त्याला आज्ञा दिली — ‘ कांही तरी शब्दांची खटपट कर, कांहीतरी स्तुतिस्तोत्र रच आणि पार्वतीचा कंटाळा घालव. ’ पण तो भाट असा कांही कर्मदरिद्री निघाला, की तो पार्वतीच्या मनःप्रसादाचें ब्रह्माक्षर तोंडांतून काढीना. सदान् कदा त्याची आपली शिवाची चर्पटपंजरी. अर्धांगीच्या कपाळावर आठ्या ठेवून स्वतःचें स्तवन सदैव ऐकून घेणें शिवालाहि शक्य नव्हतें. त्याने त्या भाटाला दिला एक धक्का आणि ती स्वारी मृत्युलोकीं कोसळली. तिथून पुढे पृथ्वीवर त्यांची वंशवेल विस्तारली.

भाट आणि चारण दोन्ही एकच, अशी सर्वसामान्य समजूत आहे ; पण ती बरोबर नाही. ते जातीने एक नाहीत, तसे वृत्तीनेहि एक नाहीत. भाट हे केवळ राजपूत राजांच्या वंशावळी ठेवणारे आणि त्यांचे स्तुतिपाठक तर चारण हे त्या राजपुतांच्या गुणांना सुवर्णझळाळी देणारे शाहीर. दोघांचीहि कामगिरी आपल्यापरी मोठीच.

राजपुतांचा शेकडो वर्षांचा इतिहास भाटांच्या चाडांतून आजहि सुरक्षित आहे. राजांकडून विडा घेण्याचा मान ह्यांना प्राप्त आहे. राजपूत राजे त्यांना उच्चासनावर बसवीत. त्यांना मिष्टान्न जेवायलाहि वाढीत. भाट जेवला तर तो कधी आपलें ताट उचलायचा नाही. तें ताट यजमानाने उचलायचें, अशी प्रथा आहे. यजमानाच्या घरीं होणाऱ्या लग्नादि मंगल कार्यांत ह्यांना इनाम मिळतें. नारदासारख्या ह्यांना चारी दिशा मोकळ्या ! कुठेहि गेले, तरी ह्यांचें आपलें स्वागतच ; त्यांच्या वाटेला कोणी जायचा नाही, त्यांना कोणी अडवायचा नाही.

ह्यांचा रुबाबहि पाहण्याजोगा असतो. हातांत उंच दांड्याचा भाला. त्याला रंगीबेरंगी रुमाल बांधलेले. कट्यार ही जणु त्यांची दुसरी अर्धांगीच. ती कमरेच्या शेल्यांत सदैव तोंड खुपसून बसलेली असते. दाढी वाढून छातीवर रुळते. मिशांच्या कल्ल्यांवर लिंबें ठेवून द्यावीं. अंगांत लांब अंगरखा अन् डोक्याला फेटा.

केव्हाहि अन् कुठेहि आत्मत्यागाची तयारी हा त्याचा जातिस्वभाव ! त्यांचा हा आत्मकठोर स्वभाव लक्षांत घेऊनच राजे-महाराजे खजिना इकडून तिकडे जातांना त्याचे संरक्षक म्हणून भाटांना बरोबर पाठवीत. चोर-लुटारूंना त्यांची विलक्षण दहशत वाटायची. जंगलाच्या रस्त्यांत चोर तुटून पडले, तर भाट प्रथम त्यांना आपल्या कर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत. तो नच साधला, तर कट्यार उपसून आपल्या छातींत भोसकून घेत आणि प्राणत्याग करीत. आणि ह्याच गोष्टीला ते लुटारू घाबरत. त्यांना वाटे, की हे मेलेले भाट भूत होतील अन् जन्मभर आपली मानगूट पकडून बसतील.

भाटांच्या अशा आत्मबलिदानाचे अनेक प्रसंग राजस्थानाच्या आणि सौराष्ट्राच्या इतिहासांत घडले आहेत. त्यांनी जिथे जिथे प्राण पाखडले, तिथे तिथे वीरशिळा उभारलेल्या दिसतात. त्यांना तिकडचे लोक पाळिये म्हणतात. ह्या शिळांवर त्या भाटाच्या नांवागावासह त्या प्रसंगाचा इतिहास खोदलेला असतो.

१९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत राजस्थान आणि सौराष्ट्र ह्या प्रदेशांत प्रत्येक महत्त्वाच्या दस्तऐवजावर भाटाची सही-साक्ष घेत. भाटाची सही नसली, तर त्या कागदाला चिठोऱ्याची किंमत ! १८०७ सालीं कर्नल वॉकरने सौराष्ट्रांतील संस्थानिकांकडून जामिनखतें लिहून घेतलीं त्या सर्वांवर साक्षीदार म्हणून भाटांच्या सह्या आहेत. समाजांत अन् राजदरबारीं एवढा विश्वास संपादणें म्हणजे कांही सामान्य गोष्ट नव्हे.

भाटांमध्ये बरेचसे पोटभेद आहेत. त्यांतले ब्रह्मभाट हे श्रेष्ठ समजले जातात. ते इतर भाटांच्या घरीं आपल्या मुली देत नाहीत, त्यांच्या हातचें खात नाहीत. 'राणीमंगा' ही दुसरी एक पोटजात. हे लोक राजमहिषींच्या वंशावळी ठेवतात आणि त्यांच्याकडून इनामे पटकावतात. ह्याशिवाय प्रत्येक राजपूत ठाकोराचा एकेक कुळभाट असतो. तो वर्षांतून एकदा यजमानाच्या घरीं येतो. त्याची कुळकथा त्याला ऐकवतो, त्या वर्षांतलीं त्या घरांत झालेलीं जन्म मरणें नोंदून घेतो अन् बिदागी घेऊन निघून जातो.

बरेचसे भाट भीक मागण्याचाहि धंदा करतात. ते दिवसभर शहरांत किंवा गावांत हिंडतात, गाणीं म्हणतात, गोष्टी सांगतात अन् आपली रोजकीर्द

चालवतात. भाटांपैकी बरेचसे लोक शाक्त आहेत. कांही कबीर पंथाचे, तर कांही रामानुज पंथाचेहि अनुयायी झाले आहेत. गौरीपति, बडे वीर अन् शारदा ह्या त्यांच्या उपास्य देवता आहेत.

## चंबरदाई

चोचू नांवाचा एक पुरुष बाराव्या शतकाच्या अखेरीस जन्मला, तो भाट समाजांतला पहिला कवि होय. त्याने बगडावत बंधूंवर एक प्रचंड वीरकाव्य लिहिलें आहे. दुसरा महान् कवि म्हणजे चंदबरदाई. तोहि जातीने भाटच होता. तो जन्मला पंजाबांत पण वाढला राजस्थानांत. पृथ्वीराज चौहानांचा तो दरबारी कवि होता. आणि त्याहून अधिक म्हणजे तो पृथ्वीराजाचा जिवलग मित्र होता. दोघेहि एकाच वर्षी एकाच तिथीला जन्मले असें सांगतात. पृथ्वीराजाच्या लोकोत्तर गुणांवर तो लुब्ध होता.

त्या प्रेमांतूनच त्याचें ‘ पृथ्वीराज रासो ’ हें ६७ समयांचें किंवा अध्यायांचें प्रबंध-काव्य निर्माण झालें. हें समग्र काव्य संवादांतून विस्तारलें आहे. चंदला दोन बायका होत्या. त्यांतली गौरी नामक भार्या ही त्याची आवडती होती. तिला त्याने काव्यांत गुंफून टाकलें आहे. पार्वतीने प्रश्न करावा आणि शिवाने उत्तरादाखल एखादी कथा सांगावी, त्याप्रमाणे इथेहि गौरी जिज्ञासू बुद्धीने प्रश्न करते आणि चंद तिला काव्यमय उत्तर देऊन तिचें समाधान करतो.

“ पृथ्वीराज रासो ”ला काव्यमूल्य मोठें असलें, तरी त्या मानाने ऐतिहासिक मूल्य कमी आहे. कारण कवीने त्यांत कितीतरी प्रसंग स्वतःच्या कल्पनेंतूनच घातले आहेत आणि कित्येक घटना अतिशयोक्तीने वर्णिल्या आहेत. इतिहास असें सांगतो, की शहाबुद्दिन घोरीशीं झालेल्या लढाईंत पृथ्वीराज पडला आणि शहाबुद्दिनला दिल्लीवर अधिकार मिळाला. पण चंदबरदाईला पृथ्वीराजाचा असा साधा धोपटमार्गी शेवट आवडला नाही आणि म्हणून त्याने पृथ्वीराजाच्या जीवनाचा तो अखेरचा अध्याय अगदी वेगळ्या तऱ्हेने लिहिला.

घनघोर लढाई झाली. त्यांत पृथ्वीराजाचा पाडाव झाला. घोरीने त्याला कैद केलें आणि गझनीला नेलें. तिथे त्यानें प्रथम त्याचे डोळे काढले अन् मग त्याला कैदखान्यांत डांबून टाकलें. ह्या दुर्घटनेचा चंदबरदाईच्या जिवाला घोर लागला. त्याला मित्राविना जीवन कंठवेना. कशाहि प्रकारें कां होईना

पण पृथ्वीराजाला घोरीच्या यमयातनांतून ' मुक्त ' केलेंच पाहिजे, असें त्यानें मनाशीं ठरवलें. तो मजल दर मजल करीत गझनीच्या मार्गाला लागला. एक दिवस घोरीच्या राजद्वारीं जाऊन उभा ठाकला. आपल्या वाक्चातुर्यानें त्यानें शहाबुद्दिनला मोहिनी घातली. त्यानें आपलें चरम उद्दिष्ट साधण्यासाठी कूर्मवृत्ति स्वीकारली. तो शहाबुद्दिनच्या दरबारांत मानानें बसूं लागला. भाटगिरी करून त्याला खूप करूं लागला. त्यानें घोरीच्या परवानगीनें एकदा पृथ्वीराजाची भेटहि घेतली. दोन जिवलग मित्रांच्या त्या भेटीचें वर्णन कोण करूं शकेल! त्या भेटींत कांही संकेत ठरला. दोघांच्याहि ' मुक्ती ' चा मार्ग निश्चित झाला.

पुढे एके दिवशीं चंदनें घोरीला सहजपणे म्हटलें,

" जहाँपनाह! पृथ्वीराज हा तुमचा दुष्मन! तो आज तुमच्या कैदेंत कुजतो आहे. त्याच्या डोळ्यांच्या खांचा झाल्या आहेत ... पण तुम्हांला त्याच्या अंगचा एक मोठा गुण माहीत आहे का?"

" कोणता गुण?"

" पृथ्वीराज शब्दवेधी आहे. तुमची परवानगी असेल, तर मी त्याला तें कसब दाखवायला सांगेन."

" अलबत्!" घोरी बोलला.

मग त्या दृष्टीनें तयारी सुरू झाली. चंदनें दरबारात एकापुढे एक असे सात तवे बांधायला लावले. तव्यावर कोणीतरी खडा मारायचा अन् त्या ध्वनीच्या अनुरोधानें नेमका बाण मारून तो तवा फोडायचा, अशी ती योजना होती. निश्चित दिवशीं त्यासाठी घोरीनें दरबार भरवला. घोरी आपल्या सिंहासनावर बसला. त्याच्याजवळ चंदबरदाईला जागा मिळाली. सर्व तयारी पुरी झाल्यावर शिपायांनी पृथ्वीराजाला दरबारांत आणून उभें केलें. चंदला त्याची ती करुण दशा पाहून भडभडून आलें. पण त्यानें तो आवेग कसाबसा आवरला. शहाबुद्दिननें त्याच्या हातांत धनुष्यबाण द्यायला लावलें. पृथ्वीराज धनुर्धारी सजला. तशाहि स्थितींत त्याच्या मुखावर एक स्मितरेषा चमकून गेली. त्यावर मग चंदबरदाई एका दोह्याच्या रूपानें त्याला म्हणाला,

" चार बांस चौवीस गज अंगुल अष्ट प्रमाण
एते पर सुलतान है मत चुके चौहान "

" महाराज, ह्या दरबारांत तुमच्यापासून चार काठ्या, चौवीस गज आणि आठ अंगुळें एवढ्या अंतरावर सुलतान बसला आहे. चौहान चुकूं नका बरं ! "

एवढें बोलून तो घोरीला म्हणाला,

" जहाँपनाह, पृथ्वीराज तुमचा बंदी आहे. तो परतंत्र आहे. तुम्ही आज्ञेचा शब्द उच्चारल्याशिवाय तो शरसंधान करणार नाही. तुम्ही एका शब्दाने हुकूम करा. "

घोरीला चंदबरदाईच्या ह्या बोलण्यांतलें इंगित कांही कळलें नाही. तो रुबाबांत बोलून गेला,

" ऐ कैदी ! चलाव अपना तीर ! "

पृथ्वीराजाला त्याचा तेवढा एकच शब्द हवा होता. दुसऱ्याच क्षणाला त्याचा तो शब्दवेधी बाण सूं सूं करीत सुटला. त्याने आपलें काम चोख बजावलें. शहाबुद्दिनचें शिर धडावेगळें करूनच तो खाली पडला. पहिल्या क्षणाला होता अन् दुसऱ्या क्षणाला संपला, अशी त्या सुलतानाची अवस्था झाली. लगेच त्या दरबारांत 'तोबा तोबा' झालें. पुढे काय घडणार, तें चंद आणि पृथ्वीराज दोघांनाहि माहीत होतें. ते दोघे मित्र गळ्यात गळा घालून एकवार भेटले. लगेच एकमेकांच्या उरांत कट्यारी खुपसून दोघेहि एकसाथ स्वर्गाचे पांथस्थ झाले. जगांत आले एका तिथीला आणि जगांतून पसार झाले, तेहि एकाच तिथीला !

अशी आहे ही चंदभाटाची अमरकृति ! त्याने आपल्या कल्पनाचक्षूंनी पाहिलेली आणि जणु स्वप्नांत अनुभवलेली अशी ही अद्भुत अन् रोमहर्षक घटना आहे. त्याला जसें घडावें असें वाटत होतें, तसें त्याने आपल्या काव्यसृष्टींत घडवलें आहे ; कारण —

" अपारे काव्यसंसारे कविरेव प्रजापतिः ।
यथास्मै रोचते विश्वं तथैव परिवर्तते ॥ "

**चारण**

राजस्थानी साहित्य आणि लोककथा यांच्या मरुकांतारांत तुम्ही प्रवेश केलांत की, तिथे चारण ही व्यक्ति तुम्हांला वारंवार भेट देईल. राजस्थानांतील ती एक सुप्रसिद्ध जात आहे आणि पुरातन असल्यामुळे अनेक क्षेत्रांत तिचा संबंध आलेला आहे. चारण या नांवांतच त्याचें कार्यहि गर्भित आहे. 'चारयन्ति कीतम् इति चारणाः' जो वीरांची, उदारांची आणि चरित्रवंतांची कीर्ति सर्वत्र पसरावितो, तो चारण होय.



चारण

कोण्या पुराण्या काळीं हे लोक गंधमादन पर्वतावर राहत होते, असें पुराणांतरीं सांगितलें आहे. पृथु वैन्य 'पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराट्' झाल्यावर त्याने वैदिक ब्राह्मणांना बोलावलें, तसेच चारणांनाहि पाचारलें. वैदिकांना दक्षिणा काय मिळाली, तें ठाऊक नाही; पण चारणांच्या हातांवर

मात्र तेलंग देशाचें दानोदक पडलें. इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत ते तेलंगण संभाळून राहिले होते, असें सांगतात.

पुढे काय विपरीत घडलें देव जाणे! पण ते तिथून निघाले ते सरळ सिंध-प्रदेशांत जाऊन थडकले. तिथून पुढे त्यांचा कच्छ, सौराष्ट्र, माळवा, राजस्थान या भागांत फैलाव झाला. राजस्थानांत त्यांचें बस्तान बरें बसलें. राजपूत राजांनी त्यांना आश्रय दिला आणि त्यांना योगक्षेमाच्या चिंतेंतून मुक्त केलें.

बहुतेक जाती-जमाती आपली कांही तरी उत्पत्तिकथा सांगत असतात. चारण सांगतात, की आपला मूळ पुरुष जगन्माता पार्वतीच्या घामांतून जन्मला. त्याला कारणहि तसेंच घडलें. शिव-पार्वतीचीं बैल, नाग आणि सिंह हीं वाहनें. त्यांना कोणीतरी राखणारा हवा होता. शिवशंकर त्याच फिकिरींत होता. पार्वती त्याला म्हणाली, की मी तुमची चिंता दूर करतें. पूर्वी अंगच्या मळांतून गणपति निर्माण केला होता तसा तिने आपल्या घामांतून एक पुरुष निर्माण करून त्याला जनावरांच्या रखवालीवर नेमलें. त्याचे वंशजहि पुढे गुराखीच झाले. त्यांनी गुरांची पैदास वाढवली आणि ते गोधनाच्या खिल्लारांचे धनी झाले. जेव्हा राजस्थानांत राजपुतांनी राज्यें निर्माण केलीं, तेव्हा ते त्यांचे शाहीर बनले.

चारण हे गोरे, उंचेपुरे अन् देखणे असतात. त्यांच्या बायकाहि गौरांगी, 'मृगनैणी' असतात, हें सांगायला नकोच. चारणांत स्त्रीजातीला फार मान आहे. त्या जोगमायेच्या अवतारस्वरूप आहेत, असें ते समजतात. चारणींच्या अंगीं दैवी शक्ति वास करते, अशी त्यांची श्रद्धा आहे. त्याहि मोठ्या करारी असतात. आपल्या शीलाला आणि चारित्र्याला त्या विलक्षण जपतात. देहाचें पावित्र्य हें त्यांना प्राणांहून मोलाचें वाटतें.

एकदा कांही चारणनारी एका गावाहून दुसऱ्या गावीं जात होत्या. बहुचरा ही त्यांची पुढारी होती. वाटेंत कांही अविनीत कोळ्यांनी त्यांना गाठलें अन् त्यांच्यावर हात टाकला. त्यासरशी बहुचरेने खंजीर उपसला आणि आपले दोन्ही उरोज एका घावांत सपाट केले. दुसऱ्या क्षणीं ती मरूनहि गेली. आज तीच बहुचरा चारणांची कुलस्वामिनी बनून त्यांची भावभक्ति स्वीकारीत आहे. अशा शीलासाठी, चारित्र्यासाठी मरून अमर झालेल्या शेकडो चारणी आज त्यांच्या देवी बनल्या आहेत.

चारण ही एक याचकजाति आहे. मात्र ते लोक राजपुतांच्या व्यतिरिक्त अन्य कोणापुढे हात पसरीत नाहीत. राजस्थानांत कित्येक राजांनी त्यांना अनेक गावें दिलेलीं आहेत. राजपुतांच्या घरीं लग्नासारखीं मंगल कार्यें होतात, तेव्हाहि चारणांना दान मिळतें. या दानाला त्याग म्हणतात. इतिहासकाळांत या 'त्यागा'साठी कित्येक चारणांनी आपल्या यजमानांना जीव नकोसा करून सोडलें आहे. कारण या चारणांजवळ एक महान् शस्त्र होतें अन् तें म्हणजे 'त्रागा!'

त्रागा म्हणजे स्वतःला शस्त्राने इजा करून घेणें, रक्त वाहवणें, प्रसंगी प्राण देणें! याच त्यांच्या आत्मक्लेशी कठोरपणामुळे जेव्हा दोन माणसांत एखादा करार होई, तेव्हा चारणाला जामीन घेत. कराराचा उभयपक्षी संरक्षक तो! समजा, त्यांतला कोणी बेइमान झाला, तर चारण त्याच्या दारीं जाऊन उभा राहिलाच! 'बोल, कराराच्या अटी पाळणार की नाहीस?' हा त्याचा खडा सवाल! तो माणूस 'करार पाळीन' म्हणाला, तर ठीक. त्याने नाही म्हटलें, की याने कट्यार उपसून आपली करांगळि तोडलीच. 'बघ ही रक्ताची धार! तुझ्यामुळे हा धरतीला रुधिराभिषेक होत आहे.' पण तेवढयानेहि तो माणूस बधला नाही, तर आपली जामिनकी शाबूत राखण्यासाठी तीच कट्यार त्या चारणाच्या स्वतःच्या उरांत खुपसली जायची. सत्यासाठी तो जिवाचें मोल देऊन मोकळा व्हायचा. त्यामुळे चारणाचा 'त्रागा' म्हटलें, की सगळेच लोक उरी धास्तावून असायचे.

चारण ही केवळ भक्तिमार्गी जात नाही. त्यांना कवित्वाचें वरदान लाभलें आहे. राजपुताच्या दरबारांत केवळ त्यांच्या कवित्वगुणासाठी त्यांना राजाश्रय मिळे. ते गीत, कवित्व, दूहे, सोरठे इत्यादि काव्यछंद प्रत्युत्पन्नमतित्वाने रचीत. भाटांप्रमाणेच तेहि आपल्या आश्रयदात्या राजाची वंशावळ लिहून ठेवीत. त्यांतले कांही पोटभरू स्तुतिपाठक असले, तरी बरेचसे निर्भीड अन् निःस्पृह असत. त्यामुळे राजे महाराजे त्यांचा आदर करीत. राजाला 'तूं' म्हणून एकवचनी संबोधण्याचा त्यांचा नैतिक अधिकार असे. आपण एखादें दुष्कृत्य केलें, तर आपला चारण आपल्याला फटकारील, त्यावर 'छंद' रचून आपली अपकीर्ति जगभर करील, असा त्यांना धाक वाटे.

चारणांचीं हीं काव्यें अपभ्रंश भाषेंत आढळतात. तीं मुख्यत्वें वीरगाथात्मक असतात. १२ व्या शतकापासून चारणसृष्टीच्या काव्याची उपलब्धि होते. हेमचंद्र सूरी नांवाचा एक महान् जैन पंडित होऊन गेला. त्याला ‘कलिकालसर्वज्ञ’ अशी उपाधि होती. तो १२ व्या शतकांतच होऊन गेला. त्यानें ‘सिद्ध हैम’ नांवाचें प्राकृत भाषेचें व्याकरण लिहिलें आहे. अपभ्रंश हा प्राकृताचाच एक प्रकार असल्यामुळे त्यानें आपल्या ग्रंथांत पूर्वकालीनांचे आणि समकालीनांचेहि कित्येक दूहे उद्धृत केले आहेत. ते उत्तेजक आहेत, तसेच सारगर्भहि आहेत. चारणांच्या काव्यप्रतिभेचे ते चमकते रत्नकण आहेत. पुढच्या चारण साहित्या-वर त्यांचा खूप प्रभाव पडला आहे.

**चरपटनाथ**

हेमचंद्राच्या पूर्वकालांतला प्रख्यात चारण कवि म्हणजे चरपटनाथ. या चरपटनाथाला आपण ओळखतों. एखाद्यानें तोंडाची टकळी सुरू केली, की आपण त्याला हटकून म्हणतों, ‘काय चरपटपंजरी लावली आहेस रे!’ ही चरपटपंजरी म्हणजे चरपटनाथाची संस्कृत काव्यकृति. दहाव्या शतकाच्या पूर्वार्धांत हा होऊन गेला. कोणी म्हणतात, तो मच्छिंद्रनाथाचा शिष्य तर कोणी म्हणतात गोरखनाथाचा. एवढें खरें, की तो गोरखनाथाच्या हठयोगाचा एक भक्कम खांब आहे. तो सदैव आत्मसाधनेंत निमग्न आहे. त्याला स्वतःच्यापुढे पृथ्वीपति राजाहि तुच्छ वाटे. तो म्हणतो—

“ताँबा तूंबा रा द्वे सूचा
राजा हि तै जोगी ऊँचा,
ताँबा बुडा तूँबा तिरै
जोगी जीवै राजा मरै ॥ ”

राजा असतो तांब्यासारखा आणि योगी असतो तुंब्यासारखा. पाण्यांत टाकला, तर तांब्या बुडतो; पण तुंबा तरतो. या भवसागरांत राजा हा बुडणारा जीव आहे. योगी हा मात्र सुखेनैव तरून जाईल.

**ऊजळी**

त्यानंतर चारण साहित्यांत एक नारीरत्न आपल्या दिव्य प्रकाशानें तळपतें. तिचें नांव आहे. ऊजळी! प्रेमभंगाच्या व्यथेनें तिला कवि बनवलें. तिची

काव्यवेल आगींतूनच जणु उमलली. अकरावें शतक हा तिचा काळ. ती अमरा नांवाच्या एका चारणाची रूपसुंदर कन्या. अमरा चारण रानांत एक गोठा बांधून आपल्या गायीगोधनासह तिथे राहत होता.

एका काळ्या रात्रीं धूमधार पाऊस पडत असतां एक अबलख घोडा त्यांच्या दारीं येऊन खिंकाळला. चारण बाहेर येऊन पाहतो, तो घोड्यावरचा स्वार मूर्च्छित होऊन घोड्याच्या पाठीवर लोंबकळत होता. अनुधार वृष्टींत त्याचीं सर्वांगें काल्यासारखीं गार पडलीं होतीं. दोघांनी त्याला घोड्याच्या पाठीवरून उतरवून घेतलें आणि झोपडींत आणलें. पण अमरा चारणाचें दारिद्र्य इतकें अठरा विश्वे, की पाहुण्याच्या अंगावर टाकायला त्याच्यापाशी एखादी फाटकी वाकळसुद्धा नव्हती. तो घोडेस्वार तर अगदीच गारठला होता. त्याचा केवळ हापका प्राण उरला होता. त्याच्यापुढे प्रश्न आला, की आता काय करायचें? उबेच्या अभावीं अतिथीला मरूं द्यायचें का? ऊजळीने एकवार बापाच्याकडे साभिप्राय दृष्टीने पाहिलें. चारणाने त्या दृष्टींतलें रहस्य ओळखलें. तो झोपडींतून बाहेर पडला अन् त्याने कवाड लावून घेतलें.

आता फक्त ऊजळी एकटी त्या मरत्या जीवाच्या शेजारीं उभी होती. तिने त्याच्या मुखावर आपली कणवभरी नजर क्षणभर स्थिर केली. तेवढ्या अवधींत तिचा कांहीतरी निर्धार झाला. तिने जें ठरवलें, तें अद्भुत होतें. अभूतपूर्व होतें. त्या निर्धाराच्या मागे डोंगराएवढी ताकद उभी होती.

तिने आपल्या जवानीवरचीं वस्त्रें उतरून ठेवलीं. तिचें तरुण रक्त सळसळत होतें, रसरसत होतें. तिची काया उत्तेजक उबेची जणु मूसच होती. दुसऱ्याच क्षणाला तिने आपल्या विवस्त्र अवस्थेंत त्या आसन्नमरण पुरुषाला जवळ केलें. आपल्या नखशिखान्त देहाची ऊब तिने त्याच्या शरीरांत संक्रांत केली. एका घटकेने त्या तरुणाने आपले डोळे उघडले. त्याची वाणी त्याला परत मिळतांच खोल आवाजांत त्याने ऊजळीला विचारलें,

"तूं...तूं कोण?..."

तिने त्याच्या कानाशीं ओठ लावून उत्तर दिलें.

"मी.. आपलीच, अगदी आपली!"

सगळा वृत्तान्त समजल्यावर तो तरुण अंतरीं भारावून तिला म्हणाला.

"चारणकन्ये! तूं मला जीवदान दिलंस!"

त्यावर ऊजळी एवढेंच म्हणाली.

"मी माझं सौभाग्य जगवलं!"

त्या तरुणाचें नांव जेठवा होतें. तो राजपूत होता आणि राजपुत्रहि होता. शिकारीला गेला असतां तो संकटांत सापडला होता आणि त्याच्या शहाण्या घोड्याने त्याला नेमकें माणसाच्या लगत्याला आणून उभें केलें होतें.

सकाळीं उठून तो आपल्या राजधानीला निघून गेला. जातांना त्याने दुष्यंताने शकुंतलेला दिलें, तसें अभिवचन दिलें होतें. 'मी राजधानींत जाईन आणि तुला आणण्यासाठी दूत पाठवीन.' पण दुष्यंताप्रमाणेच तोहि आपलें अभिवचन विसरला. तो राजकुमार होता. रूढीच्या नियमांना बांधलेला होता. ऊजळी कितीहि प्रिय असली, तरी तो तिचें पाणिग्रहण करूं शकत नव्हता. कारण राजपूत आणि चारण हे भाई-भाई आहेत, असा सामाजिक संकेत होता. तदनुसार ऊजळी ही जेठवाची बहीण ठरत होती. परंपरा तोडून तो तिच्याशीं विवाहबद्ध झाला असता, तर रूढिवादी सामाजिक शक्तींनी त्याला राज्य तर मिळूं दिलेंच नसतें; पण जगणेंहि अशक्य करून सोडलें असतें. जेठवाला भवितव्याची जाणीव झाली. आणि ऊजळीचें प्रेम लाथाडून तो व्यवहाराला शरण गेला.

त्याची वाट पाहून ऊजळीचे डोळे थकले. शेवटी शकुंतलेप्रमाणेच तीहि आपल्या प्रेमसाफल्याच्या आकांक्षेने अनाहूत राजधानीला गेली. कित्येक दिवस तिची आणि जेठवाची भेटच होऊं शकली नाही. तिने राजद्वारीं धरणें धरलें, तेव्हां कुठे तिचा अंतःप्रवेश झाला. पण त्या भेटींत तिच्यावर प्रीतीची पुष्पवृष्टि होण्याऐवजी अंगारवृष्टि झाली. जेठवा तिला थंडपणे म्हणाला,

"राजपुतांना चारण हे देवासमान आहेत. तूं चारणकन्या म्हणजे तर साक्षात् जोगमायेची मूर्ति. मीं तुझं पाणिग्रहण केलं, तर माझ्यावर पूर्वजांचा, देवांचा अन् लोकांचाहि कोप होईल!"

ऊजळीने माथा पिटला. 'आग, आग' म्हणत ती राजवाड्यांतून बाहेर पडली. तिच्या हृदयालाच खरोखर आग लागली होती. तिचें सौभाग्यच तिला पारखें झालें होतें. तिथून निघून ती वणवण भटकत राहिली. थोड्याच काळांत तिची आग जेठवाच्या शरीरांत शिरली. त्या अंतर्दाहाने हाय हाय करीत जेठवाने एक दिवस प्राण सोडला.

तो गेला, जगांतून नाहीसा झाला, हें ऊजळीला कळलें. त्यामुळे तर ती अधिकच घायाळ झाली. प्रेमाचीं विरहाचीं गाणीं गात गात 'ये रे, मला एकदा तरी भेट रे' अशी त्याची आळवणी करूं लागली.

" जिण दिन जलम लियोह प्रीत पुराणी कारणै,
वाल्हा भूल गयोह जोगण करगो जेठवा "

पूर्वजन्मींचें प्रेमाचें नातें पुढच्या जन्मींहि पुढे चालवण्यासाठी मीं या धरतीवर जन्म घेतला. पण हाय रे दुर्दैवा ! माझा प्रियकर मला विसरला अन् मला जोगीण बनवून कायमचा निघून गेला.

" ताळा सजड जडेह, कूंची ले कांने थयो।
ऊघडसी आयेह, जडिया रहसी जेठवा ॥ "

माझ्या प्रेमविह्वल हृदयाला मजबूत ताळें लावून हे जेठवा, तूं त्याची चावी घेऊन कुठे निघून गेलास ! जोवर तूं परत येत नाहीस, तोवर माझें हृदय असेंच बंदिस्त राहणार !

" वीणा जंतर तार थैं छेडया उण राग रा ।
गुण ने रोऊं गंवार, जात न झींकूं जेठवा ॥ "

हे जेठवा, एके दिवशीं प्रेमवीणेच्या तारेवर स्वर्गीय रागिणी छेडून मला मंत्रमुग्ध केलें होतेंस. मी तर त्या तुझ्या गुणांसाठी दिवाणी झालें आहें. जात पात हवी तर तूं मान; पण मला तिच्याशीं कांही कर्तव्य नाही.

ऊजळीच्या समग्र साहित्यांत नारीहृदयाची विकल रागिणी प्रतिध्वनित झालेली आहे. संयोग–वियोगाचे जरतारी धागे उभे–आडवे विणून तिने बनवलेलें ते पैठणी वस्त्र आहे. 'बारह मासा' या काव्यप्रकाराची परंपरा तिच्यापासूनच सुरू होते. ज्ञानेश्वरीच्या अमृताच्या ताटांत जशी अनेकांनी आपली नरोटी ठेवली होती, त्याच प्रकारें अनेक राजस्थानी कवींनी ऊजळीच्या नांवावर आपलेहि सोरटे खपवले आहेत.

याच चारण जातीने राजपुतांना स्वधर्माचरणाला प्रेरित केलें. त्यांचींच स्फूर्तिदायक चारित्र्यगीतें ऐकत ऐकत राजपूत रमणींनी जळत्या खाईत आपल्या काया लोटून दिल्या. त्याग, बलिदान, धीरोदात्तता इत्यादि गुण-विशेष त्यांनीच राजपुतांच्या हृदयांत ठसवले. एक चारण म्हणतो—

" राजपूत क्षत्रियांचे कन्या-पुत्र असामान्य असतात. ते कलियुगाच्या

खातेऱ्यांत पडून मरत नाहीत. राजपूत कुंवर तलवारीच्या धारेखाली रुधिरस्नान करतात, तर कुंवरी अग्निज्वालांत न्हाऊन निघतात."

राजस्थानांतल्या रणथंभोर, हळदीघाटी, चितोड, खेळवाडा, इत्यादि ऐतिहासिक स्थळांना चारणांनीच तीर्थपदवी प्राप्त करून दिली. पाबू, गोगा, तेजा, डूँगजी, जँवारजी इत्यादि मानववीरांना त्यांनीच देव बनवून राजस्थानी जनतेला त्यांची पूजा करायला लावलें. चारणांना आपल्या वाक्सामर्थ्याची पूर्ण जाणीव होती. विश्वामित्राने ऋग्वेदांत एका ठिकाणी म्हटलें आहे. 'माझें सूक्त भरत जनांचें रक्षण करीत आहे.' त्याच धर्तीवर गांगा नांवाचा एक चारण आत्मविश्वासाने म्हणतो—

"कली सेत त्रन पाल है
पडै जोखिम कलस
खसै खुम्भी हुवै मंडप खाणो
भींतडा भाँजीठहि
जाइ धरती मिलै
गीतडा न ह जाइ कहै गांगे"

कालांतराने पांढरा चुना काळपट पडतो. मंदिराच्या कळसावर आकाशाची कुऱ्हाड कोसळते. मंडपाचे खांब सरकतात. उभी वास्तु कलंडते. भिंत पडून धरणीवर लोळते. पण चारणाचें कावित्व अमर राहतें. त्याला कधींहि भंग नसतो.

राणा प्रतापच्या यशोदुदुंभि शतकें लोटलीं तरी अजून गाजतात. त्याच्या या कीर्तिरूपी अमरत्वाला चारण कवि कारण आहेत. रामाला वाल्मीकि भेटला नसता, तर तो रघुवंशांतला 'एक राजा' एवढाच राहिला असता. तो 'प्रभुराम' झाला नसता. राणा प्रतापबद्दलहि तसेंच म्हणतां येईल. चारणांनी राणा प्रतापवर अपार प्रेम केलें. त्याच्या मृत्यूनंतर एका चारणाने आपल्या शोकाला पुढीलप्रमाणे श्लोकत्व दिलें आहे—

असुरां उतपात कणि घण आया
हिंदू धर्म करे बाहाण
अमरापुर बसियो सुण अहाडा
तो बिन फैल मंडै तूफाण


पवन तनैं कासरि करां जिण
जा जे सुरपुर रो मग जाण"

असुरांनी उत्पात मांडला आहे. हिंदुधर्माची हानि करण्यासाठी ते बहुत मिळून आले आहेत. तूं हें सर्व ऐकूनहि स्वर्गांत जाऊन बसलास. तूं नाहीस, त्यामुळे इकडे तुफान झालें आहे...वाऱ्या, मी तुला दूत बनवतों. तूं माझें हें पत्र घेऊन सरळ स्वर्गांत जा. त्या पत्रांतली माझी विनंती त्याला सांग. 'हे पातल, पत्रांतलीं हीं आसवांनी भिजलेलीं अक्षरें वाचून शीघ्र धरतीवर ये. तुझ्यावाचून हिंदूंचें कसलेंच काम होणार नाही. हे धर्माच्या अग्रदूता, तुझ्यासाठी मातृभूमि आसुसली आहे, उदास झाली आहे... '

चारणांची जात ही राजनिष्ठ आणि स्वामिभक्त अशी जात आहे. राजपुतांच्या स्वातंत्र्यसंग्रामांत त्यांनी मोलाचें साहाय्य दिलें आहे. त्यांनी भेकडांनाहि चेव आणला आहे. हताश व्यक्तींच्या काळजांत चैतन्याची फुंकर मारून त्यांना आशावादी बनवलें आहे. पराजितांना अंतरीं पेटवून परत रणांगणावर धाडलें आहे. राजपुतांच्या सुखदुःखांत आणि आशानिराशेंत ते 'समाना हृदयानि वः' म्हणतात, तसे सहभागी झाले आहेत! राजस्थानाच्या इतिहासांत भाट–चारणांना डावलून कोणीहि पुढें जाऊं शकणार नाही!



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३२५५० वि:
क्रमांक ३३२ नों. दि:



# भाषा व साहित्य

राजस्थानांत जी भाषा सर्वत्र बोलली जाते, ती गुजराथी नव्हे, सिंधी नव्हे, हिंदी नव्हे आणि पंजाबीहि नव्हे. अनेक बोलींच्या समन्वयाने बनलेली ती एक स्वतंत्र भाषा आहे. ती आर्यभाषेचीच एक शाखा आहे.

भारतांत आर्य प्रथम पदार्पण करते झाले ते पंजाब प्रदेशांत. आर्य लोक संस्कृत भाषा बोलत आणि त्याच भाषेंत आपलीं सर्व धर्मकृत्यें आणि यज्ञयाग संपादीत. त्याच काळांत भारतांतले अन्य लोक जी भाषा बोलत तिला त्यामुळेच प्राकृत म्हणूं लागले. संस्कृतच्या उलट प्राकृत. कारण ती प्राकृत अर्थात् सामान्य लोकांची बोलभाषा होती.

कालक्रमानुसार प्राकृत भाषेचेहि दोन प्रमुख भेद झाले. पालि आणि अर्ध-मागधी अशीं त्यांना नांवें मिळालीं. वैदिकधर्मीयांनीं रामायणमहाभारतादि ग्रंथांची रचना करून तसेंच कथा, काव्यें, प्रबंध, नाटकें लिहून संस्कृत भाषेला ज्ञानभाषा बनविलें. बौद्धांनी—विशेषतः हीनयानी बौद्धांनी—आपली धर्मभाषा म्हणून पालि भाषा स्वीकारली. त्यांनी आपले धर्मग्रंथ आणि धर्मपोषक कथा,

आख्यानें इत्यादि साहित्य पालिभाषेंत निर्मून तिला गौरवान्वित केलें. जैनांनी आपल्या धर्मप्रसारासाठी आणि धर्मशिक्षणासाठी अर्धमागधीची कास धरली.

अर्धमागधीहि पुढे बहुप्रसवा ठरली. तिच्यांतून शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री या बोली जन्म पावल्या. त्यांच्यावरहि हळूहळू साहित्यिक संस्कार होत गेले. त्याहि पुढे प्रौढत्वाला गेल्या. पण याहि स्थितींत सामान्य लोकांच्या बोलीचा एक निराळा प्रवाह वरील भाषांच्या जोडीनेच चालत होता. तोच कालांतराने नवीन भाषेच्या रूपांत प्रकट झाला. अपभ्रंश असें त्या भाषेचें नामकरण झालें. या अपभ्रंशाच्या झाडालाहि पुढे खूप फांद्या फुटल्या. अकराव्या शतकापर्यंत तर अपभ्रंशाचे देशवार विभाग पडले.

अपभ्रंशाच्या अनेक भेदांत नागर अपभ्रंश नांवाचा एक भेद होता गुजरात व पश्चिम राजस्थान हें या नागर अपभ्रंशाचें क्षेत्र होतें. श्री कन्हय्यालाल मुनशी त्याला गुर्जरी अपभ्रंश म्हणतात. कारण प्राचीन काळी 'गुर्जर' नामक देशांत आधुनिक गुजरात आणि राजस्थान या दोहोंचाहि कांही भाग संमीलित होता. या गुर्जर अपभ्रंशापासूनच पुढे राजस्थानी भाषा उगम पावली. तिलाच पुढे 'डिंगल' भाषा असेंहि नांव पडलें.

राजस्थानी भाषेचा कालनिर्णय करणें काठिण आहे. अनुमान आहे, की ११ व्या शतकाच्या पूर्वार्धांत तिचा जन्म झाला असावा. याच काळांत ती अपभ्रंशापासून पृथक् झाली आणि तिने स्वतःचा नवा संसार थाटायला प्रारंभ केला. डिंगल अर्थात् राजस्थानी भाषेच्या अनेक बोली आहेत. त्यांच्यांत विशेषसे अंतर नसलें, तरी थोडेंसें वेगळेपण आहेच. या बोलींचीं नांवें अशा—

## मेवाती

ही बोली दिल्लीच्या दक्षिणेस अलवार, भरतपूर या भागांत प्रचलित आहे. हिच्यावर व्रजभाषेचा संस्कार दिसून येतो. हिच्यांत थोडेंसें साहित्यहि आहे. चरणदास आणि त्याच्या दोन शिष्या सहजोबाई आणि दयाबाई यांची काव्यरचना मेवातींतच आहे.

संत चरणदास हा १७०४ सालीं डेहरा या गावीं जन्मला. हा जातीचा भागव ब्राह्मण होता. त्याचें मूळ नांव रणजित होतें. असें सांगतात, की

व्यासपुत्र शुकाचार्याने याला दर्शन देऊन मंत्रोपदेश केला. त्यानेच त्याचें चरणदास हें नवें नांव ठेवलें. पुढे याने कठिण तप केलें. त्याला भगवद्दर्शनाचा ध्यास लागला. तो अस्वस्थ अवस्थेंत तळमळे आणि आपल्या कृष्णदेवाला म्हणे—

तुमबिन कैसे जीऊं प्यारे नंदलाल,
भूख प्यास कछु लागत नाही
तनकी सुधि न संभाला

चरणदास शब्दज्ञानी तसाच आत्मज्ञानीहि होता. याने कबिराचा अद्वैतवाद, दादूचा ज्ञानमूलक प्रेमवाद आणि सगुणोपासक संतांचा भक्तिवाद यांचा समन्वय केला, असें तिकडील जाणिते समीक्षक सांगतात. याने एकूण चौदा ग्रंथ रचले. याचे निकटवर्ती शिष्य बावन्न होते. तेवढ्याच त्याच्या संप्रदायाच्या गाद्या निर्माण झाल्या. चरणदासी संप्रदाय आजहि राजस्थानांत प्रचलित आहे. मेवाती बोलीला साहित्यिक स्वरूप देऊन कृतार्थ केलें तें याच सत्पुरुषाने.

## ढूंढाडी

शेखावटी प्रदेश सोडून साऱ्या जयपूर भागांत, तसेंच अजमेर, मेवाड यांच्या ईशान्य भागांत ही बोली प्रचलित आहे. हिच्यावर गुजराती आणि मारवाडी या दोन्ही भाषांचा प्रभाव आहे. तिच्या काव्यरूपावर व्रजभाषेची छाप दिसून येते. या बोलींत गद्यपद्यात्मक विपुल साहित्य आहे. मिशनऱ्यांनी ढूंढाडींत बायबलचाहि अनुवाद केला आहे. संत दादूदयाल आणि त्याचे शिष्य-प्रशिष्य यांनी ढूंढाडी बोलींत काव्यरचना करून तिला गौरवान्वित केलें.

दादूदयाळ याचा जन्मकाळ इ. स. १५४५ हा निश्चित असला तरी त्याचें जन्मस्थळ आणि त्याची जात यांच्याबद्दल वादंग आहे. कोणी म्हणतात तो ब्राह्मण होता; कोणी म्हणतात तो मोची होता; तर कोणी म्हणतात, तो धुनिया धोबी होता. ते कांही असलें, तरी दादू हा ब्राह्मण कुटुंबांतच लहानाचा मोठा झाला होता एवढें खरें. त्याच्यावरचे सगळे संस्कार ब्राह्मणी होते. त्याचें लग्नहि वडनगरच्या एका ब्राह्मण कन्येशींच झालें होतें. त्याचा सर्वांत मोठा मुलगा गरीबदास. हाहि पुढे संत निपजला.

दादूने पुढे थोड्याच दिवसांत गृहत्याग केला. तो गुजरातमधून राजस्थानांत आला. प्रथम कांही दिवस आमेरला राहून पुढे त्याने नरान्याचा पहाड गाठला. तिथल्या एका गुंफेत तो राहूं लागला. तिथे ध्यानधारणा करूं लागला. हळूहळू त्याची कीर्ति फैलावली. भाविक लोक त्याच्या दर्शनासाठी डोंगर चढूं लागले. त्यांतले कांही त्याचे शिष्यहि झाले. त्यांतून पुढे त्याचा संप्रदाय निर्माण झाला. दादूने त्यांच्या अंगावर काषायवस्त्रें चढवलीं, त्यांना भिक्षेची दीक्षा देऊन गुह्य धर्म उपदेशिला. हा दादू पुढे दादूदयाळ झाला. अनेकांचा सद्‌गुरु बनला. तो एका ठिकाणी म्हणतो —

कहि कहि मेरी जीभ रही
सुणि खुणि तेरे कान,
सतगुरु बपुरा क्या करै
जो चेला मूढ अजान
सुखका साथी जगत सब
दुखका नहीं कोइ
दुखका साथी साइयाँ
दादू सतगुरु होइ.

## मालवी

समस्त माळवा आणि मेवाडचा कांही भाग यांत ही बोली प्रचलित आहे. ती सर्वत्र समानरूपाने कानीं पडते. हिला थोडाबहुत मराठीचा स्पर्श आहे. ही बोली कोमल आणि श्रवणरम्य म्हणून प्रसिद्ध आहे. बायकांच्या तोंडीं तर तिची कोवळीक विशेषच जाणवते. चंद्रसखी, नटनागर, इत्यादि कवींची रचना याच बोलींत आहे. आणि त्याहून विशेष सांगायचें म्हणजे साध्वी मीराबाईच्या भाव-जीवनाची कथा आणि व्यथा याच बोलीच्या द्वारें उमङून आली आहे. तिच्या जीवनाचें सारें कारुण्य पिऊन मालवी अंतर्बाह्य रसाळ झाली आहे —

हेरी मै तो प्रेमदिवाणी
मेरा दरद न जाने कोय
सूली उपर सेज हमारी

किस विध मिलना होय
घायल की गति घायल जाने
कि जिन लाई होय
दरद की मारी बन बन डोलूं
वैद मिल्या नहीं कोय
मीरा के प्रभु पीर मिटैगी
जब बैद साँवलिया होय

मेडता राज्याच्या राजाची — रतनसिंहाची ही मुलगी. जन्मली इ. स. १५०४ सालांत. वाढली भक्त जयमलच्या संगतींत. त्यामुळे बाळपणींच तिला कृष्णभक्ति जडली. त्या सावळ्या सुंदराचें तिला स्वप्नांत दर्शनहि झालें. एक दिवस ती आपल्या आईला सांगत उठली —

" माई म्हानें सुपने बरी गोपाल।
राती पीती चुनडी ओढी
मेंहदी हाथ रसाल॥ "

' आई, माझं लग्न झालं. गोपाळानं मला वरलं. लाल–पिवळी चुनडी मला नेसवली. माझ्या हातांना मेंदी लावली. '

पण त्या दुधखुळ्या पोरीचें हें स्वप्नांतलें लग्न तिच्या आईबापांना मंजूर नव्हतें. त्यांनी राणा संगाचा ज्येष्ठ पुत्र भोजराज याच्याशीं तिची सोयरीक केली. मीरा मेवाडच्या राजवंशाची कुलवधू म्हणून चितोड गडावर आली. पण तें लग्न अपेशी ठरलें. थोडयाच दिवसांत तिचा सौभाग्यचुडा पिचला. मीरा निराधार झाली. हरिभजनांत रंगून आणि साधुसंतांच्या समागमांत राहून ती पतिनिधनाचें दुःख विसरण्याचा प्रयत्न करूं लागली.


विक्रमसिंह हा मीरेचा दीर. त्याला तिची हरिभक्ति पसंत नव्हती. तिचा साधुसमागम तर त्याला चीड आणणारा होता. त्याने मीरेला मेवाडच्या राजप्रतिष्ठेचा कलंक मानलें. तिचा अविरत छळ सुरू केला. तिच्यावर नाना प्रकारचे गहजब आणून घातले. तिला जीवन असह्य करून टाकलें. तिने मग आपली कर्मकहाणी लिहून तुलसीदासांना विचारलें —

" स्वामीजी, अशा स्थितींत मी काय करूं ? " तुलसीदासांचें तिला लागलीच उत्तर आलें — " मीरे, तूं गृहत्याग कर. "

मीरेने तो आदेश मानला. तिने चितोडगड सोडून सरळ वृंदावनाचा रस्ता धरला. वृंदावनांतल्या यमुनापुलिनांत कांही दिवस राहून ती तिथून द्वारकेला आली. तिथे गिरिधारीच्या पुढे नृत्यगायन करीत आयुष्य वेचूं लागली. द्वारका तिचें सासर-माहेरच नव्हे ; तर कैवल्यधाम बनलें.

मीरा चितोडगड उतरली. तिच्याबरोबरच गडाची भाग्यलक्ष्मीहि चालती झाली. गडावर एकामागून एक आपत्ति कोसळूं लागल्या. परचक्रांनी गडाची धूळधाण उडवून दिली. हें सगळें पाहून, मागून लोक म्हणूं लागले —

" मीराबाईला घालवून दिल्याचा हा परिणाम ! ती जोवर परत येत नाही, तोवर चितोडला बरे दिवस येणार नाहीत. "



मीराबाईचे मंदिर–चितोड

जनतेच्या आग्रहापुढे राजालाहि मान तुकवावी लागली. त्याने तिला परत आणण्यासाठी द्वारकेला शिष्टमंडळ धाडलें. पण मीरा म्हणाली, " आतां मी माझ्या गिरिधर गोपालाचे पाय सोडून कुठेच येणार नाही. माझं जीवन-मरण आता इथेच. "

शिष्टमंडळ ओशाळवाणें होऊन परत गेलें. राजाने तरीहि तिचा पिच्छा सोडला नाही. त्याने फिरून कांही वेदोनारायण ब्राह्मण द्वारकेस रवाना केले. ते मीरेला म्हणाले, " आम्ही तुला घेतल्याशिवाय परत जाणार नाही ! "

ते तिथे प्रायोपवेशन मांडूनच बसले. मीरेवर नसतें संकट कोसळलें. तिने देवाला साकडें घातलें. ' प्रभो द्वारकाधीशा ! आता मला ताबडतोब तुझ्या चरणीं ठाव दे ! '

ती देवाला आळवूं लागली. करुण स्वराने गाऊं लागली. गातां गातां शब्दांचीं आसवें बनलीं. तीं तिच्या सुकलेल्या गालांवरून ओघळलीं. मीरेने देवाच्या पायांवर डोकें टेकलें, तें परत उचललेंच नाही. तिची आत्मज्योत श्रीहरीच्या ज्योतींत मिसळून गेली. खाली उरलें तें निश्चेष्ट कलेवर !

मीरेच्या पदांची भाषा साध्याभोळ्या स्त्रीला साजेशी आहे. तिचें काव्य विपुल नाही. तिच्या नांवावर असलेलीं सर्वच पदें तिचीं नव्हेत. पण जीं तिचीं म्हणून आहेत तीं शुद्ध, उदात्त आणि प्रसन्न आहेत. आजहि त्यांची गोडी अवीट आहे. कबीर आणि तुलसीदास सोडले, तर मध्ययुगांत मीरे-इतकें हृदय हेलावून टाकण्याचें सामर्थ्य अन्य कोणा कवीला लाभलें नाही. जनतेने मीरेवर अपार प्रेम केलें. तिने मीरेच्या भावनेला जो प्रतिसाद दिला, तसा तो दुसऱ्या कोणालाहि दिला नाही.

## बागडी

डुंगरपूर बांसवाडा या प्रदेशाला पूर्वी बागडदेश म्हणत. या प्रदेशांत बोलल्या जाणाऱ्या बोलीला बागडी म्हणतात. हिच्यावर गुजरातीची छाप आहे. तिच्यांत जे अल्पस्वल्प साहित्य आहे तें अजून प्रकाशित झालेलें नाही.

## मारवाडी

जोधपूर, बिकोनर, जेसलमेर, मेवाड, किशनगढ अशा बऱ्याच मोठ्या प्रदेशांत या बोलीचा प्रसार आहे. हिचें विशुद्ध स्वरूप जोधपुरांत ऐकायला मिळतें. प्राचीन काळीं हिला मरुभाषा म्हणत. आठव्या शतकांतल्या अठरा प्रमुख देशभाषांची गणना असून त्यांत मरुभाषेचेंहि नांव आहे. मरुभाषेचेंच इतिहासकाळांतलें साहित्यिक रूप म्हणजे डिंगल होय. हें

नांव नवें आहे. कवि बाँकीदास याच्या 'कुकविबत्तिसी' या ग्रंथांत तें प्रथम आढळतें. तेंच पुढे हळूहळू रूढ झालें. डिंगलचा अर्थात् मारवाडीचा वाङ्मयीन बगीचा फुलण्यापूर्वी राजस्थानांत राजदरबारीं संस्कृताला प्राधान्य होतें. राजकुमारांचें शिक्षण 'रामो हरिः करी भूभृत्' इथपासूनच सुरू व्हायचें. राजप्रशस्तीहि संस्कृतांतच लिहिल्या जायच्या. पण डिंगल भाषा जसजशी प्रौढ आणि नागर बनूं लागली, तसतशी राजदरबारांत मान मिळवण्याची तिलाहि महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. सर्वप्रथम चारण कवि तिला दरबारांत घेऊन गेले. त्यांनी विविध प्रशंसागीतें रचून तीं राजांना ऐकविली. संस्कृत प्रशंसेचा त्या राजांना दुसऱ्याकडून अन्वयार्थ लावून घ्यावा लागे. पण चारण जें डिंगलमध्ये रचून म्हणत, तें सरळ सरळ त्यांच्या उरांत जाऊन भरे. त्यामुळे राजे लोक खूष झाले. त्यांनी चारणांना संस्कृत पंडितांच्या बरोबरीने राजाश्रय दिला.

चारणांनंतर भाट, रांव, मोतीसर आणि ढाढी या जातीहि डिंगलच्या वाङ्मयीन सेवेसाठी पुढे आल्या. जैनांनीहि डिंगल भाषेत बरेंच साहित्य निर्मिलें. त्या भाषेतलें प्राचीनतम गद्य जैनांचेंच आहे. राजस्थानीचा सर्व-प्रथम जैन लेखक म्हणजे शालिभद्र सूरि हा होय. हा बाराव्या शतकाच्या अखेरीस झाला. 'भरत—बाहुबली रास' हा याचा सुप्रसिद्ध ग्रंथ. त्याच्या-नंतर अनेक जैन साधूंनी राजस्थानी गद्याला प्रवाही आणि अभिव्यंजनसमर्थ असें रूप दिलें. पार्श्वचंद्र माणिक्यचंद्र, असे एकाहून एक मातबर कथा-लेखक त्या कामीं पुढे आले. चवदा आणि पंधरा या दोन शतकांतलें राजस्थानी गद्य कथासाहित्याने भरून गेलें. कुशल लाभ नांवाचा कवि प्रेमगाथा लिहायला पुढे सरसावला. त्याने ढोला मारु, माधवानल कामकंदला हीं एकांतिक प्रेमाचीं सुरस आख्यानें रचलीं. पद्म नांवाचा एक तेली प्रतिभेच्या लहरींत आला आणि तो हरजीरो व्याहलो, वनरसी जीरो माहेरो अशीं दोन लोककाव्यें फुलवून निघून गेला.

राजस्थानीच्या आधुनिक साहित्याचा प्रारंभ भारतांतल्या राष्ट्रीय आंदो-लनाच्या समकालीं झाला. राष्ट्रीय भावनेने प्रस्फुरित झालेले कित्येक कवीहि त्या कालांत उदयाला आले. त्यांनी भारताच्या गुलामगिरीविरुद्ध आपला आवाज

बुलंद केला. त्यांनी स्वरांना धार लावली आणि शब्द तेजागळे केले. त्या काळच्या गद्यपद्याला नव्या चाकोरींतून नेणारा मातबर राष्ट्रीय कवि म्हणजे शाहपुरा येथील बारठ केशरीसिंह सौदा हा होय. तो केवळ शब्दांचे बुडबुडे उठवूनच थांबला नाही; तर त्याने क्रांतिकारी राजकारणांत ब्रिटिशांविरुद्ध भाग घेतला. सरकारने त्याची जहागिरी जप्त करून त्याला भूमीवरून उठवलें. त्याचा पुत्र प्रतापसिंह बापसे बेटा सवाई निघाला. तो नवयुवकांचा पंचीप्यारा ठरला. सरकारने त्याला तुरुंगांत डांबलें. तो जिवंत आंत गेला आणि मरूनच बाहेर पडला. केशरीसिंहाने हें सारें दुःख निधड्या धैर्याने गिळलें. त्याची कविता ही ब्रिटिश साम्राज्य आणि राजस्थानी सरंजामशाही यांच्याविरुद्ध प्रखर बगावत होती.

उदयपुरच्या राजाने राष्ट्रीय आंदोलनांतल्या वीरांचीं गीतें गाइलीं. नाथूराम माहियारिया हा केशरीसिंहाचा अनुयायी बनला. त्याने वीरसतसई लिहिली.

ठाकूर रामसिंह हा नव्या काव्यधारेचा अग्रदूत ठरला. राजस्थानीच्या पुनरुत्थानाचें पुढारीपण त्याच्याकडे आलें. मयुममंक आणि मेह और धरा हीं त्याचीं दोन उत्कृष्ट काव्यें होत. मानवता अन् मातृभूमि यांच्या प्रेमाचीं तीं मूर्तिमंत उदाहरणें आहेत. त्याचें 'मातृभाषारो गीत' हें राजस्थानीचें वंदेमातरम् ठरलें आहे. मुरलीधर कवीचे व्यास आणि भोमराज यांच्यावरचे दूहे रसिकांच्या प्रेमाला पात्र झाले. नव्या कवींत कन्हय्यालाल सेठिया याला उच्च-कोटींत गणलें जातें. त्यांचें 'पातल और पीथल' (प्रताप आणि पृथ्वीराज) हें काव्य सरस उतरलें. चंद्रसिंह हा राजस्थानी भाषेचा निसर्गकवि. नानूराम हा ग्रामीण प्रकृतीचा कवि. दोघांनाहि बरीच लोकप्रियता लाभली.

शिवचंद्र भारतीय हा राजस्थानीचा पहिला नाटककार होय. केशर विलास, बुढापेकी सगाई आणि फाटका जंजाल अशीं त्याने तीन नाटकें लिहिलीं. भगवतीप्रसाद दारुका याने नाटकांची पंचकडी पुरी केली. त्याचीं सर्व नाटकें सामाजिक आणि दुष्ट रूढीवर कोरडे ओढणारीं आहेत.

मुरलीधर व्यास हा राजस्थानी कथालेखक आहे. त्याने गार्हस्थ्य आणि सामाजिकता यांना महत्व दिलें. मुन्नालालने आपल्या कथांतून राजस्थानी वीरता वाखाणली. आधुनिक गद्यलेखकांत गुलाबचंद नागौरी, अगरचंद नाहटा, भंवरलाल नाहटा आणि चंद्रसिंह हे विशेष उल्लेखनीय ठरले आहेत.

मोतीलालने मेनरिया हे इतिहासलेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. सूर्यकरण पारीक आणि नरोत्तमदास यांनी लोकसाहित्याची गवांदी घातली आहे. असे आणखी कितीतरी लेखक वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांत आजमितीस वावरत आहेत. राजस्थान आता स्वतंत्र राज्य बनलें आहे. राजस्थानीला आता ऊर्जित दशा दूर नाही.





# संस्कृतीचे धागे दोरे

राजस्थानातले लोक म्हणजे सगळेच कांही राजपूत नव्हेत. अनेक जाती-जमातींच्या सरिता एकत्र मिळून तिथला जनसागर बनला आहे. खुद्द राजपुतांच्याहि अनेक शाखोपशाखा आहेत. भाट-चारण हे राजपुतांचे सांस्कृतिक सगेसोयरे. भांबी, बलाई, धाणका, खटीक हे तिथले हरिजन. आणि भिल्ल, मीणा, सांसी, मेर इत्यादि मंडळी हे तिथले आदिवासी. राजस्थानची भूमि मेवाडांत डोंगराळ तर मारवाडांत वालुकामय. मेवाडांत पाण्याचे सभिक्ष तर मारवाड सगळा वैराण, निर्जल. जशी भूमि तसेच तिथले लोकहि परस्परविरोधी प्रवृत्तींचे आढळतात.

राजस्थानी लोकांचें मुख्य अन्न म्हणजे ज्वारी, बाजरी आणि मका. गहूं त्या प्रदेशाच्या विशिष्ट भागांतच होतो, त्यामुळे तो पंजाबप्रमाणे आमजनतेचें खाद्य बनूं शकत नाही. ते लोक बाजरीचे सोगरा, राब, रवीच वगैरे किती तरी पन्याकार करतात आणि मक्याच्या पिठाचें घाटले आटवितात. राजस्थानांत तसा भाजीपाला कमीच! पण त्या मानाने दह्यादुधाचा सुकाळ. तूप आणि

लाल मिरची मिळाली की राजस्थानी माणूस खूष. आपल्या भोजनांत रुचि-वैचित्र्य येण्यासाठी ते लोक सांडगे, पापड व लोणचीं यांची चंगळ करतात. जसें कोकणांतल्या माणसाला भोजनांतीं ताकाचा घोट मिळाला नाही तर जेवल्यासारखें वाटत नाही, तसेच जेवणाच्या शेवटी पापड नसेल, तर मारवाडी लोकांना आपण जेवलों असें वाटायचेंच नाही.

बाफला, बाटी, चुरमा, हलुवा, लापशी हीं त्यांच्या सणासमारंभाचीं पक्वान्नें. कोणत्या सणाला कुठले पक्वान्न करायचें हें पुरातनकाळापासून ठरलेलें आहे. गणगौरीच्या विसर्जनाला खीर, राखी पौर्णिमेला तिच्या जोडीला बुंदीचे लाडू, दुर्गानवमीला तिखटामिठाचे अन् गोडाचे बावन, लक्ष्मीपूजनाला मुगाच्या डाळीचा शिरा हा स्वयंपाक अगदीं ठरून गेलेला असतो. 'दावत' करायची तर मिठाई हवीच. मिठाईच्या जोडीला दहीवडा नसेल तर यजमानाची अब्रू वाऱ्यावर पडायला वेळ लागायचा नाही. राजस्थानांतल्या बहुतेक हिंदु जाती मांसभोजी आहेत. शाकाहारी काय ते जैन, ब्राह्मण अन् वैष्णव !

चुणीदार तुमान, वर बारावंदी आणि डोक्यावर भलेंमोठें पिळाचें पागोटें अशा पोशाखांतला माणूस दिसला, की तुम्ही त्याला खुशाल राजस्थानी समजा. हें पागोटें लाल, पिवळें किंवा पांढरें असतें. त्याची रुंदी वितीच्या वर भरत नसली तरी लांबी मात्र कमींत कमी नऊ वार असते. अशा त्या पागोट्याला पीळ भरून त्याचे फेरावर फेरे चढविले की राजस्थानी रुबाब खुलला. या रुबाबाची दुसरी बाजू म्हणजे दाढी-मिशा. नवे लोक आता रोज चेहऱ्यावरून वस्तरा फिरवीत असले तरी जुन्या लोकांचा तो गलमिशांचा शौक अजून कायम आहे. ते लोक केवळ मिशांचेच आकडे वर वळवतात असें नाही, तर लांब दाढीचाहि मधोमध भांग पाडून ती दोन्ही बाजूंना वर वळवितात.

राजस्थानी ललनांची वेषभूषा मात्र बरीच भडक असते. आणि त्यामुळेच ती पाहणाऱ्यांचें लक्ष वेधून घेते. त्या साडीच्याऐवजी घागरा नेसतात. पण साडी परवडली. पण घागरा नको असें राजस्थानी स्त्रीच्या नवऱ्याला वाटत असावें. कारण तो घागऱ्यासाठी कापड खरीदायला जातो तेव्हा त्याला घरांतून आदेश असतो, '४० वार आणा.' यावरून त्या घागऱ्याच्या घोळाची तुम्ही कल्पना करा. घागऱ्यावर असते काचोळी किंवा अंगिया. ती वक्षःस्थळ

झाकते आणि दोन्ही हातांना कोपरापर्यंत संरक्षण देते; पण पाठ तेवढी उघडी ठेवते. पाठीवर तिला बंद बांधून आवळावें लागतें. या पेहेरावावर ओढणी आवश्यक असते. तिचा एक शेव कमरेंत खोचलेला असतो. वापरणारीचें उजवें वक्षःस्थळ झाकून ती डोक्यावरून मागे फडफडते. या ओढणीलाहि अडीच वार कापड लागते.

ओढण्यांचे अनेक प्रकार आहेत, तशींच त्यांना अनेक नांवेंहि आहेत. भावाने बहिणीला द्यायची ती चुनडी. चुनडीच्या डोक्यावर येणाऱ्या भागाला जरीची किनार असते. तिचा रंग लाल असतो अन् त्यावर हिरवी फूलपत्री असते. महाराष्ट्रांत नववधूला हिरवा चुडा भरतात, तर राजस्थानांत लाखेच्या बांगड्या. राजस्थानी स्त्री बांगडीइतकेंच बाजूबंदालाहि सौभाग्यचिन्ह मानते. राजस्थानी सुहागन जेव्हा भांगांतून पुढे आणून सोन्याचें बोर भाळावर लोंबवते, तेव्हा तिच्या मोहकतेला एक न्यारीच कळा चढते.



राजपूत स्त्री

राजस्थानी स्त्रीच्या व्रतपर्वांत मेंदीला महत्त्वाचें स्थान असतें. मेंदी हें तिचें आणखी एक सौभाग्यचिन्ह समजावें. प्रत्येक मंगलकार्यांत मेंदी ही आवश्यकच. गणगौर, तीज इत्यादि पर्वोत्सवांत मेंदीने अग्रस्थान मिळविलें आहे. 'सावन मन पावन' हा तर मेंदीचाच महिना. पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश या तिन्ही प्रदेशांत मेंदी ही शुभशकुनाची समजली गेली आहे. लग्नाआधीची रात्र ही त्यांची 'मेहंदीकी रात' असते. त्या रात्री वधूवरांच्या हातापायांना मेंदी लावतात.

मेंदीची ती कलाकुसर मोठी प्रेक्षणीय असते. त्यात फूलपत्री असते, ठिपक्यांच्या आकृति असतात, चांद-सूरज, हंस-मोर, चक्र-चौपड असतात आणि चौकोन-षट्कोनहि असतात. याविषयी बिहारीची एक कविता आहे. तो म्हणतो — 'नायिकेच्या अंगुलीला लावलेल्या मेंदीच्या रंगावर नायकाची दृष्टि अशी कांही खिळून गेली, की कांही केल्या ती तिथून हालेना.' खरोखरच, मेंदीची रचना ही एक खास कला आहे. त्यासाठी बायकांना मेंदी लावण्याचा वर्षानुवर्षं अभ्यास करावा लागतो.

**गणगौर**

स्त्रियांनी पुढाकार घ्यायचा अन् पुरुषांनी त्यांना सर्व प्रकारे साथ द्यायची असें राजस्थानांतलें एक सौभाग्यपर्व म्हणजे गणगौर. कोकणांत गौरीगणपतीच्या अन् देशावर नागपंचमीच्या सणाला जें महत्त्व, तेंच राजस्थानांत गणगौरीला. कोकणांत आधी गणपती येतो अन् मग त्याला न्यायला गौरी कैलासावरून खाली उतरते. एका अर्थानें तो माय-लेकरांचा उत्सव असतो. पण राजस्थानां-तल्या गणगौरींत गणपतीला स्थान नाही. त्याच्याऐवजी गौरीसमवेत 'ईसर' पूजला जातो. कोकणांत गौरीगणपती येतात, ते भाद्रपदांत तर राजस्थानांतली गणगौर प्रकटते ती होळी झाल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी. त्या दिवसापासून चैत्र शुद्ध तृतीयेपर्यंत म्हणजे सतत अठरा दिवस देवीचा हा उत्सव चालतो. या दिवसांत मुली रोज नटून थटून आणि मस्तकीं मंगल कलश घेऊन वाजत-



गणगौरीच्या पूजेला
चाललेल्या मुली

गाजत, गाणीं म्हणत गौरीसाठी फूलपत्री गोळा करायला जातात. गणगौर हा केवळ उत्सवच नाही; तर तें स्त्रियांचें व्रतहि आहे. तें सुवासिनींना सौभाग्य

अन् कुमारिकांना इष्ट वर मिळवून देतें. फाल्गुन अमावास्येपासून या व्रतोत्सवांत रंग भरूं लागतो. त्या दिवशी बायका 'सिंदारा' करतात म्हणजे हातापायांना मेंदी लावतात. प्रत्येकाच्या घरीं गोडधोड होतें अन् मोठीं माणसें आपल्या लेकी-सुनांना वस्त्रालंकार देतात.

राजस्थानांत गणगौरीची बरींच गाणीं आहेत. बायका समूहाने एका सुरांत तीं म्हणूं लागल्या, की वातावरण गंभीर होतें. राजस्थानी स्त्रीचें समग्र कौटुंबिक जीवन गणगौरीच्या गीतांतून सुव्यक्त झालें आहे. आता हीच एक सासुरवाशीण पहा. ती आपल्या प्रियकराकडे गणगौरीचा महोत्सव पाहायला माहेरीं जाण्यासाठी परवानगी मागत आहे —

"म्हारा बाबासा केमांडी गणगोर हो रसिया
घड़ी दोय खेलवाने जावा दो ।
घडी दोय जावतां, पलक दोय आवतां,
सारो दिन सयेल्यां में
लाग्यो हो मिरगा नैणी
थां बिन जिवड़ो नी लागे ।
थारी नथ भलके, भारो चूड़ो चलके,
भारा नेना रो निजारो
प्यारो लागे मिरगानेणी
थां बिन जिवड़ो नी लाजे ॥"

"माझ्या वडिलांच्या घरीं गणगौर सजविलेली आहे. माझ्या प्रियतमा, मला तिथे घटका दोन घटका खेळायला पाठव." त्यावर तिचा पति तिला म्हणतो, "हे मृगनयने, घटका दोन घटका जाणं ठीक आहे. पण तूं जर सारा दिवस तिथे मैत्रिणींबरोबर खेळण्यांत रमलीस तर इथे माझा जीव बेचैन होईल.

चैत्र शुद्ध तृतीयेला एखाद्या माहेरवाशिणीला सासरीं पाठवावें, त्याप्रमाणे गौरीची बोळवण करतात. तिच्या विसर्जनाची मोठी मिरवणूक निघते. त्या मिरवणुकींत राजेमहाराजेहि भाग घेतात. त्यामुळे या उत्सवाला मोठें राजस स्वरूप प्राप्त होतें.

## आखातीज

गणगौरीच्या खालोखालचा सण म्हणचे आखातीज. गणगौरीनंतर एका महिन्यानेच तो येतो. त्या दिवशी सर्व लोक भेदभाव विसरून एकमेकांना भेटतात. पुढील वर्षाच्या भल्याबुऱ्याचे शकुन याच दिवशी घेतले जातात. मुलींना या दिवसाचें मोठें आकर्षण असतें. त्या दिवशी त्या दुल्हा–दुल्हनची म्हणजे नवरा–नवरीची सोंगें बनवून घरोघरीं जातात आणि गाणीं म्हणतात. श्रावणांतील तीजहि तितकीच महत्त्वाची असते. त्या दिवशीं सुवासिनी आपल्या हातापायांना मेंदी लावतात व गौर पुजतात. श्रावणांतल्या तीजेची मिरवणूकहि थाटांत निघते. तिच्यांत हत्ती, घोडे व उंट यांनाहि शृंगारून मिरवतात. या दिवशी पुरुष मंडळी एकमेकांना भेटतात आणि अफू खातात.

## राखीपूनम्

रक्षाबंधन किंवा राखी पौर्णिमा हा तर राजस्थानांतला खास सण. राखी म्हणजे बंधुभगिनींच्या प्रेमाचें पवित्र प्रतीक. महाराष्ट्रांत जशी भाऊबीज, तशीच राजस्थानांत राखी पूनम्. श्री. श्रीपाद जोशी यांनी राजस्थानांतील आणखी एका व्रताची माहिती दिली आहे ती अशी ---

## सतीपूजन

भाद्रपदाच्या अमावास्येला केले जाणारे ‘ सतीपूजन ’ हाहि स्त्रियांचा एक पवित्र सण किंवा व्रत आहे. झुनझुनू या गावीं सतीमातेचें मोठें देऊळ आहे. तिथे जमून राजस्थानी स्त्रिया देवीची पूजा करतात. ज्यांना तिथे जाणें शक्य नसेल, त्या आपापल्या घरींच सतीची पूजा करतात. सती जाणें व जोहार करणें या गोष्टींना राजस्थानच्या लोकजीवनांत मोठ्या आदराचें स्थान आहे. ऐतिहासिक काळांत जे अनेक जोहार घडले त्यांची स्मृति या व्रतोत्सवाच्या रूपाने राजस्थानी स्त्रियांनी कायम ठेविली आहे.

श्रावण–भाद्रपदांत राजस्थानामध्यें अनेक मेळे भरतात. भाद्रपद शुद्ध दशमीचा तेजाजीचा मेळा आणि एकादशीचा जलझूलनीचा मेळा हे दोन मेळे तर सगळ्या राजस्थानभर भरतात. त्यांतल्या त्यांत तेजाजीच्या मेळ्याला विशेष महत्त्व आहे.

## तेजाजी

राजस्थानी लोक वचनपूर्तीला फार मोठी किंमत देतात. जो दिलेला शब्द मोडतो, तो राजस्थानी लोकांना निंद्य वाटतो. श्रीराम हा अखिल भारताच्या वचनपूर्तीचा आदर्श होय. एकपत्नी, एकबाणी, एकवचनी अशी त्याची ख्याति. पण राजस्थानने या बाबतींत आपले असे स्वतंत्र आदर्श निर्माण केले आहेत. तेजाजी हा त्यांतलाच एक आदर्श पुरुष आहे. हा एका जाट कुळांत जन्मला. खडनाळ हें त्याचें गाव. तिथेंच तो वाढला, मोठा झाला. तो एका नागाला नित्य दूध पाजी. एक दिवस आपल्या नववधूला आणण्यासाठी तो सासुरवाडीस निघाला. त्या गडबडींत त्याच्नें नागाला दूध घालणें राहून गेलें. त्यामुळे नाग त्याला वाटेत आडवा आला. 'फुस्' करून त्याला म्हणाला, "बायकोच्या नादांत मला विसरलास. मी आता तुला चावेन." त्यावर तेजाजीने म्हटलें, "ठीक आहे; पण थोडी फुरसत दे. मी सासुरवाडीहून आल्यावर तुझ्याकडे येईन. मग तूं मला चाव."

नाग बोलला, "वचन दिलें म्हण."


तेजाजी म्हणाला, "वचन दिलें."

आणि तो सासुरवाडीच्या मार्गाला लागला. वाटेंत एक गुजरांचें गाव भेटलें. त्या गावांत मोठमोठीं गाईचीं खिल्लारें होतीं. त्याच वेळी नेमके मेर जातीचे लोक त्या गांवावर चालून आले आणि त्यांनी गांवचे गोधन लुटलें. आयाबायांनी, लहान-थोरांनी मदतीसाठी हाकाटी केली; पण कोणी त्यांच्या धावण्या धावलें नाही. ती पुकार तेजाजीच्या कानीं पडली. तो पुढे झाला. मी तुमचे लुटलेलें गोधन परत आणतों, असें म्हणून तो मेरांवर तुटून पडला. एकटा पांच पन्नाशीं लढला. त्याने मेरांना असा मार दिला, की त्यांना पळतां भुई थोडी व्हावी. तेजाजीने खिल्लारें परत आणून गुजरांना दिलीं. पण त्या लढाईत तो खूप घायाळ झाला. त्याला वाटलें, की आपण आता मरणार! आणि त्याच क्षणी त्याला आपल्या वचनाची आठवण झाली. तो म्हणाला, "मरण्याआधी वचनपूर्ति केली पाहिजे." लगेच तो परतीच्या मार्गाला लागला. पडत झडत नागाकडे आला. नागाला म्हणाला, "मला दंश कर." नागानें निरखून पाहिलें अन् म्हटलें, "तुझ्या अंगावर तीळ

ठेवायला मिळेल एवढीहि अक्षत जागा नाही. मी चावूं कुठे ?" त्यावर तेजाजीने आपली जीभ बाहेर काढून म्हटलें, "इथे चाव." नाग त्याच्या जिभेच्या टोकाला डसला आणि तेजाजी गतप्राण होऊन पडला. त्याची स्त्री सती गेली. जाट आणि गुजर यांनी त्याच्या देवळ्या बांधल्या. ते लोक तेजाजीला भजूं लागले. त्याच्यावर एक प्रदीर्घ काव्यहि रचलें गेलें. तो सर्वांना उपास्य ठरला. राजस्थानी लोक समजतात, की तेजाजीच्या कृपेने सर्पभय नष्ट होतें.

## सांझी

राजस्थान आणि माळवा या दोन प्रदेशांत कुमारी मुलींचा आणखी एक



सांझीपूजा

उत्सव असतो. त्याला सांझी किंवा संझाबाई असें म्हणतात. ही एक

सौभाग्यदात्री देवता आहे. सांझीच्या विविध प्रकारच्या आकृत्या असतात. आणि त्या ठेवलेल्या क्रमाने भिंतींवर काढायच्या असतात. पितृपक्षाच्या प्रतिपदेपासून या सांझीपूजनाला प्रारंभ होतो. त्या दिवशी आपल्या घराच्या भिंतीच्या दर्शनी भागावर चौकोन आखून तो शेणाने सारवतात. त्या जागी मग चंद्र–सूर्य काढून त्यावर फुलाच्या पाकळ्या चिकटवितात. दुसऱ्या दिवशी आदल्या दिवशीच्या आकृत्या पुसून तिथे बिजेची चंद्रकोर काढतात. प्रत्येक दिवसाची अशी वेगवेगळी आकृति असते. सातव्या दिवशी सतर्षींचीं प्रतीकें म्हणून सात टिपके, आठव्या दिवशी आठ पाकळ्यांचें फूल आणि गजलक्ष्मीचें चित्र, नवव्या दिवशी एक वृद्ध जोडपें, दहाव्या दिवशी पंखा, अकराव्या दिवशी केळीचें झाड, बाराव्या दिवशी खुळखुळा, तेराव्या दिवशी किल्ला–कोट, ऋद्धि–सिद्धि, आणि खोड्यो बामण काढतात. हा बामण सांझीबाईला नेण्यासाठी मुळारी येतो अशी समजूत आहे. पंधराव्या दिवशी सांझीबाईला खीरपुरीचा नैवेद्य होतो. कारण सोळाव्या दिवशी ती आपल्या घरीं जायची असते. त्या प्रसंगी मुलींना फार दुःख होतें. त्या तिला अनेक गाणीं म्हणून न जाण्याबद्दल आग्रह करतात.

सांझीबाई कुमारिकांची आदर्श आहे. लाल भैय्याने जी बाग लावलेली असते ती सांझीबाई येऊन शिंपते.

" लाल भैय्या बाग लगावे
संझाबाई सींचण जायं "

आता तीच सांझीबाई निघून गेल्यावर बागेचें काय होणार? ती सुकेल, करपेल —

" संझाबाई चाली सासरे
म्हारो बाग सूख्यो जाय "

पण ती घटना थांबत नाही. संझाबाईचें लग्न होतें. ती नवऱ्याबरोबर सासरीं निघून जाते. पण काय आश्चर्य! सासरीं जाण्यासाठी म्हणून ती दारांत पाय ठेवते मात्र; सगळी बाग चैतन्याने लहरूं लागते —

बाई आई देहरी
म्हारो बाग लहरियां खाय "

सोळाव्या दिवशी सांझीचें विसर्जन होतें. मुली सांझीला जलांत विसर्जून दुःखित अंतःकरणाने घरीं येतात.

ही संझा किंवा सांझीबाई कोण होती ? तिचें मूळ काय ? याविषयीं अद्याप संशोधन झालेलें नाही. तिच्यासाठी जीं चित्रें काढलीं जातात, त्यान्नाहि नेमका अर्थ लागत नाही. एका लोकगीताच्या द्वारे एवढेंच कळतें, की ती एक मानवी कन्या होती. तिचें सासर अजमेरला आणि माहेर सांगानेरला होतें.

## कळसूत्री बाहुल्या

राजस्थानात संगीत, नृत्य, नाट्य अशा अनेक कलापरंपरा आहेत आणि त्याहि जुनाट जुगादीच्या आहेत. मारवाडांत कळसूत्री बाहुल्या नाचविणारे नामांकित कलावंत आहेत. बिकानेर आणि बगडी येथील रासधारीवाले, घोसुंडाचे खयालवाले आणि मेवाडचे गौरीनृत्यवाले फार प्रसिद्ध आहेत. आजकाल बोलपटसृष्टीने या कलाकारांवर अप्रत्यक्षरीत्या आक्रमण केलें आहे. त्यांच्यांतल्या कलेला आता रस्त्यावरच्या भिकारणीची कळा आली आहे. दुपारच्या वेळी दोन ओलेकोरडे घास आपल्या अन् पोराबाळांच्या मुखीं घालायचे, तर त्यांना आता नोकरी, मजुरी करावी लागत आहे. ‘कालाय तस्मै नमः’ म्हणून ते कसेबसे जगत आहेत. भारत सरकारने त्यांची दखल घेतली तर अजूनहि त्यांची कला फुलेल, फळेल आणि त्या कलावंतांनाहि मानाने जगतां येईल.

## भवाई

वर ज्या कलापरंपरा उलेखिल्या, त्यांत आणखी एकीचा समावेश करायला हवा. तिचें नांव आहे भवाई. नृत्य आणि नाट्य अशी ती सव्यसाची संमिश्र कला आहे आणि अजून तिची परंपरा टिकून आहे.

भवाई ही राजस्थानांतली एक जात आहे. एका सामाजिक बहिष्कारांतून सुमारे ४०० वर्षांपूर्वी हिचा उगम झाला. भवाई हे मूळचे जाट. जाट हे स्वभावतःच अस्तन्या सारणारे किंवा वीरवृत्तीचे आहेत. सगळ्याच ललितकलांना ते हीन लेखतात. अशा एका जाटाच्या कुळांत नागाजी नांवाचा एक वेगळ्या वृत्तीचा पुरुष निर्माण झाला. लहानपणापासूनच त्याला गाण्यानाचण्याचा छंद जडला. त्याच्या मुखांतून शब्द निघे, तो आलापांत घोळून

आणि त्याचें सहजच पाऊल पडे तेंहि नृत्याच्या ठेक्यांत. जाटाच्या जातगंगेला वाटलें, की पोराचें हे लक्षण कांही ठीक नव्हे. त्यांनी सांगून सवरून पाहिलें; पण नागाजीचा मूळ स्वभाव कांही बदलेना. शेवटीं जातपंचायत भरली. तिनें नागाजीला पुढे बोलावलें. त्याला एक जाजम, भोंगळ नांवाचें एक वाद्य आणि आत्मसंरक्षणार्थ एक भाला, अशा तीन वस्तु देऊन म्हटलें,

"आजपासून तूं आमचा भांडभवाई. आम्ही तुला जातींतून बाहेर काढलें आहे. यापुढें तूं समस्त जाटांची करमणूक करायची आणि त्या धंद्यावर पोट भरायचें."

तेव्हापासून नागाजी जाटांचा भवाई झाला. त्यानें आपलें जीवन कलेला वाहून टाकलें. नृत्याच्या अनेक परंपरा त्यानें प्रस्थापित केल्या. जाटांचें अनुकरण करून अन्य कित्येक जातींनीहि मग आपल्यांतले छंदीफंदी लोक 'भवाई' म्हणून जातीबाहेर काढले. पुढे हे वेगवेगळ्या जातींतले भवाई आपली मूळची जातपात विसरून भवाई या एकाच जातींत दाखल झाले. त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहार सुरू झाल्यानें त्यांचा समाजहि वाढला.

भवाई ही एक स्वावलंबी जात आहे. त्यांना आपल्या कलेविषयीं गर्व आहे. ते वर्षाचे आठ महिने आपलें बिऱ्हाडबाजलें बरोबर घेऊन गावोगाव हिंडतात. त्यांचे वंशपरंपरागत ठरलेले यजमान असतात. यजमानाच्या अंगणांत नाचायचें अन् त्याच्याकडून एक रुपया बिदागी घ्यायची हे त्यांचें वर्षासन. याशिवाय ते सार्वजनिक खेळहि करतात. भवाईचे असे अनेक तांडे उंटावर सामान लादून राजस्थानभर फिरतांना आढळतात. त्यांनी आपापली क्षेत्रें वाटून घेतलेली असतात. एकाच्या राज्यांत दुसरा जायचा नाही. त्यामुळें अंतःकलहाचें मूळच खुंटतें. दुर्गा ही त्यांची आराध्य देवता. तिची यात्रा भरते तेव्हा भवाईचे सगळे संघ तिथें जमतात आणि आपल्या नृत्यनाट्याचे संयुक्त प्रयोग करतात.

एखाद्या गावीं जाऊन भवाई पुरुषांनी एकदा डेरा लावून दिला, की त्यांच्या बायका मग पुढची सर्व व्यवस्था पाहतात. गावांतले लोक वर्गणी काढून त्यांच्या जेवणाखाणाची व्यवस्था करतात. भवाईच्या टोळीचें आगमन म्हणजे गावांतल्या आबालवृद्धांना आनंदाची पर्वणी असते. दुपारी ते लोक

जमलेल्या मंडळींना कथा सांगतात. त्या वेळीं गावांतल्या लोकांशीं त्यांची ओळख पाळख होते आणि 'कुसुंबा'–सुपारींची देवाणघेवाणहि होते.



भवाई नृत्य

चव्हाटा, नदीकाठ, एखाद्या देवळाच्या प्रासाद अशासारख्या कोणत्याहि मोकळ्या जागी भवाईचे नृत्यप्रयोग होतात. प्रथम एका विटकराच्या तुकड्याने ते आपली प्रयोगभूमि आखून घेतात. मग ती जागा स्वच्छ अन् सपाट करतात. या रंगभूमीला ते पवित्र समजतात. भवाईचीं छोटीं छोटीं नाटकें असतात. त्यांना 'वेश' म्हणतात. दशावतारी नाट्याप्रमाणे भवाईच्या रंगभूमीवरहि सूत्रधार असतो आणि तो अथपासून इतिपर्यंत वेशांचें संचालन करतो. सूत्रधाराप्रमाणेच एक विदूषकहि भवाईच्या रंगभूमीवर कायमचा असतो. कोकणांतल्या दशावतारी सेवकाप्रमाणेच ही व्यवस्था असते. दशावतारींतला सेवक उभयसामान्य असतो म्हणजे पांडवांचाहि तोच अन् कौरवांचाहि तोच. भवाईतला विदूषकहि तोच अधिकार चालवितो.

भवाई नटांचें रंगप्रसाधन पिंजर, काजळ, अन् पांढरा खडू या तीन गोष्टींनी परिपूर्ण होतें. त्यांच्या रंगपटाला पडशाला असें म्हणतात. खेळ सुरू होण्यापूर्वी रंगपटांत एक दिवा लावला जातो आणि खेळ संपल्यावर मुख्य स्त्री-पात्राने देवाला मुजरा करून पायांतलें घुंगरू सोडीपर्यंत तो सतत तेवत ठेवला जातो. भवाई नट आपल्या चेहऱ्यांना तकतकी आणण्यासाठी या दिव्यांतलेच तेल तोंडाला लावतात. रंगाला सुरवात होण्यापूर्वी देवीला उद्देशून प्रार्थनागीते म्हणतात.

सर्वसाधारणपणें भवाईतील पदें तारस्वरांत म्हणतात. बहुधा पंचम–धैवतांत. पण इतका चढा स्वर लावूनहि गाण्यांतले शब्द स्पष्ट ऐकूं येतात. त्यांचे भावदर्शनहि नेटकें अन् कलापूर्ण असतें. नृत्य हे या नाट्याचें महत्त्वाचें अंग होय. गद्य संवादापेक्षा नाचणें आणि गाणें यांवरच भवाईचा विशेष भर असतो. गद्य संवादहि सुस्वर मंत्रासारखे बोलले जातात. नृत्यांत शास्त्रशुद्ध पदविन्यासांपेक्षा बदलत्या लयींचे ललित आविष्कार हेंच वैशिष्ट्य असतें. भावाविष्कार आणि व्यक्तिदर्शन यांतहि ते कमी पडत नाहीत. आपल्या जिव्हाग्रीं सरस्वती अन् मुद्रेवर शक्ति वास करते, असा ते गर्व बाळगतात.

भवाईचे प्रयोग रात्रभरच नव्हे; तर सकाळीं प्रहर दिवस उलटून जाईपर्यंत चालतात. ओळीने तीन तीन, चार चार रात्री भवाईचे प्रयोग होतात. भवाईचे हे छोटे छोटे नाट्याचे तोडे–तुकडे पौराणिक किंवा लौकिक प्रसंगांवर आधारलेले असतात.

## घूमर नृत्य

राजस्थानला आणखी एका नृत्याची पुराणपरंपरा लाभलेली आहे. त्याचें नाव आहे घूमर नृत्य. भवाई हें केवळ पुरुषांचें; तर घूमर हें राजस्थानी ललनांचें सामूहिक नृत्य आहे. हें राजस्थानी समाजाच्या वेगवेगळ्या थरांत वेगवेगळ्या रूपांनी प्रचलित आहे. होळी, गणगौर, दिवाळी, अशा उत्सवांत आणि पुष्कळदा लग्नासारख्या मंगल समारंभांत इथल्या स्त्रिया हें नृत्य करतात. इष्ट देवतेचा कृपाप्रसाद मागणें आणि मनोरंजन असा त्याचा उभयविध हेतु असतो. इतिहासकाळांत राजस्थानांतल्या राणीवशांतल्या स्त्रियाही घूमर नाचून आपले उत्सव साजरे करीत.

घागरा हा राजस्थानी महिलांचा फार पुरातन काळापासूनचा पेहेराव आहे. हा घागरा चुणीदार, पायघोळ आणि कलाकुसरीचा असतो. घागरावालीने आपल्या भोवती गर्‌कन गिरकी घेतली, की तिचा घागराही वाऱ्याने फुलून वाटोळा फिरतो. ज्या नृत्यांत अशा प्रकारे स्त्रीचा घागरा ‘ घूमतो ’ त्यालाच पुढे घूमर असें नाव मिळालें. या नृत्याचीं दोन-तीन रूपें आहेत. पण वर्तुळ करून गिरक्या घेत नाचणें, ही गोष्ट सर्व प्रकारांत समान आहे. या नृत्याचीं

वरींच गीतेंही आहेत. तीं सामाजिक आशय आणि संकेत चांगल्या प्रकारें व्यक्त करतात—



घूमर नृत्य

"भर लावो रे पाणी सागर री।
पाणी जाऊँ तो म्हारे काँकर भागे।
हॉ रे म्हारे आँगण हौद खुदावो रे॥
श्यामजी री बावडी रो खारो खारो पाणी।
हँ रे म्हारे पिछोला रो पाणी अमृतवाणी रे॥

राजस्थानांत पाणी हें तुपाहून अधिक मूल्यवान मानलें जातें. वरील गीतांत या पाण्याचेंच यशोगान आहे. हें गीत गाणारी स्त्री आपल्या वल्लभाला सांगते,

की फत्तेसागराचे पाणी भरून आण आणि अंगणांत हौद खणून त्यांत भरून टाक. श्यामजीच्या बावडीचें पाणी आणूं नकोस हो ! कारण तें खारवणी आहे. पिचोल्याचें पाणी आण ; कारण ते अमृतवणी आहे.

घूमर नृत्य हें गुजरातमधल्या गर्बा नृत्याशीं जुळतें आहे. प्रदेशपरत्वें त्याच्या छटा भिन्न भिन्न आहेत. उदयपुराकडील घूमरांत संगीताला प्राधान्य असतें. जोधपुराकडील घूमरांत कलात्मक अभिनयाला महत्त्व असते. कोटा-बुंदी भागांतलें घूमर विशेष उत्साही आणि प्राणवान असतें. गीतांच्या नादावर आणि लयीवर शेकडो स्त्रिया चक्राकार भ्रमूं लागल्या म्हणजे प्रेक्षकाला शब्द, रूप आणि रस यांचा एक विलक्षण साक्षात्कार घडतो.

या घूमर नृत्याला हजारो वर्षांचा इतिहास आहे. महाभारतकाळांत मत्स्य आणि पांचाल या देशात 'फरद नृत्य' नावाचा एक मनोरंजक नृत्यप्रकार रूढ होता. त्याचा अवशेष आजही 'फड' या नावाने अलवार, मेवाड इत्यादि भागांतल्या लोकसमाजांत दिसतो. हें फरद नृत्य मूळ दरद संस्कृतींतून उगम पावलें होतें. तें आपलें क्षेत्र हळू हळू वाढवीत चाललें होतें. पण तें जसजसें दक्षिणेस उतरूं लागलें, तसतसा त्याला आपलें अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागला. या संघर्षांत त्याचा पाडाव झाला. अरवली आणि विंध्य या दोन पहाडांच्या मध्यभागीं गंधर्वशैलीचे एक नृत्य खूप लोकप्रिय होतें. त्याच नृत्याने फरद नृत्याला पराभूत केलें. कालांतराने या फरद नृत्याने 'गघूरा' या दुसऱ्या एका लोकनृत्याला आपल्यांत सामावून घेऊन पुनश्च लोकजीवनांत स्थान मिळवलें. पण गघूराही फार काळ टिकलें नाही. गुर्जरांनी दुसऱ्याच एका ढंगदार नृत्याचा आविष्कार करून गघूराचें तेज शोषून घेतलें. ही गुर्जरशैलीच पुढे घूमर या नावाने सर्वत्र रूढ झाली. शाक्त पंथाने त्याला मान्यता दिली आणि ते लोक दुर्गेच्या पूजोत्सवांत त्याचें आयोजन करूं लागले. सामाजिक परिस्थितीने घूमरला खूप पाठबळ दिलें. अशा प्रकारे घूमरने दहाव्या शतकापर्यंत छान मजल मारली. पण त्यापुढे त्याला क्षीणता आणि नीरसता यांनी ग्रासलें. पुनश्च त्याचा ऊर्जितकाळ आणला तो चालुक्य राजांनी ! मग या नृत्याने राजस्थान तर व्यापलाच; शिवाय गुजरातला प्रभावित करून पुढे तापीतीरालाही स्पर्श केला.

घूमर नृत्य हे मुख्यत्वे धार्मिक आहे तर भवाईची कला ही धार्मिकता आणि नैतिकता यांच्या अतीत आहे. दैनंदिन लोकव्यवहारांतून एखादा मजेदार प्रसंग निवडून त्याला नाट्याचा आकार देणें आणि नृत्याने तो लयबद्ध करणें, हे भवाईंच्या कलेचें वैशिष्ट्य होय.

भवाई हा निर्भय कलाकार आहे. समाजांतल्या दुष्ट रूढी आणि ग्राम-कंटकांची लांडीलबाडी यांची कलात्मक अतिशयोक्ति करून तसली सोंगेंढोंगें प्रेक्षकांपुढे मांडतांना तो कधीहि कचरत नाही. आता हेंच पहा—हें एक दांपत्य रंगभूमीवर आलें आहे. यांना म्हणतात बोराबोरी. बोरा हा गांवांतला कद्रू वाणी आहे. बोरी ही त्याची स्वार्थी सहचरी. तीं दोघें नेहमी लोकांना नाडायच्या हिकमती योजीत असतात. पण त्या कांही नेहमीच साधतात असें नाही. एखाद्या वेळी त्या अंगाशीं येतात आणि मग त्यांतूनच हास्यरसाला उधाण येतें. त्यानंतर दुसरा प्रयोग सूरदासाचा. सूरदास म्हणजे तो प्रसिद्ध साधु नव्हे; तर गांवांतला एक आंधळा भोंदू. तो स्त्रीलंपट असतो. गावांतल्या पोरीबाळी त्याला फार घाबरतात. प्रयोगांत त्याची फटफजिती दाखविली जाते. त्यापुढच्या एका नाट्यप्रयोगांत दोन बायकांच्या दादल्याचें करुण-काव्य असतें. आणखी एका एकरी नांवाच्या नाट्यप्रसंगात दुष्ट माणसाच्या पदरीं पडलेल्या एका अभागिनीचें जीवन आविष्कृत केलें जातें. "ढोलामारू" ही राजस्थानी लोकसाहित्यांतली एक गहिरी प्रेमकथा आहे. तें प्रेमी युगुल राजस्थानी स्त्री-पुरुषांचें पंचीप्यार आहे. भवाई लोक ती प्रेमकथा नाट्यरूपाने अभिव्यक्त करतात. आणि प्रेक्षकांच्या आत्म्याला संतोष देतात. "शंकरिया" हे भवाईचे सर्वांत हातखंडा नृत्यनाट्य होय. शंकरिया हा एक तरुण गारुडी असतो. एक तरुण जोगीण त्याला भेटते. त्याचें तिच्यावर प्रेम बसतें. तिलाहि तो मनांतून आवडतो; पण तिला आपली आवड व्यवहारांत आणतां येत नाही. कारण ती असते जोगीण म्हणजे संसारांतून विरक्त झालेली आणि तो असतो हीनयातीचा. त्या दोघांच्या मानसिक संघर्षांतून ती कथा भावगंभीर बनत जाते. या नाट्यांतले पदन्यास व मुखध्वनीहि विचित्र असतात. प्रेक्षक आपला जीव डोळ्यांत गोळा करून तो खेळ पाहतात.

याशिवाय सात रंगांच्या पागोट्यांतून कमळ निर्माण करणें, डोक्यावर मडक्यांची उतरंड आणि हातांत तलवारी, जळत्या बाटल्या घेऊन नाचणें, असेंहि केवळ कसरतीचे नृत्यप्रकार ते सफाईने करून दाखवितात. भवाईचीं मुलें वडीलधाऱ्यांच्या अनुकरणाने लहानपणापासूनच असल्या कसरती करूं लागतात. गवयाचें पोर सुरावर रडावें, तशी भवाईच्या पोराचीं पावलें तालावरच पडत असतात. भवाई लोक आपला दुपारचा वेळ नृत्याची तालीम आणि नवीं नवीं नाट्यें जुळविणें यांत व्यतीत करतात. या बाबतींत 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' या तत्त्वाने ते चालतात. त्यांच्याबरोबर त्यांच्या बायकामुली असतात; पण त्यांना नाट्यांत भाग घेण्याचा तर सोडाच; पण प्रयोग पाहण्याचाहि अधिकार ते देत नाहीत. त्यांनी स्त्रीसमाजाला आपल्या कलेपासून पूर्णपणें अलिप्त ठेवलें आहे. बायकांनी पायांत घुंगूर बांधले, की त्यांचें शील बिघडलेंच, अशी त्यांनी ठोक समजूत करून घेतली आहे. आपल्या बायकांना उत्तम वस्त्राभरणें देऊन संतुष्ट ठेवणें, एवढी गोष्ट मात्र भवाई लोक आवर्जून करतात. हेंहि नसे थोडकें!

## राजस्थानी चित्रशैली

राजस्थानची दुसरी महनीय परंपरा चित्रकलेची. भारतांत अजंटा, कांगडा, मोगल, पहाडी अशा कांही प्रसिद्ध चित्रशैली आहेत. राजस्थानी शैली त्यांच्याच तोलामोलाची आहे. राजस्थानांत एक जमाना असा होता, की त्या वेळी तिथले राजप्रासाद आणि देव-मंदिरें यांच्या भिंती चित्रसृष्टीने खच्चून भरलेल्या असत. सारा देवलोक गंधर्व-अप्सरांसह जणु तिथे मुक्कामाला आलेला दिसे. जयपूर, जोधपूर, उदयपूर, बिकानेर, कोटा, बुंदी इत्यादि शहरें रंगीबेरंगी चित्रांनी सजलेलीं दिसायचीं. शहरांत माणसांपेक्षा चित्रेंच अधिक दिसायचीं.

राजस्थानी चित्रशैलीचा प्रमुख विषय म्हणजे राधाकृष्णांचा लीलाविहार. त्याबरोबरच गाई, गोप आणि गोपीहि आल्याच. सारें गोकुळ-वृंदावनच आलें. त्याच शैलीचें एक पोट कलम म्हणजे मेवाड शैली. ती शैली आत्मसात करणाऱ्या कलाकारांनी अनेक धार्मिक आणि पौराणिक आख्यानें भिंतीवर चित्रांकित केली. जोधपूर, बुंदी या ठिकाणच्या कलावंतांनी आपल्या चित्रांकनासाठी

लोकजीवन पसंत केलें. ते रमणींचें जलभरण, दूल्हा-दूल्हन, मृगया, ढोला-मारू इत्यादि विषयांत रंग भरूं लागले.

राजस्थानी कलमांतून आकाराला येणारी कोणतीहि स्त्री, मग ती पणिहारी असो, कृष्णमाता यशोदा असो, राधा असो वा सामान्य गौळण असो, ती अप्रतिम सुंदर असायची. तिचे डोळे एक तर खंजननयन असायचे अथवा मृगनयन असायचे. तिचा नाजूकपणा तर कांही बोलूंच नका. हात-बोट लावायलाही भीति वाटावी इतकी ती मऊसूत असते. वेणीची नागीण, पीनपयोधर, कृशकटी, कमलकर हीं सगळीं संकेतात्मक सौंदर्यलक्षणें तिथे हमखास आढळायचीं.



अभिसारिका राधा
( राजस्थानी शैली )

राजस्थानी चित्रकारांनी आपली कुंचली आणि विविध रंग यांनी एक नवाच चित्रलोक वसविला आहे. आपल्या आवडीप्रमाणे त्यांनी चित्रांतल्या व्यक्तींच्या मागे मनोहारी निसर्गहि उभा केला आहे. तसें पाहिलें तर मारवाड म्हणजे केवळ मरुभूमि. तिथला निसर्ग म्हणजे केवळ रुक्ष वाळवंट ! जिथें जळाची जवळीक नाही, तिथे निसर्गाला अंकुर फुटेलच कुठून ! पण प्रत्यक्षांतलें हें न्यून तिथल्या चित्रकारांनी आपल्या कल्पनासृष्टींत मुक्त हस्तानें पुरतें करून घेतलें आहे.

राजस्थानी चित्रकलेचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे राग-रागिणींचीं चित्रें. अशा चित्रांची संख्या बरीच आहे. या चित्रांचे सर्वांत सुंदर नमुने सतराव्या शतकांतले आहेत. त्यांतलें भावदर्शन आणि सौकुमार्य हीं दोन्ही चित्रकलेच्या क्षेत्रांत अप्रतिम समजलीं जातात.

रंग-रेखांच्या द्वारे संगीताचें निरूपण करणें ही खास भारतीय कल्पना आहे. राग हा नायक. रागिणी ही त्याची प्रियतमा. त्यांचे संयोग आणि

वियोग, त्यातून अंकुरणारे विविध भाव, असें आणखी कितीतरी त्या रागमालेच्या चित्रसृष्टींत पाहायला मिळतें. उदाहरणार्थ, तोडी रागिणीचें चित्र पाहा. त्या चित्रांत एक वीणाधारिणी सुंदरी दिसते. ती आपल्या भावनेचे स्वर छेडते आहे. आणि एक संगीतवेडा हरिण तिच्या मुखाकडे डोळे मोठे करून बघतो आहे. तशीच ती दुसरी बिलावल रागिणी. ती आरशांत पाहते आणि



राजस्थानी शैली

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... वि:
दाखल ... दि. ...

आपल्या रूपावर आपणच भाळते. सर्व रागिणींत भैरवीचें चित्रण अधिक प्रमाणांत आढळतें. भैरवी ही अविवाहित कुमारी आहे. तिला ‘ कधि करिसी लग्न माझें ’ असें झालें आहे. तिला स्वप्नांत मनोवांछित वर भेटला आहे. आणि आता तो प्रत्यक्षांत उतरून डोळ्यांपुढे उभा ठाकावा म्हणून ती शिवाची पूजा करते आहे.

त्या कलाकारांनी विविध रागांची सोयरीक विविध ऋतूंशीं जोडून दिली आहे. भैरव, मालव, श्री, हिंडोल, दीपक आणि मेघ हे सहा राग सहा ऋतूंचीं प्रतीकें म्हणून चित्रित केले आहेत. यांतल्या प्रत्येक रागाला एक नव्हे; दोन नव्हे; तर पांच रागिण्या लाभल्या आहेत. रागाला ऋतूंचा परिवेष ही कल्पना ग्रीक प्रतिभेलाहि अगम्य ठरली, आहे असें सर विलियम जोन्स हा कलासमीक्षक लिहितो. मारवाड शैलीनेंहि या परंपरेत भर टाकली आहे.

## राजस्थानी मूर्तिकला

जयपूर ही राजस्थानची राजधानी. देवदेवतांच्या मूर्तींचीहि ती राजधानीच आहे. जयपूर हें भारतांतलें एक प्रमुख मूर्तिकेंद्र ठरलें आहे. भारताच्या



मारवाड शैली.

निरनिराळ्या शहरांत आणि गावांत कित्येक मंदिरांतून सुंदर संगमरवरी मूर्ती पीठाधिष्ठित झालेल्या आढळतात. एखादीचें दर्शन घ्यावें, 'सुंदर ते ध्यान' क्षणभर न्याहाळावें आणि पुजाऱ्याला विचारावें, 'मूर्ति कुठून आणलीत ?' त्यावर बहुधा तो सांगतो, 'जयपूरहून आणली.'

अकबराचा सेनापति मानसिंह याच्या काळापासून जयपूरची मूर्तिकला पुनश्च विकासोन्मुख झाली. मानसिंहाने देशाच्या विविध भागांतून जे कलाकार आमेर येथें आणले, त्यांत मांडू, नारनौल, मंडावर व डीग या भागांतले कित्येक मूर्तिकारहि होते. १७२८ सालीं सवाई मानसिंहाने जयपूर नगर वसविलें, तेव्हा हे सगळे मूर्तिकार आमेर सोडून जयपूरला आले. जयपूरच्या बऱ्याचशा मूर्ति संगमरवराच्या असतात. हा दगड त्यांना मकरानाच्या खाणींतून मिळतो. कांही कलाकार रियालोच्या खाणींतलाहि दगड वापरतात. मूर्ति बनल्यावर एक विशेष प्रकारचा दगड तिच्यावर घासतात. त्यामुळे ती मूर्ति गुळगुळीत अन् तुकतुकीत होते. मूर्तिकारांच्या बरोबरीने तिथे चितेरे कलाकार आहेत. मूर्तिकाराने मूर्ति घडविली, की मग चितेरे तिला रंग देतात.

राजस्थानच्या मूर्तिकलेची ही परंपरा अडीच हजार वर्षांपासून चालत आलेली आहे. भरतपुरापासून तीन मैलांवर नोह नांवाचें एक गांव आहे. त्या गांवाच्या बाहेर माणसाच्या उंचीची एक यक्षमूर्ति असून ती सुमारे बावीसशें वर्षांइतकी जुनी आहे. मथुराक्षेत्रांत परखम गांवी जी एक यक्षप्रतिमा सापडली, तिच्याशीं या यक्षप्रतिमेचें बरेंच साम्य आहे.

जयपूरपासून पन्नास मैलांवर प्राचीन विराटनगर येते. सांप्रत त्याला बैराट म्हणतात. इथे उत्खनन झालें आणि त्यात कितीतरी मातीच्या मूर्ती अनावृत झाल्या. या मूर्ती मौर्यकालीन असल्याचें संशोधक सांगतात. जयपुरापासूनच सुमारे साठ मैलांवर लालसोट नांवाचें गांव आहे. तिथे कोण्या एका वंजाऱ्याची जीर्ण छत्री आहे. या छत्रीच्या आंत सहा खांब आहेत. ते शुंगकालीन कोण्या बौद्ध स्तूपाचे वेदिस्तंभ होते, हें सहज कळते. झालावाड क्षेत्रांत कित्येक ठिकाणी बौद्धगुंफा आणि स्तूपांचे अवशेष आजहि दिसतात. यावरून सातव्या आठव्या शतकापर्यंत राजस्थानांत बौद्ध धर्माचा बराच प्रचार होता हें कळून येतें. तत्कालीन शिलालेखांवरूनहि या अनुमानाला पुष्टि मिळते. नगरी या ठिकाणी मिळालेले कांही बौद्धस्तूप आजहि चितोगडावर सुरक्षित आहेत. कर्कोटनगर आणि मालवनगर या प्राचीन स्थळीं उत्खनन झालेलें आहे. या उत्खननांत सनपूर्व पहिल्या शतकांतल्या कांही मृण्मय मूर्ती मिळाल्या आहेत. त्यांतल्या महिषमर्दिनी, मकरध्वज, कामदेव,

इंद्रइंद्राणी, गदाधर, विष्णु इत्यादि मूर्ती मूर्तिविज्ञानाच्या दृष्टीनेहि महत्त्वपूर्ण आहेत. कुषाणोत्तरकालीन कांही मृत्तिकाफलक बिकानेरच्या संग्रहालयांत आहेत. त्यांत एक गोवर्धन कृष्णाची दीड फूट उंचीची प्रतिमा आहे. आजवर ज्या कृष्णमूर्ती सापडल्या, त्यांतली ही सर्वांत प्राचीन असल्याचें सांगतात.

जयपूर आणि त्याचा परिसर हें जसें बौद्ध धर्माचें केंद्र होतें, तसें मेवाड हें भागवतधर्माचें केंद्र होतें. मथुरा, विदिशा आणि मध्यमिका या तीन स्थलांनी बनवलेल्या त्रिकोणांत वैष्णव धर्माने आपली गुढी उभारली होती. मध्यमिका ही चितोडपासून आठ मैलांवर वसली होती. सांप्रत तिलाच नगरी असें म्हणतात. इथलें कृष्ण–बलरामाचें मंदिर भारतांतल्या सर्व वैष्णव मंदिरांत प्राचीन आहे. शुंगकालांत तें निर्माण झालें आणि यज्ञवेदी आणि बौद्धस्तूप यांच्या पद्धतीवर त्याची उभारणी झाली.

तिसऱ्या, चौथ्या शतकापूर्वी राजस्थानांत वैदिक यज्ञयाग बऱ्याच प्रमाणांत सुरू असल्याचें अनुमान करतां येतें. नांदसा, बडवा, बरनाला, बीचपुरियाँ आणि विजयगढ इथे मिळालेले यूपस्तंभ त्या अनुमानाला पुष्टि देतात. पांचव्या सहाव्या शतकांत म्हणजेच गुप्तसाम्राज्याच्या युगांत उत्तर भारतांतल्या प्रमाणेच राजस्थानांतहि अनेक मंदिरें आणि देवप्रासाद निर्माण झाले. हें सर्व स्थापत्य आजमितीस कालोदरांत गडप झालें आहे. या कालांतल्या स्थापत्याची सामक्षा दाखविणारी एकच कृति शिल्लक राहिली आहे आणि ती म्हणजे मुकुंदरा येथील शिवमंदिर ही होय. गुप्तकालांतल्या कित्येक सुबक सुंदर मूर्ती आजमितीस आमेरच्या संग्रहालयांत पाहायला मिळतात. त्यांत नृत्यमुद्रेंतला गणपति आणि सप्तमातृकांसह शिव या मूर्ती विशेष उल्लेखनीय आहेत. झालावाड संग्रहालयांत ठेवलेली अर्धनारीश्वराची प्रतिमा त्या युगाची सुंदरतम कलाकृति समजावी लागेल.

सातव्या आठव्या शतकांत या प्रदेशांत राजपुतांचा उदय झाला. राजपूत हे शिवाचे भक्त आणि शक्तीचे उपासक. तेव्हा त्यांनी जशीं कित्येक शिवमंदिरें निर्माण केलीं, तशींच दधिमाता, क्षेमंकरी, शर्करामाता, अरण्यवासिनी इत्यादि देवीमंदिरेंहि बांधलीं. हीं सगळीं मंदिरें नागर शैलींत बांधलेलीं होतीं. त्यांच्या

सभामंडपांच्या छतांवर स्तंभावर, आणि भिंतींवर नाना प्रकारच्या मूर्ती कोरलेल्या होत्या.


राजस्थानांत जैन मूर्तिकलेनेहि आपला संसार चांगला सजवला. भरतपूर संग्रहालयात आदिनाथाची एक चतुर्मुख मूर्ति आहे. तिला सर्वतोभद्र म्हणतात. ती एक गुप्तकालीन उत्कृष्ट कलाकृति समजली जाते. पींडवाडा, अमरसर, खिवसर, या ठिकाणी कितीतरी जैन धातुमूर्ति मिळाल्या आहेत. अबूच्या पहाडावरील दिलवाड्याचीं मंदिरें तर जैन मूर्तिकलेचीं श्रीमंत माहेरेंच होत.

राजस्थानांत आबानेरी व ओसियाँ या ठिकाणी गुर्जर–प्रतिहार यांनी बांधलेलीं मंदिरें गांधार शैलीवर आहेत. याच स्थापत्यशैलीच्या अनुकरणांतून पुढे खजुराहोची विश्वविख्यात शिल्परचना निर्माण झाली. त्यापुढच्या मंदिर-शैलीवर चालुक्य आणि परमार यांचा प्रभाव विशेषत्वाने दिसतो. आठ ते अकरा या शतकांत राजस्थानांत जैनांनीहि अनेक मंदिरें उभीं केलीं. याहि बाबतींत दिलवाड्याच्या विमलवसही आणि लूणवसही या मंदिरांचेंच नांव सर्वप्रथम घ्यावें लागतें. गर्भगृह, गूढमंडप, नवचौकी, रंगमंडप अशी त्या मंदिरांची लालित्यपूर्ण आणि विविधरम्य रचना प्रेक्षकाला मुग्ध करते. हीं मंदिरें वेसर शैलीवर उभारलेलीं आहेत. त्या पुढच्या काळांतलें राणकपूर येथील जनमंदिर निराळ्या शैलीचें आणि अतिभव्य आहे. पांच शिखरें, १४४४ स्तंभ, आणि ८६ देवकुलिका एवढा त्याचा बडिवार आहे. यावरून त्याच्या विशालत्वाचें अनुमान सहजच होऊं शकेल.

१७ आणि १८ या दोन शतकांत राजस्थानमध्ये वल्लभसंप्रदाय खूपच फैलावला. हा वैष्णवसंप्रदाय होता. त्यानें त्या प्रदेशांत कितीतरी मंदिरें उभारलीं. त्यांतलीं नाथद्वारा, कांकरोली, बिकानेर येथील मंदिरें विशेष प्रसिद्ध आहेत. या मंदिरांची शैली नागरही नाही आणि वेसरही नाहीं. त्याच्यावर प्रभाव आहे तो मोगल स्थापत्याचा. हीं मंदिरें विशाल आणि विस्तीर्ण खात्रीने आहेत; पण त्या विशालपणाला सौंदर्याची किनार नाही. उंच आणि प्रशस्त असे चौथरे अन् त्यांवर लांबरुंद दालनांची एकापुढे एक अशी उभारणी हे त्यांचें

तंत्र. ना आकार ना सौष्ठव. आणि खालपासून वरपर्यंत पांढऱ्या चुन्याचें सारवण. हजारो माणसें या मंदिरांत देवदर्शनाला जातात, पूजा करतात, प्रसाद घेतात आणि भक्तिप्रेमाचा आनंदही लुटतात. पण एखादा कलारसिक माणूस तिथें जाऊन आणि दर्शन घेऊनही कलात्मकतेच्या अभावामुळें उपाशीच राहतो.





# २-अबूयात्रा

एखादा प्रदेश पायांखाली घालायचा, मनांत योजलेलीं स्थळें पाहायचीं, तर त्याला अनेक वाटा असतात. राजस्थान पाहायला दिल्लीकडून निघालेला माणूस प्रथम जयपूरला येईल, तर अहमदाबाद-दिल्ली मार्गे निघालेला प्रवासी प्रथम अबूरोड स्टेशनला उतरेल.

## अबूचा पहाड


अबूचा पहाड म्हणजे राजस्थानचें महाबळेश्वर किंवा माथेरान. तो पहाडी रस्ता सदैव वाहता असतो. दिवसांतून आठ-दहा बसगाड्या वर चढतात अन् खाली उतरतात. पहाड कांहीं तसा गर्द रानाचा नाहीं. सह्याद्रीचे घाट चढतां-उतरतांना वनश्रीचे जे विविध आविष्कार दिसतात, तसा कांहीं अदृष्टपूर्व असा प्रत्यय अबूवर चढतांना येत नाहीं. पण मारवाडच्या वैराण प्रदेशांत हिरव्या रंगासाठी तहानलेल्या डोळ्यांना अबूचा पहाड म्हणजे जणू अमरपुरींतल्या देवेंद्राचा क्रीडापर्वतच वाटला, तर त्यांत नवल नाहीं.

पुराणांनी आमचें वर्णन केलें आहे, अशी बढाई सह्य-विंध्य-हिमाचलांनीच मारूं नये. अर्बुदाचल म्हणजेच अबू. हाहि तितकाच पुराणप्रसिद्ध आहे.

वसिष्ठ–विश्वामित्र या दोन्ही कठोर तपस्व्यांचा याला पदस्पर्श झालेला आहे. विश्वामित्र ऋषीचें तर अबू हें तपःस्थानच होतें. तिथल्या असुरांना त्याचें तें तप रुचलें नाही. ते त्याला सतत विघ्नें आणूं लागले. मग विश्वामित्राने देवांना प्रार्थून म्हटलें —

"देवहो! हा काय माझ्या मागे ताप! तुम्ही या असुरांचा बंदोबस्त करा."


मग सगळे देव स्वर्गांतून अबूवर उतरले. त्यांनी तिथे एक यज्ञ मांडला. त्या यज्ञकुंडांतून त्यांनी चौहान, वडिहार, सोळंकी आणि परमार अशीं चार



आदिपाल परमार–अबू

क्षत्रियकुळें निर्माण केलीं. त्या कुलांनी मग असुरांवर चौफेर हल्ला चढवून त्यांचा संहार केला. ही झाली विश्वामित्राची कथा. वसिष्ठाचा आश्रमहि इथे

जवळच आहे. त्या ठिकाणीं वसिष्ठ ऋषि ध्यानस्थ बसला आहे. जवळच त्याची कामधेनू उभी आहे. आणि त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे रघुकुलावतंस राम–लक्ष्मण त्याच्या दर्शनाला उपस्थित झाले आहेत.



दिलवाडा मंदिराचे कोरीव स्तंभ

वळणावाकणांनी अबूचा रस्ता कापीत वर चढतांना शिखरावर काय असेल, कसे असेल त्याची कल्पना येत नाही. पण बस माथ्यावर चढली, की हिरव्यागार वृक्षांच्या छायेंत तिथे इंद्राची अमरावती थाटलेली दिसते. सुधारलेल्या मानवसमाजाला आवश्यक त्या सर्व सोयी तिथे उपलब्ध आहेत. राहण्यासाठी उंच आणि प्रशस्त हवेल्या आहेत. फिरण्यासाठी भाड्याच्या गाड्या आहेत. क्रीडांगणें आहेत. चित्रपटगृहें आहेत. विविध सुंदर वस्तूंचीं दुकानें आहेत. सारें कांही आहे.

पण बहुतेक प्रवासी तिथे जातात ते एक तर गुरुशिखरावरच्या दत्त-स्थानाच्या दर्शनासाठी किंवा दिलवाड्याचीं जैन मंदिरें पाहण्यासाठी.

अबूचा पहाड हें जैनांचें प्रसिद्ध तीर्थ आणि कोण्याहि रसिकाचें कलाक्षेत्र आहे. इथे मूर्तिकलेने परमावधी आणि कोरीव कारागिरीने पराकाष्ठा गांठली आहे. संगमरवरी दगडांत निर्माण केलेला तो आरसपानी स्वर्ग आहे. बारीक, नाजूक, नक्षीदार आणि सालंकृत अशा मूर्ती ! प्रत्येकीचा घाट वेगळा, थाट वेगळा ! खांबावर, भिंतीवर, छतावर अन् घुमटाच्या पोकळींत सगळीकडे देव, ऋषि, मानव आणि गंधर्व ! खांबावरून दृष्टि काढलीत, की ती तोरणावर झेप घेते. त्या तोरणांतली कलाकुसर खरोखरीच अवर्णनीय आहे. पाहून पाहून दृष्टी थकते आणि 'वाहवा, वाहवा' म्हणतां म्हणतां वाणीला मौनाची मिठी पडते. गर्भगृह, गूढमंडप, रंगमंडप, नवचौकी, बावन्न जिनालय अशी त्या जैन मंदिराची रचना आहे.

एकाचें नांव विमलवसही आणि दुसऱ्याचें लूणवसही. पहिल्यांत ऋषभनाथ आणि दुसऱ्यांत नेमिनाथ विराजित आहे. ऋषभनाथाची मूर्ती सुंदर तर आहेच; शिवाय ती हिरेमाणकांच्या अलंकारांनी नुसती झळझळते आहे.

विमलशाह हा गुजरातच्या भीमदेव राजाचा प्रधान. त्याने १०३१ सालीं ऋषभनाथाचें हें मंदिर बांधलें. १८ कोट रुपये याच्या बांधणीला लागले म्हणे ! १३ व्या शतकांत वस्तुपाल आणि तेजपाल या दोघा बंधूंनी लूणवसही उभारलें आणि कलाकौशल्याच्या दृष्टीने तें विमलवसहीपेक्षांहि सरस ठरलें. या दोन मंदिरांनी जैन धर्माचा तर महिमा वाढविलाच; शिवाय भारतीय मूर्तिकलेलाहि गौरवान्वित केलें. लूणवसहीच्या प्राकारांतला हत्तीखाना तर प्रवाशांनी जरूर पहावा. तिथे संगमरवरी शुभ्र आणि भलेमक्कम अशा दहा गजराजांची कतार उभी आहे.

अबूवरच्या मुख्य वस्तीपासून सुमारे सहा मैलांवर हीं जैन मंदिरें आहेत. तिथून आणखी सुमारे चार मैल गेल्यावर अचलेश्वराचें मंदिर लागतें. त्या मंदिरांत लिंगाच्या जागीं एक खळगा आहे. त्यांत एक गुळगुळीत बाण आहे. त्या बाणाला काशीविश्वेश्वराच्या पायाचा अंगठा म्हणतात.

अचलेश्वराच्या पुढेच थोड्या अंतरावर अचलगढ लागतो. हा किल्ला राणा कुंभ याने इ. स. १४३३ सालीं बांधला. याहि किल्ल्यावर जैनांचीं चार मंदिरें आहेत. तिथून पुढे दोन मैलांवर ओरिया हें गांव लागतें. गुरुशिखरावर चढायचा मार्ग तिथूनच गेला आहे. अबूवरचें हें सर्वांत उच्च असें दत्तगुरूचें निवासस्थान! अनन्य-भक्तीचीं अन् धडधाकट पायाचीं माणसें तिथवर चढून धन्य होतात. बाकीचीं दुरूनच नमस्कार करून परत फिरतात. अर्बुदा ही या पहाडावरची स्थलदेवता होय. स्थानिक लोक तिला अधरदेवी म्हणतात. तीहि अशीच मुख्य वस्तीपासून थोड्या अंतरावर अर्ध्या डोंगरांत आहे. अबूवरचें सर्वांत मोठें आकर्षण म्हणजे सूर्यास्ताचा कडा. अस्तगामी सूर्याचें बिंब तिथून कांही आगळेंच दिसतें. समोर रंगांचा सागर उसळतो तोहि अद्भुतरम्य वाटतो. म्हणूनच अबूवरचे यात्रिक मुलाबाळांसह सूर्यास्तसमयीं त्या कड्यावर गोळा होतात. ती एक मोठी जत्राच असते.



दिलवाड्याची मनोहर मूर्ति

## कांकरोळी

अबूवरून खाली उतरायचें आणि मारवाडला जाणारी गाडी पकडायची. मारवाडला उतरून एका बारक्या फाट्याच्या गाडींत चढायचें. त्या फाट्यावरचें पहिलें क्षेत्र म्हणजे कांकरोळी. स्टेशनापासून गांव तीन मैलांवर आहे. टांगा मिळाला तर ठीक. न पेक्षा 'चरैवेति चरैवेति!'

वल्लभ संप्रदायाचीं जीं अनेक पीठें आहेत, त्यांतलें हें तिसरें पीठ मानतात. काशीला गेलेल्या यात्रेकरूला जसें गयेला गेल्यावांचून गत्यंतर नसतें किंवा द्वारकेला गेलेल्या माणसाला डाकोरला गेल्यावाचून यात्रेचें फळ मिळत नाही, तसेंच नाथद्वाराला जाणाऱ्या यात्रेकरूला कांकरोळीला गेल्यावाचून यात्राफल मिळत नाही. इथे मंदिर-संस्थेला लागूनच एक अतिविशाल तलाव आहे.

राजसागर हें नांव त्याला खरोखरीच शोभून दिसतें. समुद्राला जशा अनेक सरिता येऊन भेटतात, त्याप्रमाणेच तालेडी आणि गोमती या दोन नद्या राजसागराला येऊन भेटतात आणि त्याचें पाणी उन्हाळ्यांतहि अतूट ठेवतात. या तलावावर प्रशस्त घाट बांधलेले आहेत. देवदर्शन करावें आणि अर्धा तास त्या घाटावर सुखेनैव बसून वायुलहरींचें हितगुज ऐकावें. हें मंदिर विस्तीर्ण असल्यामुळे भाविकांना इथें नाथद्वारापेक्षाहि चांगल्या प्रकारें दर्शनाचा आनंद घेतां येतो.

**नाथद्वारा**

कांकरोळीहून अकरा मैलांवर नाथद्वारा हें पुण्यक्षेत्र वसलें आहे.



श्रीनाथजी
( नाथद्वारा )

कांकरोळीहून नाथद्वाराला जाण्यासाठी सारख्या बसगाड्या धावत असतात. जसे सौराष्ट्रांत द्वारका तसेच राजस्थानांत नाथद्वारा. दोन्हीहि वैष्णव

क्षेत्रें. नाथद्वारा हें वल्लभ संप्रदायाचें क्षेत्र आहे. इथल्या देवाला श्रीनाथजी असें म्हणतात. त्याच्या पूर्वेला टेकड्यांची रांग उभी आहे; तर पश्चिमेला बनास नदी वाहत आहे. त्यामुळे या क्षेत्राला निसर्गाचें संरक्षण आयतें लाभलें आहे. क्षेत्राजवळच एक सरोवर आहे, त्याचें नांव गिरिधरसागर.

श्रीनाथ हा देव मूळ व्रजमंडलांतला. गोकुळांतलें दहीं - दूध खाणारा आणि गोवर्धन पर्वतावर गाई चारणारा. त्याची ही बालमूर्ती वल्लभाचार्यांना प्रगट झाली आणि त्यांनी तिची मोठ्या भक्तिभावाने अष्टयाम सेवा आरंभिली. ही गोष्ट आहे पंधराव्या शतकाच्या अखेरची. पुढे औरंगजेबाच्या कारकीर्दींत इस्लामी छळवादाने उग्ररूप धारण केलें आणि गोवर्धनावरच्या या देवाला आपली शाश्वती वाटेनाशी झाली. त्याने आपल्या भक्तांना दृष्टान्त दिला, की 'मला इथून पळवा.' त्यासरशी भक्त जमा झाले आणि त्यांनी ती मूर्ती एका रथांत घालून राजस्थानचा मार्ग धरला. सिंहद या गांवीं रथ आला आणि त्याचीं चक्रें पुढे हालेचनात. भक्तांनी कल्पना केली, की बनासच्या तीरावरचें हें रम्य गांव देवाला आवडलें असावें आणि मग त्यांनी तिथेच त्या देवाची स्थापना केली. या घटनेमुळे गांवाचें मूळ नांव लुप्त झालें आणि त्याला नाथद्वारा हें नवें नांव प्राप्त झालें.

हा देव कुबेरालाहा आपल्या घरीं चाकरीला ठेवील इतका श्रीमंत आहे. त्याचा रोजचा खर्च ५००० रुपयांचा आहे, असें म्हणतात. यावरून वार्षिक खर्चाचें गणित मांडा. हा एवढा खर्च करीत असूनही हा देव 'दिवाळखोर नारायण। यासि बहुतांचें ऋण' असा बनलेला नाही. यावरून त्याची जमेची बाजूहि सहज कळून येईल. तिथला सगळाच कारभार प्रचंड आहे. असें सांगतात, की वल्लभ पंथांतल्या सुवासिनी या देवाला आपला एखादा तरी अलंकार अर्पण करतातच. अशा बावनकशी सोन्याच्या दागिन्यांनी श्रीनाथजीच्या आवारांतली एक खोल आणि रुंद विहीर भरून गेली आहे! श्रीनाथाच्या नैवेद्याला दुधाचे जिन्नस असतात. सगळे पदार्थ शुद्ध, सात्त्विक आणि साजुक! नैवेद्य झाल्यावर तेच प्रसाद म्हणून बाजारांत विकायला येतात. गल्लीभर प्रसादाचींच दुकानें! कुणी रबडी घ्या. कुणी मलई घ्या. फूलघरांत नाना जातींच्या सुवासिक फुलांचे डोंगर उभे असतात. शाकघरांत कोहळे, भोपळे,

सुरण, तवशी इत्यादि शाकभाज्यांचे प्रचंड ढीग सारखे येऊन पडत असतात. मेवाघरांत नाना परींची मिठाई सदैव बनत असते. मोठमोठ्या कढया चुल्यांवर सारख्या चढत उतरत असतात.

वल्लभसंप्रदायाचे लोक आपल्या देवळाला मंदिर न म्हणतां ' नंदजीका घर ' म्हणतात. त्यामुळे त्यांच्या मंदिराला शिखर नसतें. इथेहि तें नाही. ज्या स्थळीं श्रीनाथ विराजमान आहे तिथे तर त्यावर छतही नाही. तिथे एक सामान्यसें खपरेल असून तिथे एक सुदर्शन चक्र आहे. त्यावर सात ध्वजा फडकत असतात. त्यावरून त्याखालीं देव आहे असें समजायचें. मंदिराला मोठमोठीं सात दालनें आहेत. तीं गोलोकाची प्रतिनिधी मानलीं जातात. मंदिराच्या भिंतीवर कृष्णकन्हैय्याच्या बाललीला चित्रित केलेल्या आहेत. नाथद्वाराचीं भित्तिचित्रें चित्रसृष्टींत प्रसिद्ध आहेत.


इथे यात्रेकरूंची आणि साधुसंन्याशांची सदैव गर्दी असते. जीवनांत हताश झालेले, आयुष्याला विटलेले, उद्योगधंद्यांत बुडालेले, पापाचरणामुळे अस्वस्थ झालेले, असे अनेक लोक इथे क्षेत्रवासाला येतात आणि इथेच देह ठेवतात.

श्रीनाथ नवसाला पावतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे इथे दररोज कोणाचे ना कोणाचे तरी नवस फिटतच असतात. शंभर-दोनशें वर्षांपूर्वी तांबड्या समुद्रावरून व अरबस्थानांतून देखील देवाला नवस येत असल्याचे दाखले आहेत. हे नवशे बहुधा खलाशी असावे. असें सांगतात, की राजस्थानांत नाथद्वाऱ्याची कीर्ति जसजशी वाढत चालली, तसतसें राजपुतांचा कुलस्वामी एकलिंगजी याचें महत्त्व हळूहळू ओसरत चाललें. हीं दोन क्षेत्रें कांही मैलांच्या अंतरांतच आहेत ; त्यामुळे यात्रेकरूला द्वारकाधीशाचें वैभव आणि एकलिंगजीचें अकिंचनत्व ताबडतोब जाणवतें.

## कैलाशपुरी

नाथद्वाराहून उदयपूरला जातांना वाटेंतच एकलिंगजीची कैलाशपुरी भेटते. गांव लहानसेंच आहे; पण एकलिंगजीचें मंदिर मात्र भव्य आहे. सभोवती तटबंदी उभारून तें सुरक्षित केलेलें आहे. तिथलें शिवलिंग पंचमुख असून त्याच्या पश्चिमद्वाराजवळ पितळेचा नंदी आहे. बाप्पा रावळने हें

मंदिर बांधलें, असें सांगतात. त्याचा ढासळलेला पूर्वभाग राणा हम्मीरने परत बांधून काढला. राणा मोकलने त्याभोंवती तट उभारला. राणा कुंभाने मंदिराचा संपूर्ण जीर्णोद्धार केला. मेवाडचे सारे राजपूत राजे एकलिंगजीचे भक्त होते. त्यांची रणघोषणाही ‘ जय एकलिंगजी ’ अशीच होती.



एकलिंगजीचें मंदिर

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रम ३८२७० दि.
332 नों. दि.

## उदयपूर

तिथून उदयपूर फक्त बारा मैलांवर आहे. उदयपूरच्या परिसरांत शिरायचें तर आधी एक घाट उतरावा लागतो आणि खाली उतरल्यावर वाटतें, की उदयपूरला डोंगराचा निसर्गनिर्मित भव्य तट आहे. उदयपूर जणू डोंगरांच्या वाटींत नैवेद्यासारखें बसलें आहे.

उदयपूर हें राजस्थानांतलें सर्वांत मोठ्या लोकवस्तीचें शहर. त्याच्या सभोवती तटबंदी आहे आणि आत प्रवेश करायला चारी बाजूंनी वेशीचे दरवाजे आहेत. चितोड मुसलमानांच्या कब्जांत गेल्यामुळे राजपूत राजांना आपल्यासाठी नवी राजधानी निर्माण करण्याचा प्रसंग आला आणि त्यांनी

शत्रूला दुर्गम ठरेल, अशा जागीं हें नवें राजधानीचें नगर वसवलें. उदयसिंहाने याचा पाया घातला म्हणून त्याला उदयपूर हें नांव मिळालें.

हें शहर अनेक दृष्टींनी दर्शनीय आहे. इथे येणारा प्रत्येक प्रवासी ज्या कांही गोष्टी आवर्जून पाहतो, त्यांत पिचोला सरोवर हें अग्रगण्य आहे. चार चौरस मैल एवढा या जळवंतीचा व्याप आहे. हें सरोवर अलीकडचें नाही. तें निसर्गसिद्धहि नाही. चौदाव्या शतकांत हें बांधलें गेलें. लाखा बंजारा नांवाचा कोणी एक धनंतर लमाण होता. त्याने आपल्या गांठचें अपार धन कामीं लावून हें सरोवर तयार केलें, अशी आख्यायिका सांगतात. पिचोला या खेड्याजवळ त्याची निर्मिती झाल्यामुळे त्याला त्या गांवावरूनच नांव पडलें.

या सरोवराच्या उत्तरेस आणखी एक सरोवर आहे आणि तेंहि मनुष्यनिर्मितच आहे. त्याच्या तीन बाजूंना टेकड्या असल्यामुळे त्याची फक्त चौथी बाजूच तेवढी बांधावी लागली आणि तो दीड–दोन मैलांचा सुंदर जलाशय बनला. महाराणा फत्तेसिंहाने हा उद्योग केल्यामुळे त्या जलाशयाला फत्तेसागर असें नांव मिळालें.

सांप्रत पिचोला सरोवर आणि फत्तेसागर हे दोन्ही जलाशय मध्ये कालवा खोदून एकमेकांना जोडले आहेत. त्यामुळे


‘ जैशी जवळिकेचीं सरोवरें ।
उचंबळलिया कालवती परस्परें ॥ ’

ही ज्ञानेश्वरांची ओवी तिथे प्रत्यक्ष प्रचीतीला येते. जलाशयांच्या कडेने नितळ डांबरी रस्ता बांधलेला असल्यामुळे टांग्यांत बसून या भागाची सहल करतांना मोठी मजा येते. त्या जळाची गंभीर निळावंती मनाला मोह घालते. खरोखर अन्यत्र दुर्लभ असें हें निसर्गदृश्य आहे.

उदयपूरच्या राण्यांनी पिचोला सरोवरांत आरसपानी राजप्रासाद बांधले आहेत. त्यामुळे सरोवराची शोभा वाढली आणि त्यांची शान वाढली. त्या दोन प्रासादाचीं नांवे आहेत जगनिवास आणि जगमंदिर. जगनिवासमध्ये आता एक नवें सुखसमृद्ध हॉटेल बांधायचें ठरलें आहे. त्यासाठी तिथल्या महाल, दिवाणखाने, चौक, स्नानगृहें इत्यादि मूळ वास्तूंचें हॉटेलपद्धतीला

अनुकूल असें रूपांतर चाललें आहे. कालगतींत कशाचें काय होईल हें सांगतां येत नाही, हेंच खरें!

जगमंदिर हा राजमहाल पिचोल्याच्या दक्षिण बाजूस आहे. पिवळ्या दगडाचा तीन मजली गोल मनोरा हें या प्रासादाचें आकर्षण. आंतील स्फटिक शिळेची फरसबंदी हें वैशिष्ट्य!



पिचोला सरोवरांतील जगमंदिर राजवाडा

इथला राजवाडा हा राजस्थानांतल्या सर्व राजवाड्यांहून भव्य आणि विशाल आहे, असें सांगतात. वाडा कसला; ती एक उत्तुंग हवेलीच आहे. त्या हवेलीच्या चौथ्या मजल्यावर दोन-तीन विशाल वृक्ष वाढलेले आहेत. कवेंत मावणार नाहीत असे त्यांचे बुंधे आहेत. मला वाटतें, हा चमत्कार अन्यत्र पाहायला मिळणें कठीण! पिचोला सरोवराच्या समोरच एका टेकडीच्या माथ्यावर ही दुसरी प्रासादरूप शुभ्र टेकडी उभी केलेली आहे, म्हटलें तरी चालेल. केवढें लांबच लांब त्याचें अंगण! इतिहासकाळीं त्या अंगणाच्याच लांबीची गजराजांची कतार त्या प्रासादापुढती झुलत असे, असें म्हणतात. आम्ही पाहिलें त्या वेळीं त्यांतला एकच हत्ती शिल्लक उरला होता आणि तोहि वार्धक्याने खंगला होता. याचा अर्थ त्या राजप्रासादाचे गजांतवैभवाचे दिवस संपले होते.

हा राजवाडा आजमितीस सुनाच आहे. सांप्रतचे महाराणासाहेब त्या वास्तूंत राहत नाहीत. आत हिंडतांना आणि एकामागून एक मजले चढतांना त्या प्रासादाची जीर्णता जशी दिसून येते, तशीच त्याच्यांतली राजस्थानी कलाकुसरहि डोळ्यांत भरते. त्या वाड्यांत एक चित्रमहाल आहे आणि एक काचमहाल आहे. काचमहालात रंगीत काचा एकत्र जोडून तयार केलेलीं मोरांचीं चित्रें आहेत. तिथल्या ऐतिहासिक अवशेषांत किरणांचें प्रभावलय असलेलें एक सूर्यबिंब आहे. दरवाजाच्या फटींतूनच तें पाहावें लागतें. कारण तें बावनकशी सोन्याचें अतएव पिवळें धमक आहे. म्हणूनच त्याचा एवढा बंदोबस्त! मार्गदर्शक सांगतो, कीं तें सूर्यबिंब सव्वा मणाचें आहे.

शिसोदिया राजवंशाची कुलदेवता सूर्य आहे. शिसोदिये राजपूत सूर्यदर्शन केल्यावाचून अन्नग्रहण करीत नाहीत. राजवाड्याच्या दर्शनी भागावरहि असेंच एक सूर्यबिंब बसवलें आहे. जेव्हां आकाश अभ्राच्छादित असतें आणि त्यामुळे प्रत्यक्ष दर्शन घडत नाही, अशा वेळीं नगरवासी जन या सूर्यबिंबाचे दर्शन घेऊन आपले व्यवहार चालू करतात.

उदयपूर शहरांतलें सुप्रसिद्ध मंदिर म्हणजे जगदीशमंदिर आणि सुप्रसिद्ध उद्यान म्हणजे 'सहेलियोंकी बारी.' राजकुलांतल्या रमणींच्या विहारासाठी हें खास उद्यान निर्माण करून दिल्लीश्वराने तें महाराणा संग्रामसिंह (दुसरा) याला नजर केलें होतें. या उद्यानांत छोट्या मोठ्या बऱ्याच पुष्करिणी आहेत. काळ्या दगडाच्या कांहीं छत्र्या आहेत, त्याहि कलाकुसरीने मोहक केलेल्या आहेत. इथे लहान मोठीं अनेक कारंजीं आहेत. ठराविक शुल्क दिल्यानंतर त्यांची कळ दाबली जाते. त्यासरशी आपल्याला कल्पनाहि होणार नाही, अशा भिन्न भिन्न स्थळांतून आणि जळांतून कारंज्यांचे अगणित धुमारे एकदम वर फुटतात आणि आपलें धारानृत्य सुरू करतात. पुन्हा कळ फिरवली, की सारें कसें शांत! त्या जलधारा भूमीच्या कुशींत कुठे लपून बसतात, त्याचा मग पत्ताहि लागत नाही.

### जयपूर

चितोडची राजधानी मोडली म्हणून उदयपूर अस्तित्वांत आलें. पण कालगतीप्रमाणे त्याचाही राजधानीचा मान नष्ट झाला. सांप्रतची राजस्थानची

राजधानी आहे जयपूर. तें शहर पाहिलें, की त्याला मिळालेला हा मान उचित आणि समर्पक वाटतो. जयपूर केवळ राजस्थानांतलेंच नव्हे; तर अखिल भारतांतलें एक सुंदरतम असें शहर आहे. त्याची तुलनाच करायची तर ती गोमंतकांतल्या पणजीशीं करावी लागेल. दोन्ही शहरें कशीं आखीव रेखीव आहेत, प्रशस्त आणि प्रसन्न आहेत. वास्तुकलेच्या दृष्टीने पणजी शहर जयपूरपेक्षा उणें भरेल. पण मांडवी नदी आणि पश्चिम महासागर या दांपत्याने जणू त्याला मांडीवर घेतलें असल्यामुळे त्याची ती उणीवही भरून निघाली आहे.

जयपूर म्हणजे गुलाबी नगरी. घरें, खिडक्या, दारें, महाल, प्रासाद, सगळ्यांना एकच एक रंग आणि तो म्हणजे गुलाबी. तिथल्या नगरपालिकेने तसा कायदाच केला आहे, असें म्हणतात. प्रशस्त आणि समांतर निघून एकमेकांना छेदणारे उभे आडवे रस्ते. दुतर्फा वाहतूक. मधल्या पट्टींत दीपस्तंभांची रांग. रात्रौ त्यांच्या प्रकाशाने खुलून उठणारी विविधरंगी फुलझाडांची मधली मनोज्ञ पट्टी. शहराच्या तीन बाजूंना अर्धचंद्राकृती छोट्या मोठ्या टेकड्या. त्यांच्यावर कुठे किल्ला तर कुठे मनोरा. शहराभोवती भरभक्कम तट आणि आंत प्रवेश करायला अष्टमहाद्वारें. हें शहर आणि हा त्याचा परिसर पाहून कांही रसिकांनी जयपूरला 'दुसरें पॅरिस' म्हणून गौरविलें आहे.

या शहराचा निर्माता सवाई जयसिंह हा होय. औरंगजेबाचा सेनापति म्हणून दक्षिणेंत शिवछत्रपतींवर चालून आलेल्या मिर्झाराजा जयसिंह याचा हा नातू होय. इ. स. १६९९ ते १७४३ एवढी याची कारकीर्द. हा राजा जसा योद्धा होता, तसाच विद्यावंतहि होता. शस्त्र आणि शास्त्र या दोन्ही विषयांत त्याला सारखीच गती होती.

त्याची राजधानी प्रथम आंबेर येथे होती. त्याने ती तिथून हालवून जयपूरला आणली. हें शहर दृष्ट लागण्याइतकें सुंदर व्हावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी त्याने युरोपमधल्या कांही सुप्रसिद्ध शहरांचे नकाशे मागवून घेतले आणि त्यांचा बारकाईने अभ्यास करून प्रस्तुत शहराची आखणी केली.


जयपूरमधलें सिटीपॅलेस अनेक कारणांसाठी दर्शनीय ठरतें. या राजवाड्याने शहराच्या क्षेत्रफळापैकी सातवा हिस्सा एवढी जागा व्यापली आहे. या राजवाड्याची बांधणी अप्रतिम आहे. दक्षिणेंतील रामेश्वराचें मंदिर जसें



हवामहल

अनेक राजांनी आपापल्यापरी वाढवून अतिविशाल बनवलें, तसेंच या राजवाड्याचें झालें आहे. जयपूरच्या गादीवर आलेल्या राजपुरुषांनी आपापल्या कल्पनेप्रमाणे या राजवाड्याचा आकार वाढविला आहे. या वास्तूंत मुबारक-महाल नांवाचा जो एक दिवाणखाना आहे, तो कोरीव कामासाठी प्रसिद्ध आहे. संगमरवरी दगडांत केलेली तिथली कोरीव कलाकुसर

दिलवाड्याच्या जैन मंदिराशीं तुळण्याजोगी वाटते. तिथल्या पोथीखान्यांत महाराजांनी जमवलेल्या दुर्मिळ चित्रांचा आणि हस्तलिखितांचा संग्रह आहे. अकबराचा आश्रित असलेल्या अबुल फझल या महापंडिताने महाभारताचें पर्शियन भाषेंत भाषांतर केलें, असें आपण ऐकतों. पण ती दुर्मिळ प्रत इथे पाहायला मिळते. या राजवाड्याच्या परिसरांत एक चंद्रमहाल आहे. त्याचा तो सातमजली ढवळा मनोरा गगनचुंबी वाटतो. विविध प्रकारच्या चित्रांसाठी या महालाला भेट द्यायची. शिवाय तिथलें शस्त्रागारहि अवश्य पाहावें. प्राचीन काळापासून भारतांत जीं शस्त्रें निर्माण होत आलीं, त्या सर्वांचा तो एक खजिनाच आहे.



वेधशाळा, जयपूर

जयपूर म्हटलें, की सामान्य वाचकाला पहिल्याप्रथम आठवतो तो तिथला 'हवामहल'. जयपूरला जायचें तर तिथला हवामहल पाहायचा, हें प्रत्येकाच्या मनांत पक्कें असतें. चित्रकार आणि वर्णनकार यांनीं त्याची कीर्ति अशी दिगंत करून टाकली आहे. शहराच्या ऐन मध्यावर ही इमारत खडी आहे. हा हवामहल सवाई प्रतापसिंह याने १७९९ सालीं बांधला. याला पांच मजले आहेत. कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिराचे खांब मोजतां येत नाहीत, असें म्हणतात. हवामहलच्या खिडक्याही तशाच अगण्य ठरतात.

आणि त्या वरच्या छोट्या देवघरासारख्या सर्वत्र बसवलेल्या घुमट्या तरी किती मोजाल! त्याच्यासमोर उभें राहावें, मान उंच करावी, ‘वाहवा’ म्हणून त्या अद्भुत वास्तूची भलावण करावी आणि पुढे म्युझियमचा रस्ता धरावा.

जयपूरचें हें म्युझियम शहराच्या दक्षिणेस ऐसपैस जागीं रामनिवास उद्यानांत उभें आहे. संगमरवर आणि वाळूचा दगड यांनी त्याचें बांधकाम झालेलें आहे. इथे कारागिरीच्या वस्तूंचा, चित्रांचा आणि पितळेच्या स्थानिक वस्तूंचा फार मोठा संग्रह आहे.

सवाई जयसिंह विज्ञानाचा भोक्ता आणि ग्रहगणिताचा ज्ञाता होता. याचा पुरावा म्हणजे जयपूरची ती वेधशाळा. तिथले लोक तिला जंतर म्हणतात. या राजाने कित्येक नामांकित ज्योतिषी आपल्या राज्यांत आणवून वसते केले. त्याने भारतांत एकूण पांच वेधशाळा स्थापल्या. जयपूरची वेधशाळा ही त्या सर्वांतली प्रमुख होय. इथे ग्रहांचें गणित करायला उपयुक्त अशीं अनेक उपकरणें आहेत. तिथलीं तीं गोलाकार, अर्धगोल इत्यादि यंत्रें ताशीव दगडाचीं बनविलेलीं आहेत.

या यंत्रांच्या साहाय्याने तिथले ज्योतिषी स्थानिक वेळ निश्चित करीत. सूर्यादि ग्रह आणि तारे यांचीं परिभ्रमणें मोजीत. ग्रहणांचींहि गणितें करीत. इथे एक मोठा शंकूही बसवलेला आहे. त्याच्या छायेवरून दिनमानादि गोष्टी निश्चित करतां येतात.

जयपूरला गेल्यानंतर त्याची जुनी राजधानी आंबेरही पाहून यावें. जयपूरहून ती अवघी सहा-सात मैलांवर आहे. इथला राजवाडा टेकडीच्या माथ्यावर आहे. खालच्या माओता सरोवरांत पडणारें त्याचें प्रतिबिंब मोहक वाटतें. राजपूत युगाच्या स्थापत्याचा तो एक भव्य नमुना आहे. त्याच्या गणेशपोळ नामक दरवाज्यावर अप्रतिम कारागिरी केलेली आहे. या वाड्यांत दोन मंदिरें आहेत. एक जगत्शिरोमणीचें व दुसरें शिलादेवीचें.

## अजमेर

अजमेर हें राजस्थानांतलें आणखी एक प्रसिद्ध शहर. त्याला धार्मिक आणि ऐतिहासिक अशा दोन्ही दृष्टींनी महत्त्व आहे. भारतांतील मुसल्मानांची तर ती दुसरी मक्काच आहे. त्याचें कारण म्हणजे तिथला ख्वाजासाहेबांचा दर्गा.

या दर्ग्यांत ख्वाजा मोइनुद्दिन चिश्ती याची कबर आहे. हा इस्लामी धर्मप्रचारक ११ व्या शतकांत अफगाणिस्थानांतून इथे आला. इथे राहून हळूहळू त्याने आपलें माहात्म्य वाढवलें. खालच्या जातीतले हजारो लोक त्यानें बाटवले. त्याचा मृत्यूही इथेच झाला.

या दर्ग्यांत दोन मशिदी आहेत. दर्ग्याचें आवार फार मोठें आहे. प्रसाद शिजवण्यासाठी इथे दोन हौदासारख्या कढया आहेत. त्यांत १०० मण तांदूळ एका वेळीं शिजूं शकतो. अकबराच्या काळांत त्या बनवलेल्या आहेत. नाथद्वाराला जसे तुपाचे हौद, तसेच हे दर्ग्यांतले हौद समजावे. या दर्ग्याला अनेक मुसलमान बादशहांनीं इनामें आणि उत्पन्नें लावून दिलीं आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिंदु राजेहि त्या कामीं मागे राहिले नाहीत.

अजमेरचा किल्ला शहराच्या मध्यभागीं आहे. हजार फूट उंचीच्या टेकडीवर तो बांधलेला आहे. मुळांत त्याचें नांव अजय मेरू असें होतें. प्राचीन काळीं कोण्या अजयपाल नांवाच्या राजाने तो बांधला होता, असें म्हणतात. सांप्रतचा छोटासा किल्ला मात्र अकबराने आत्मचिंतनासाठी बांधला. अकबर जेव्हा अजमेरला येत असे, तेव्हा याच किल्ल्यांत मुक्काम करीत असे. या चौकोनी किल्ल्याचे बुरूज अष्टकोनी आहेत. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याचा वकील सर थॉमस रो याने भारतांत येऊन जहांगीर बादशहाला आपलीं अधिकारपत्रें याच किल्ल्यांत सादर केलीं. ही घटना १६१६ मधली आहे.


किल्ल्याच्या मध्यभागीं असलेल्या मोठ्या इमारतींत वस्तुसंग्रहालय आहे. दुर्मिळ चित्रें, नाणीं तसेंच कित्येक शिलालेख यांचा फार मोठा संग्रह तिथे आहे. राजस्थानांतील अनेक प्रेक्षणीय वास्तूंच्या छोट्या प्रतिकृतीहि तिथे बनवून ठेवल्या आहेत. हा किल्ला आणि तो वस्तुसंग्रह पाहून श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी जे विचार व्यक्त केले, ते फार मननीय आहेत—

" हिंदुस्थानांत इस्लामी संस्कृतीने उद्ध्वस्त केलेले कलेचे नमुने हजारोंनी आहेत. असे मंदिर नाही, की ज्याबाबत इस्लामी संस्कृतीने आपला घातक हात त्यावरून फिरवला नाही. असहिष्णुता हा इस्लामी स्वभावाचा व संस्कृतीचा महाप्राण आहे, असें निदान भारताचा इतिहास सांगतो. जें नको असेल तें नाहींसें करावयाचें, जें हवें असेल तें वाटेल त्या मार्गानें घ्यावयाचें हा

मुसल्मानी रियासतींचा संक्षेपाने इतिहास आहे. मंदिरें मशिदी झाल्या. मशिदी पुन्हा मंदिरें झालीं नाहीत. यांत स्वाभिमानशून्यता किती व आध्यात्मिक सहिष्णुता किती याचा निर्णय देणें कठीण आहे. प्रौढप्रताप छत्रपती शिवाजी-महाराजांच्या कारकीर्दींतहि मशिदींचीं मंदिरें झालीं नाहीत. उलट त्यांना देणग्या मिळाल्या. आजच्या निधर्मी राज्यांत तसें कांही होणार नाही, हें सांगण्याचें कारण नाही. कलेचे भोक्ते मोगल राजे होते असें म्हणतात. पण ती कला विश्वात्मक नव्हती. आकाराने ती विशाल असली तरी आध्यात्मिक मूल्याने तिच्यांतील आशय अल्पच होता. जुनें मोडून त्याच्यांतून नवी रचना आपल्या धर्मानुसार करावयाची असेंच त्याचें स्वरूप होतें. अकबर बादशहा सर्व धर्म समान मानणारा होता, असें म्हणतात. तें खरेंहि असेल, पण त्याने हिंदु मंदिर बांधल्याचा पुरावा अद्यापि उपलब्ध नाही. सहिष्णुतेच्या नांवाखाली हिंदु स्त्रियांशीं त्यानें लग्ने केलीं. पण ही सगळी यातायात एकमार्गी होती, असाच इतिहास आहे. हे व असे विचार त्या किल्ल्याच्या आवारांत असतांना निधर्मी राज्यांतील नागरिकाच्या मनांत अनुशासनाचे बंध तोडून आले, हें खरें आहे. किल्ल्याची पाहणी झाल्यानंतर अजमेर येथील प्रसिद्ध दर्गा शरीफ पहावयास गेलों. यापूर्वीहि २–३ वेळा गेलों होतों. दर्गा शरीफच्या व्यवस्थेसंबंधी लोकसभेंत बिल आलें होतें, त्या निमित्ताने दर्ग्या-संबंधीची बरीच माहिती मिळाली होती. या दर्ग्याला बहुतेक मोंगल बादशहांनी वतनें दिलीं आहेत. तसेंच अनेकांनी तेथे निरनिराळ्या मशिदी बांधल्या आहेत. मुख्य संत शेख चिस्ती याच्या दर्ग्याची इमारत लहान पण टुमदार आहे. शेकडो खिदमदगार आज तेथे विशेष कांही काम न करतां जीवन गुजारत आहेत. हिंदु राजांनी पण या पीराच्या स्थानाला पुष्कळच द्रव्यसाहाय्य केलें आहे. किंबहुना हिंदुस्थानांतील बहुतेक दर्ग्यांना व मशिदींना हिंदु राजांनी व प्रजेने साहाय्य केलें आहे व आजहि तेंच काम चालू आहे."

त्यानंतर तिथली आणखी एक वास्तु पाहायची ती म्हणजे अढाइ दिन का झोपडा. ही वास्तु मुळांत राजा बीसलदेव याने बांधली होती. त्या इमारतींत त्याने एक संस्कृत महाविद्यालय स्थापलें होतें. पण भंजक महमंद घोरीला ती वास्तु पाहवली नाही. त्याने ती पाडली आणि तिचें मशिदींत रूपांतर केलें.

ही इमारत हिंदु स्थापत्याचा एक उत्तम नमुना म्हणून समजली गेली आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत फकीर लोकांनी तिथे पंजाबशहाचा उरूस सुरू केला. हा उरूस अडीच दिवस चाले. त्यावरूनच या वास्तूला अढाइ दिन का झोपडा असें नांव मिळाल्याचें सांगतात.



अढाई दिन का झोपडा

अजमेरच्या तलावाचें नांव आहे अनासागर. दोन टेकड्यांच्या मध्ये बांध घालून हा जलाशय निर्माण केलेला आहे. अनाजी चौहान या राजाने १२ व्या शतकांत अजमेर शहराला ही जलसंपदा मिळवून दिली. अनाजी हा पृथ्वी-राजाचा आजोबा होता म्हणे! खरें सांगायचें तर उदयपूरच्या पिचोला

सरोवरापुढे अनासागर फिका आहे. पण त्याचीच प्रसिद्धि विशेष झाली आहे. जहांगीर बादशहाला तर अनासागर इतका आवडला, की त्याने त्याच्या काठी दौलतबाग नांवाचें विस्तीर्ण उद्यान निर्माण केलें. पुढे शहाजहाननेहि त्याच्या सौंदर्यांत अनेक प्रकारची भर टाकली. त्याने या तलावाच्या काठावर १२४० फूट लांबीचा स्फटिक मण्यांचा कठडा उभारला आणि स्फटिकाचींच पांच विश्रामस्थानें बनवलीं. याहून आणखी काय पाहिजे !

## पुष्कर

हिंदु यात्रेकरू अजमेरला उतरतो तो मुख्यत्वें पुष्कर तीर्थाला जाण्यासाठी. हें स्थान अजमेरच्या वायव्येस ७ मैलांवर आहे. इथे जायला अजमेरहून बस-गाड्या तासातासाला धावत असतात. अजमेर आणि पुष्कर यांच्यामध्ये जो लहानसा डोंगर आहे, त्याला नागपर्वत म्हणतात. पुष्करच्या भोवती चौफेर टेकड्या उभ्या आहेत. त्यामुळे त्या गांवाला आणि तिथल्या सरोवराला एक आगळीच शोभा प्राप्त झाली आहे.

पुष्कराचें माहात्म्य पुराणांनी मुक्तकंठाने गायिलें आहे. प्रयागाच्या गंगा-यमुना संगमाला जसें तीर्थराज म्हणतात, तसेंच पुष्कराला नुसतें पुष्कर न म्हणतां पुष्करराज म्हणतात. तीर्थांचें नांव घेतांनाच मुळी ‘ पुष्कराद्यानि तीर्थानि ’ असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. पद्मपुराण सांगतें —

यथा सुराणां सर्वेषामादिस्तु पुरुषोत्तमः।
तथैव पुष्करं राजंस्तीर्थानामादिरुच्यते ॥

सर्व देवांचा आदि जसा पुरुषोत्तम, त्याचप्रमाणे सर्व तीर्थांचें आदि पुष्करतीर्थ होय. पुष्कराची गणना कुरुक्षेत्राच्या व मानस सरोवराच्या बरोबरीने होते. निरनिराळ्या क्षेत्रांत कुठे कुठे ब्रह्मकुंडें आढळतात; पण तीं दुय्यम-तिय्यम स्वरूपाचींच असतात. ब्रह्म्याने निर्माण केलेलें आणि ब्रह्म्याच्या नांवावरच प्रसिद्ध असलेलें भारतांतलें एकमेव महाक्षेत्र म्हणजे पुष्कर होय. गोष्ट घडली ती अशी—

एकदा ब्रह्मदेव भूलोकीं भ्रमण करायला निघाला. सांप्रतच्या पुष्करानजिक त्याने एक निबिड अरण्य पाहिलें. विधात्याला त्याचें आकर्षण वाटून तो

त्यांत प्रविष्ट झाला. ब्रह्मदेवाच्या आगमनाने त्या वनांतले सारे वृक्ष हर्षपुलकित झाले. त्यानी पुष्पवर्षाव करून त्याचें आतिथ्य केलें. ब्रह्मदेव खूष होऊन त्या वृक्षांना म्हणाला. 'तुम्हांला जें काय हवें असेल, तें मागून घ्या.' त्यावर वृक्ष म्हणाले. 'भगवान्, तुम्ही याच वनामध्ये निवास करा. तुमचें सान्निध्य आम्हांला निरंतर लाभूं दे.' त्यावर ब्रह्मदेवाने 'तथास्तु' म्हटलें. तो मग सहस्रावधी वर्षें तिथेच राहिला. ज्या वेळीं त्या अरण्यांत ब्रह्मदेव प्रविष्ट झाला, त्या वेळीं त्याच्या हातांत तीन कमलें होतीं. कमलाला पुष्कर असें नांव आहे. हीं तीन कमलें, जिथे जिथे गळालीं, तिथे तिथे एकेक सरोवर निर्माण झालें.

हीं तीन सरोवरें ज्येष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ पुष्कर या नांवांनी प्रसिद्ध आहेत.


मग एक दिवस ब्रह्मदेवाने इथे एक मोठा यज्ञ करायचें ठरविलें. चंद्र नदीचा उत्तरभाग, सरस्वतीचा पश्चिमभाग, नंदनस्थानाचा पूर्वभाग आणि कनिष्ठ पुष्कराचा दक्षिणभाग एवढ्या क्षेत्राची यज्ञवेदी बनविली गेली. मग देवांना, ऋषींना निमंत्रणें गेलीं. ते सकुटुंब सपरिवार यज्ञस्थानीं दाखल झाले. भगवान् शिवही कपाल हातीं घेऊन त्या ठिकाणीं प्राप्त झाला.

यज्ञदीक्षेचा दिवस आणि मुहूर्त ठरला. सकाळपासून धांदल—गडबड सुरू झाली. ऋत्विजांनी सकल सिद्धता केली. ब्रह्मदेव स्नानादि कृत्यें आटोपून पाटावर येऊन बसला. यजमानपत्नी म्हणजे सावित्री. ती शेजारच्या पाटावर येऊन बसायची; पण बायकांचा जातिस्वभाव तिलाही नडला. तिची वेष-भूषा कांही केल्या उरकेचना! बरें, तिला घाई करावी म्हटलें, तर जवळ-पासहि ती कुठे दिसेना. मुहूर्ताची घटिका क्षणाक्षणाने जवळ येऊं लागली. पत्नी नाही म्हणजे यज्ञ नाही. मला वाटतें, ती स्वर्गीय अलंकार ल्यायला स्वर्गांत गेली असावी!

एवढ्यांत तिकडून एक गवळ्याची पोर येतांना दिसली. ती वर्णाने गोरीपान. रूपाने साजिरी गोजिरी. ब्रह्मदेवाने तिलाच यज्ञपत्नी करायचें ठरविलें. ऋषींनी तिला पुढे बोलावली. नांव विचारतांच ती म्हणाली. 'माझें नांव गायत्री. माझा जन्म गोपकुळांत झाला आहे.' त्यावर ऋषींचा दुसरा प्रश्न. 'तूं या परमेष्ठी ब्रह्मदेवाशीं लग्न करशील का?' तिने विधात्याकडे

एकवार पाहिलें आणि लाजेने मान खाली घातली. तीच अनुमति समजून त्याच मुहूर्तावर ऋषींनी 'सुमुहूर्त सावधान' म्हटलें. गायत्री यजमानपत्नी बनून ब्रह्म्याच्या उजव्या हाताला पाटावर बसली. तिच्यासह ब्रह्मदेवाने यज्ञदीक्षा घेतली. यज्ञकर्में सुरू झालीं.

एवढ्यांत 'सकळै शृंगार' करून सावित्री यज्ञमंडपांत प्रविष्ट झाली. पाहते तों तिची जागा दुसरीने घेतलेली! ती रागावली, चरफडली; पण



ब्रह्मदेवाचें मंदिर-पुष्कर

तिच्याकडे कोणींच लक्ष दिलें नाही. हा अपमान सहन न होऊन ती जवळच्याच एका डोंगरमाथ्यावर चढून बसली. आजही ती त्याच पर्वतशिखरावर आहे. तिचें त्या ठिकाणीं मंदिर बांधलेलें आहे. याच पर्वताच्या समोर दुसरा एक पर्वत आहे. तिथे गायत्रीचें मंदिर आहे. हें मंदिर शक्तिपीठांत गणलें जातें.

पुष्कर तीर्थाच्या भोवती ब्रह्मघाट, गौघाट, कपालमोचनघाट, बदरीघाट इत्यादि किती तरी घाट बांधलेले आहेत. या तीर्थांत स्नान करून मग

ब्रह्मदेवाच्या दर्शनाला जायचें. इथे ब्रह्मदेवाचें मोठें मंदिर आहे. त्यांत चतुर्मुख ब्रह्मप्रतिमा विराजित आहे. त्याच्या उजव्या अंगीं सावित्री आणि डाव्या अंगीं गायत्री आहे. सनकादि मुनींच्याही मूर्ती त्या मंदिरांत आहेत. याच ठिकाणीं भगवंताचा वराह अवतार ब्रह्मदेवाच्या नाकपुडींतून प्रकट झाला.

पुष्करचीं प्राचीन मंदिरें औरंगजेबानें उद्ध्वस्त केलीं होतीं. त्यामुळे हें तीर्थस्थान उजाड झालें होतें वर्तमान मंदिरें, धर्मशाळा आणि घाट हें सर्व राजस्थानांतील राजांनी निर्माण केलें आहे. विनशन क्षेत्रांत लुप्त झालेली सरस्वती नदी पुनश्च पुष्कर क्षेत्रांत प्रकट झाली, असें सांगतात. कार्तिक महिन्यांत इथे मोठा थोरला मेळा लागतो. कारण कार्तिकांत पुष्कराचें माहात्म्य विशेष सांगितलें आहे. पुष्कर तीर्थापासून थोडया अंतरावर यज्ञ-पर्वत आहे. त्याच्याजवळ अगस्ति ऋषींचा आश्रम व अगस्त्यकुंड आहे. पुष्कर तीर्थांत स्नान केल्यावर अगस्त्यकुंडांत स्नान केलें, तरच पुष्करची यात्रा सांगसुफळ होते. पुष्करांत अलिकडेच रामानुज पंथाचें एक मंदिर बांधण्यांत आलें. त्याला श्रीरंगमंदिर म्हणतात. हें मंदिर दर्शनीय आहे, चित्रित आहे आणि समृद्धही आहे. पुष्करच्या सर्व मंदिरांत हें मंदिर उठून दिसतें. क्षेत्राला त्याच्यामुळे फार शोभा आली आहे.

राजस्थानांतलीं अनेक शहरें आणि स्थळें प्रसिद्ध आहेत. जोधपूरचा किल्ला प्रेक्षणीय आहे. राजस्थानांतला हा सर्वोत्तम किल्ला समजला जातो. राणकपुर शहरांत अनेक जैन मंदिरें आहेत. जेसलमेर येथे जैनांचे हस्तलिखित ग्रंथ आणि ताडपत्री पोथ्या यांचें समृद्ध भांडार आहे. कोटा शहरांतल्या जुन्या राजवाड्यांतहि हजारों मौल्यवान्, हस्तलिखित ग्रंथ आहेत. बिकानेरचा किल्ला म्हणजे भक्कम व मजबूत अशा देशी बांधणीचा नमुनाच म्हणतां येईल. अलवारच्या शस्त्रागारांत अकबर, जहांगीर, नादिरशहा, औरंगजेब इत्यादि सम्राटांच्या तलवारी जपून ठेवलेल्या आहेत. भरतपूरचा किल्ला आणि 'विहगविहार' प्रसिद्ध आहे.

## चितोडगड

पण राजस्थानांतलें सर्वांत अवश्य दर्शनीय असें कोणतें क्षेत्र असेल, तर तें चितोगड. राजस्थानचा आणि राजपुतांचा समग्र इतिहास या चितोड

★

गडाभोवती प्रदक्षिणा करीत आहे. तें एक ज्वलंत क्षेत्र आहे. म्हणूनच एका राजस्थानी कवीने पुढील काव्यपंक्ती लिहून ठेवली आहे. —

‘ क्रोड युग तपस्या करे तब पावे गढ चितोड ! ’

माझी तशी तपश्चर्या झाली असावी. कारण एका सुंदर सुप्रभातीं मला चितोड गडाचें दर्शन घडलें.

चितोडला गेलेले आणि न गेलेलेहि त्याचे जणू भाट बनतात. सूर्याभोवती जशी ग्रहमाला तसा राजस्थानचा सारा इतिहास या चितोडभोवती प्रदक्षिणा घालतो. चितोड कळलें, की राजस्थान कळलें. ‘ शितावरून भाताची आणि पाकळीवरून फुलाची परीक्षा ’ तसेंच आहे हें ! ती एक शतकानुशतकांची समरस्थली आहे. तिथे सतीत्वाचे हिमालयाएवढे उत्तुंग आदर्श खडे आहेत. तिथे पराक्रमाची पराकाष्ठा आहे. तिथे प्राणत्याग ही मामुली चीज आहे. तिथे धर्माभिमानाचे निखारे पंचप्राणांच्या विंझण वाऱ्याने फुलवले गेले आहेत. तिथे सर्वस्वाच्या त्यागासाठी अहमहमिका लागलेली आहे. तिथल्या भूमीचा कणन् कण स्वातंत्र्याच्या मंत्राने जणू भारलेला आहे. तिथला प्रत्येक दगड शाळीग्रामाशीं तुळावा असा आहे.

रात्री ९ वाजतां आम्ही चितोड स्टेशनवर उतरलों. एका धर्मशाळेंत रात्र काढली. सकाळीं उठतों, तर धर्मशाळेच्या दारांतच टांग्यांचा तांडा उभा होता. स्टेशनापासून चितोडगड १॥–२ कोसांच्या अंतरावर होता. जातांयेतांचा ‘ भाडेपट्टा ’ करून आम्ही टांग्यांत आरूढ झालों. तो म्हातारा घोडा खुडुक् खुडुक् करीत रस्ता कापूं लागला. वाटेंत एक लहानशी नदी भेटली. तिचें नांव गंभीरी असल्याचें टांगेवाल्याने आम्हांला सांगितलें. त्यापुढे गांव लागलें. आम्ही तेंहि मागे टाकलें. चितोडगड आम्हांला पावलापावलाने जवळ होऊं लागला. ठेंगणाठुसका आणि सर्वांगीं सुटा असा तो गड आहे. त्याचें पठार म्हणजे एक दीर्घ वर्तुळ समजावें; थेट माथ्यापर्यंत वाहनें जातात, त्यावरून त्याची चढण कितीशी कठीण असेल, त्याविषयी कल्पना करतां आली.

आमच्या सिंहगडाची ती उभीच्या उभी कणी खालून पाहतांनासुद्धा छातीवर दडपण आणते. राजगड आणि तोरणा चढतांना तर छातींतला

वाराच खलास होतो. मराठ्यांचा सारा इतिहास चढतां उतरतां तांब्या तांब्या घाम गाळायला लावणाऱ्या अशा दुर्गम गडांवरच घडला आहे. पन्हाळगड पाहून भूषण कवीची ती उक्ति स्मरते—

“ देखत ऊँचाई उदरत पाग, सुधी राह घोस हूँ मैं चढे तेजे·साहसैंनिकेत हैं ”

‘ पंन्हाळ्याची उंची पाहूं गेलें असतां पागोटें मागे गळून पडतें. धाडसी लोक फक्त दिवसा आणि तेहि सरळ रस्त्यानेच वर चढूं शकतात. ’

त्या मानाने चितोडगड किती खुजा, किती साधा अन् किती सुगम ! महाराष्ट्रांतले ते प्रचंड गडकोट न पाहतां उगीच एक राजस्थानी कवि गर्वोक्ति बोलून गेला आहे—

“ गढ तो चितौड गढ और सब गढैय्यां ! ”

मी मनांत म्हटलें, ज्याचें वांगें त्याला गोड !

अशा कांहीशा विचारांच्या तंद्रींत वाट चालत असतांना आम्ही गडाच्या महाद्वारापाशी केव्हा येऊन थडकलों, तें कळलेंच नाही.

या महाद्वाराचें नांव आहे ‘ पाडनपोळ ’. गडाला असे एकूण सात पोळ आहेत. पाडनपोळांत शिरतांना उजव्या हाताला एक संगमरवरी शिळा बसविलेली आहे. तिच्यावर काळींभोर अक्षरें दिसतात, तीं अशीं—

गाडी लुहारोंका चितौडगढमें प्रवेश इ. स. ६ एप्रिल १९५५

चितोडगडाच्या इतिहासांतील ती एक महान् घटना होती. गाडी लोहार म्हणजे लोखंडी हत्यारें बनविणारे आणि बैलगाडींतून हिंडून तीं विकणारे कारागीर लोक ! गडावर राहून तिथल्या राजपूत वीरांना लहान-मोठीं युद्धोपयोगीं हत्यारें बनवून देण्याचें काम ते करीत. चितोडगडाचा तिथल्या राज्यकर्त्यांचा आणि सगळ्या राजस्थानाच्या स्वातंत्र्याचा, त्यांनाहि जाज्वल्य अभिमान होता. १५६८ सालीं अकबराने चितोड काबीज केलें आणि त्यावर आपला अंमल बसवला, ही गोष्ट गाडी लोहारांना दुःखदायक आणि अपमानकारक वाटली. त्याच क्षणीं त्या सर्वांनी ठरविलें.

“ यापुढे चितोडच्या परिसरांत राहणें नाही ! चितोड पुनश्च स्वतंत्र होईपर्यंत गंभीरी नदी ओलांडून आंत येणें नाही ! ! ”

आणि त्या समस्त जातीने महाप्रस्थान करून चितोडचा त्याग केला. ते वर्षानुवर्षे, शतकानुशतकें गुजरात, सौराष्ट्र, माळवा, इत्यादि प्रदेशांत भटकत राहिले. या गाडी लोहारांचे पांच ' पण ' होते—



गाडी लोहार स्त्री

( १ ) कुठेहि स्थायिक वस्ती करायची नाही. ( २ ) छपराखाली राहायचें नाही. ( ३ ) विहिरींतून दोराने पाणी काढायचें नाही. ( ४ ) दिवा लावायचा नाही. आणि ( ५ ) खाटेवर झोपायचें नाही.

भारत स्वतंत्र झाल्यावर राजस्थान सरकारने या निग्रही जातीची दखल घेतली. हें स्वातंत्र्य केवळ राजस्थानलाच नव्हे; तर अखिल भारताला मिळालें होतें. आता फक्त त्या लोकांना चितोडमध्ये प्रवेश करायला लावण्याचें काम तेवढें शिल्लक राहिलें होतें. अखेर तोहि ' सोनियाचा दिवस ' उगवला. समारंभपूर्वक प्रवेशाची सर्व सिद्धता झाली. हजारों गाडी लोहार तिथे येऊन

स्वातंत्र्यसूर्यांच्या उन्हांत न्हाणाऱ्या त्या चितोडगडाकडे दृष्टि लावून गंभीरी नदीच्या ऐल तीरावर उभे राहिले. पं. जवाहरलाल नेहरू हे त्या समारंभाचे अध्यक्ष होते. ते त्या समुदायाला म्हणाले :

"तुमचा 'पण' सिद्धीस गेला आहे. आता तुम्ही नदी ओलांडून चितोडच्या किल्ल्यांत प्रवेश करा. मी तुम्हांला माझ्याबरोबर चलण्याची विनंती करतों !"

त्या क्षणीं एकच जयजयकार गर्जिन्नला आणि भारताच्या त्या श्रेष्ठ नेत्याच्या समागमें त्या सर्व गाडी लोहारांनी पाडनपोळाच्या महाद्वारांतून गडाच्या परिसरांत पदार्पण केलें.

आम्हीहि आतां त्याच महाद्वारांतून आंत प्रवेशलों होतों. दुसरा भैरो पोळ ओलांडल्यावर उजव्या हाताला डोंगर उताराच्या मुळाशीं आम्हांला दोन मेघडंबऱ्या दिसल्या. त्यांतली एक आहे चार खांबी अन् दुसरी आहे सहा खांबी. चौखांबी आहे, ती कल्लाची आणि सहाखांबी आहे, ती जयमल्लाची. त्यांच्याजवळ एक दोन आंब्यांचीं झाडें आहेत. त्या मेघडंबऱ्या किंवा छत्र्या आहेत साध्याच; पण ज्यांच्या नावाने त्या उभारल्या आहेत, त्या वीरपुंगवांनी सम्राट अकबराच्या पोटात आवळे शिजवले होते, हें विसरतां कामा नये. गडाच्या चढणींतलें हें पहिलें वीरदर्शन !

या वीरांचें रणतांडव पाहण्यासाठी आपल्याला इ. स. १५६७ सालापर्यंत मागे जायला हवें. त्या वेळीं दिल्लीच्या तख्तावर अकबर आरूढ झाला होता. सारा आर्यावर्त त्याने आपल्या अधिसत्तेखाली आणला होता. कित्येक राजपूत राजांनी आपल्या कन्या त्याला समर्पून त्याची कृपा संपादिली होती. अनेक राजे महाराजे त्याच्यापुढे नमले होते; पण इतकें होऊनहि अजून चितोडवर मेवाडच्या राण्याचा आदित्यध्वज फडकत होता. मेवाडविजय झाल्याखेरीज अकबराच्या भारतविजयाला पूर्तता नव्हती आणि मनाला सांत्वना नव्हती. तेंच कार्य पूर्ण करण्यासाठी त्याने आता चितोडवर समस्त दळभारानिशी धाड घातली होती. ही मोहीम जातीने चालविण्यासाठी तो चितोडच्या गडाखाली डेरेदाखल झाला होता. यावरून मेवाडविजयाचें महत्त्व त्याला किती वाटत होतें, तें कळून येतें.

त्या वेळीं उदयसिंह हा मेवाडच्या गादीवर होता. जयमल्ल राठोड आणि पत्ता सिसोदिया हे दोघे त्याचे सेनापति. त्यांनी त्याला सांगितलें, " महाराज, प्रसंग बांका आहे. शत्रू मातबर आहे. त्याच्या तोफखान्याचे गडावर मोर्चे लागत आहेत. गडाला जबरदस्त वेढा पडणार आहे. तेव्हा महाराज, तुम्ही आजच्या आज आपल्या परिवारासह पहाडांत निघून जा. राजा आणि राजवंश शाबूत राहूं दे. किल्ला आम्ही लढवितों. "

राण्याने त्यांचें म्हणणें ऐकलें. तो पहाडांत निघून गेल्यावर जयमल्ल अन् पत्ता या दोघां सेनापतींनी रणखांब पुजला. ते म्हणाले, ' आता आम्ही आहों अन् गनीम आहे ! ' अकबर वेढा घालून बसला होता, गडाची रसद तोडीत होता, तरी त्या दोघांनी शत्रूला आंतून अन् बाहेरून असा बेदम मार दिला, की अकबराचे डोळेच पांढरे व्हायची वेळ आली. तो गडाला तोफेच्या गोळ्याने दिवसा जें भगदाड पाडी, तें जयमल्ल रातोरात बुजवून काढी. सहा महिनेपर्यंत जयमल्लाने यवनांचा गडाला पदस्पर्श होऊं दिला नाही. त्या रण-धुमाळींत अकबराचें सैन्य किती मेलें, त्याचा त्यालाच पत्ता लागेना. अकबर गडाचा वेढा उठवून परत फिरावें की काय, या विवंचनेंत पडला. पण त्याचें नशीब शिकंदर होतें. एका रात्रीं गडाचें खिंडार बुजवीत असतां जयमल्लाच्या पायाला गोळी लागली आणि तो सैन्याचा धुरंधर सेनापति घायाळ झाला.

त्याचा कल्ला नांवाचा एक इमानी पाईक होता. तो जयमल्लाला म्हणाला—

" राठोडजी, तुम्ही आता विश्रांति घ्या. तुमच्या जागीं हा पाईक उभा राहील. "

" आता विश्रांति युद्ध संपल्यावर. " जयमल्लाने उत्तर दिलें.

" मग बसा माझ्या पाठुंगळी. आपण दोघे एकत्र लढूं. " कल्ला बोलला.

ती युक्ति पसंत ठरली. कल्लाने जयमल्लाला पाठुंगळी घेऊन गच्च बांधलें. जयमल्लाचे दोन अन् कल्लाचे दोन असे चार हात लढायला मोकळे झाले. जयमल्ल नव्या युगांतला चतुर्भुज विष्णु बनला. मग तो सरळ सरळ अकबराच्या सैन्याला भिडला. त्याची ती धडक, तो विजेच्या लोळासारखा त्याचा आवेश पाहून अकबराने नुसता ' आ ' वासला. अकबर सैन्यबळावर, द्रव्यबळावर लढत होता. पण जयमल्ल केवळ आत्मबळावर लढत होता. राजपुतांचा पक्ष

सर्वांर्थी दुर्बळ होता. ते मारायला किंवा त्याहिपेक्षा मरायलाच उद्युक्त झाले होते. त्यामुळे तें घमसान युद्ध शेवटीं जयमल्लाच्या अंगावर आलें. तो रणांगणांत घाव लागून पडला.

त्याला उरीं घाव लागलेला पाहून कल्लाने त्याचें तें निष्प्राण गांटोडें खाली ठेवलें आणि तो यवनसैन्याच्या व्यूहांत अभिमन्यूच्या साहसाने मुसंडी मारून घुसला. तो कत्तल करीत पुढे जात असतां त्याचेंहि मरण ओढवलें. त्याचें मुंडकें उडालें. पण त्यापुढची ख्याति सांगतात ती अशी, की मुरारबाजीप्रमाणे त्याच्या नुसत्या कबंधानेच कित्येक यवनांचीं शिरें धडावेगळीं केलीं.

गडाच्या वाटेवर त्याची छत्री बांधली गेली, ती त्याच्या याच बहादुरीसाठी. सेनापति जयमल्ल हा केवळ इतिहासाच्या पानांतच बंदिस्त राहिला. पण कल्ला मात्र मरून 'देव' झाला. राजस्थानांत जागोजाग कल्लाच्या नांवाचे दगड उभारलेले असून लोक त्याची पूजा करतात अन् तानाजीच्या पोवाड्यासारखे त्याचे पोवाडे भक्तिभावाने गातात, ऐकतात.

दुसरा सेनापति पत्ता! जयमल्ल पडला आणि कल्लाहि वीरगतीला गेला, हें त्याला वर समजलें. तो म्हणाला, 'फर्जी गेला, आता प्यादी जगून वाचून काय कामाचीं!' त्या क्षणीं त्याने धडाधड चितोडचीं द्वारें उघडलीं आणि गडावरचें होतें नव्हतें तेवढें सैन्य अकबरावर लोटून दिलें. त्या निर्णायक लढाईत तो स्वतः आघाडीवर उभा ठाकला. त्यानेहि पराक्रमाची शर्थ केली. पण अखेर तोहि धारातीर्थी पतन पावला. अकबराच्या गजदळांतल्या एका हत्तीने त्याला आपल्या सोंडेने उचलून अचळई अकबराच्या पायाशी आणून घातलें. अकबर जयमल्लाप्रमाणे त्याच्याहि पराक्रमाने विस्मित झाला. चाकराने धन्यासाठी प्राणहि तुच्छ लेखणें, ही गोष्ट अकबराच्या कोष्टकांत अगदी नवीन होती. त्याला तें सारेंच अद्भुत वाटलें. त्याने मग आपल्या कारागिरांना हुकूम सोडला, "जयमल्ल आणि पत्ता या दोघांहि नरवीरांचे पुतळे आपल्या आगऱ्याच्या राजवाड्याच्या महाद्वारांत उभे करा."

अखेर तें युद्ध अकबराने जिंकलें. तो चितोडगड चढून वर आला. विजय मिळाल्यावरहि तो माणुसकीने वागला नाही. त्याने गडावरच्या उरल्या सुरल्या

राजपूत सैनिकांना कंठस्नान घातलें, असें श्री. देशपांडे सांगतात. आपल्या त्रासांचा सारा सूड त्याने गडावरच्या जित्या जिवांवर उगवून घेतला. तिथल्या वस्तूंचा अन् वास्तूंचा विध्वंस केला तोहि फार मोठ्या प्रमाणावर !

आम्ही गड चढून त्या वीर पत्ताची छत्री पाहायला गेलों, तेव्हा तिथे आम्हांला गडावरचा एक मार्गदर्शक भेटला. त्याला गिऱ्हाईक हवेंच होतें. लगेच त्याने आमची संगत धरली. त्याचें नांव होतें मदनलाल शर्मा. एका काळीं त्याचे पूर्वज राजपूत राण्यांचे पुरोहित होते. त्या राण्यांविषयीची निष्ठाहि वंशपरंपरेने त्याच्या रक्तांत उतरली होती. तो आम्हांला म्हणाला,

" चितोड काबीज केल्यावर अकबरानं केलेला विध्वंस तुम्हांला पाहायचा आहे काय ? या तर माझ्या मागोमाग. "


त्याने तिथल्या पुरातत्त्वखात्याच्या कचेरीपाशी आम्हांला नेऊन उभें केलें. तिथे एक जुनाट वृक्ष होता आणि त्याच्या चौफेर त्या मैदानांत भंगलेल्या देवमूर्तींचा जणू खच पडला होता. कांहीचें शिर तुटलेलें. कांहीचें नाक तुटलेलें. कांही मूर्ती उभ्या फुटलेल्या; कांही आडव्या भंगलेल्या !

" पाहिलात ? हा अकबराचा पुण्य पराक्रम. 'तिसरा शाका' म्हणून हें सारं प्रकरण इतिहासांत प्रसिद्ध आहे. "

आता तो मदनलाल वक्ता आणि आम्ही सावधान श्रोते झालों होतों. तो पुढे जात होता, आम्ही त्याचें अनुगमन करीत होतों. मधेच खडबडीत रस्ता, मधेच पायवाट, असें करीत आम्ही गडाच्या दक्षिण अंगाकडे निघालों होतों. गडावर सिताफळी विपुल होत्या; पण त्या मोसमांत त्यांना फळें नव्हतीं. माती केसरिया रंगाची अन् तिच्यावर लख्ख ऊन पसरलेलें. पण आम्हांला त्या उन्हाचा ताप वाटत नव्हता. गडावरची तुरळक वस्ती अधून मधून भेटायची. जुन्यापुराण्या, कांही भग्न, कांही अर्धभग्न अशा त्या ऐतिहासिक वास्तू पाहत पाहत आमचें मार्गक्रमण चाललें होतें. थोड्याच वेळांत आमच्या मार्गदर्शकाने आम्हांला तिथल्या त्या जयस्तंभासमोर नेऊन उभें केलें.

चितोडचा तो जयस्तंभ ! भारतांतलें एक नांवाजलेलें स्थापत्य ! त्याचे फोटो कितीहि पाहिले असले तरी प्रत्यक्ष दर्शनाचा आनंद कांही आगळाच ठरतो.

"हा जयस्तंभ राणा कुंभानें उभारला. १५ व्या शतकाच्या पूर्वार्धांत हा प्रतापी पुरुषश्रेष्ठ मेवाडच्या गादीवर आला. राणा प्रतापच्या नांवाचा डंका सर्वत्र वाजतो, तें योग्यच आहे; पण हा पुरुष कांही औरच होता. तो धुरंधर होता, तसाच धोरणीहि होता. अवघ्या सात वर्षांत त्याने गनिमांना चौफेर



विजयस्तंभ–चितोडगड

चोपून काढलें. सगळा राजस्थान आपल्या अधिसत्तेखाली आणला. राजस्थ ानच्य आभाळांत तो जणू मध्यान्हींचा सूर्यच तळपला. त्याने एक बाजूने गुजरातच्या सुलतानांना पळायला लावलें आणि दुसऱ्या बाजूने मा ळव्याच सुलतान मोहम्मदशहा याला चितोड अन् मंदसौर या दोन शहरांच्या मध्ये

गांठून त्याची गठडी वळली. तो सुलतान सहा महिने गडावर राणा कुंभाचा कैदी होता. ”

अशा त्या दुहेरी विजयाचें स्मारक म्हणून राणा कुंभाने हा जयस्तंभ उभारला. हा १२० फूट उंच आहे. ४५ फूट समचौकोन चौथऱ्यावर तो उभा आहे. याला एकूण ९ मजले आहेत. सर्वांत वरचा मजला १७ फूट, तर सर्वांत खालचा ३२ फूट आहे. वरपर्यंत जायचें तर १५० पायऱ्या आक्रमाव्या लागतात. १० वर्षें याच्या उभारणीचें काम चालू होतें. याच्यासाठी झालेला खर्च लाखाच्या घरांत आहे. याच्या स्थापत्यांतलें एक वैशिष्ट्य म्हणजे हा कुतुबमिनारसारखा वाटोळा नसून चतुष्कोण आहे. शिवाय तो सिंहकटि आहे. खाली, वर आकार सारखा पण मधले एक दोन मजले थोडे कमी रुंदीचे. जणू ऋग्वेदांतला पिपीलिक मध्यछंदच ! त्याच्या भिंतीवर सगळे पौराणिक देव आपापले चौके मांडून बसले आहेत. अनेक पुराणकथा उत्कीर्ण झाल्या आहेत. प्रत्येक मूर्तीच्या खाली तिचें नांवहि कोरलेलें आहे. त्यावरून हिंदूंच्या पौराणिक देवतांचें मूर्तिविज्ञान कळायला पुष्कळच मदत होण्याजोगी आहे. शेकडो देवमूर्तींचा हा अन्यत्र दुर्लभ असा इथला थाट पाहून भारताच्या पुरातत्त्वखात्याला वाटलें, की या सर्व मूर्तींचीं छायाचित्रें घेऊन त्यांचा एक ग्रंथ प्रकाशित करावा. पण प्रत्यक्ष त्या कामाला लागल्यानंतर त्यांना कळून आलें, की या सर्व मूर्तींचीं छायाचित्रें घेणें कठीण आहे. आता असें ऐकलें आहे, की चित्रकारांकडून त्यांचीं चित्रें काढून घ्यायचीं आणि वर्णनासह तीं प्रसिद्ध करायचीं, असा कांहीतरी पुरातत्त्वखात्याचा विचार आहे. तीहि गोष्ट कांही कमी महत्त्वाची ठरणार नाही. भारतीय मूर्तिकलेचें पारंपरिक आणि सांकेतिक ज्ञान त्यावरून मिळूं शकेल.

## सती पद्मिनी

सती पद्मिनी ही चितोडगडाची ऐतिहासिक अधिदेवता. तिच्यासाठी केवढें रामायण घडलें तिथे ! ती त्या काळची सौंदर्यसम्राज्ञी होती. तिच्या लावण्यकीर्तीचा सुगंध दशदिशांना परमळत होता. दिल्लीच्या तख्तावर आरूढ झालेल्या अल्लाउद्दीन खिलजीच्या नाकापर्यंत तो सुगंध पोंचायला उशीर लागला नाही. पद्मिनीचें सुवासिक सौंदर्यपुष्प चितोडच्या रुक्ष भूमींत करपूं

देण्यापेक्षा ते आपल्या दिल्लीच्या राजप्रासादांत आणून खुलवावें, अशा आकांक्षेने जिभल्या चाटीत त्याने चितोडवर धाड घातली, असें इतिहास सांगतो.

त्याच पद्मिनीच्या महालाकडे आम्ही आता चाललों होतों. कांही दालनें आणि देवड्या ओलांडून आम्ही एका दिवाणखान्यांत येऊन उभे राहिलों. तो 'मर्दाना महाल' होता. त्याला लागूनच खाली तलाव होता आणि त्या तलावांत पद्मिनीचें जलमंदिर उभें होतें. एक छोटीशी नाव तिथे पायऱ्यांजवळ डहुळत होती. त्यावरून कळलें, की पद्मिनीच्या महालांत पाय ठेवायला नौकेचा आश्रय लागतो. आम्ही उभे होतों, त्याच्या मागे दरवाजाच्या वरच्या भिंतीवर एक उभा आरसा टांगलेला होता. आमच्या आधी तिथे दुसरे कोणी प्रवासी येऊन उभे राहिले होते. त्यांनाहि एक स्थलदर्शक भेटलाच होता. तो त्यांना समजावून सांगत होता—

"जलमंदिराची ती बाहेरची ओटी आहे ना, तिच्या पायरीवर पद्मिनी येऊन उभी राहिली आणि हा पाठीमागे आरसा दिसतो ना, त्यांत अल्लाउद्दीनाने तिचं प्रतिबिंब पाहिलं.

त्या लोकांची पाठ वळली मात्र, आमचा मार्गदर्शक मदनलाल कपाळावर तिरस्काराची एक आठी चढवून पटकन् बोलून गेला—

"मूर्ख आहे लेकाचा! त्याला इतिहासाचें काय माहीत आहे!"

मी म्हटलें, "कां हो?"

मी सांगतो तुम्हांला. "अल्लाउद्दीनाला पद्मिनीचं प्रतिबिंब कुठलं, नखहि दिसलं नाही. तिच्याकडे सुरेख, गोऱ्यागोमट्या दासी काय कमी असतील पद्मिनीदेवीनं तिच्यांतलीच एखादी खुपसूरत बटीक राजलेणीं लेवून दारांत उभी केली असेल! अन् आपण पद्मिनी पाहिली या आनंदांत तो 'उल्लूका पठ्ठा' अल्लाउद्दीन मपगुल झाला असेल."

मी त्याला म्हटलें, "मदनलाल तुमचं हें मत विचार करण्याजोगं आहे खरं!"

"अहो पिढ्यान् पिढ्या आम्ही इथले राजपुरोहित! तशी घटना घडली असती, तर ती परंपरेनं आमच्यापर्यंत चालत आली नसती का!"

" तेंहि खरं आहे ! "

" आता चला सतीस्थानाकडे ! ' तो म्हणाला.

थोड्याच वेळांत आम्ही एका तलावाच्या कांठीं जाऊन उभे राहिलों. या तलावाचें नांव भीमलत्ता कुंड. भीमाने लाथ मारून इथलें पाताळपाणी वर काढलें म्हणे ! तिथेच एक शिवमंदिर आहे. त्याच्या वरच्या अंगाला एका ओळींत कितीतरी दगडी चौथरे आहेत. पद्मिनी आणि इतर स्त्रिया यांनी केलेल्या जोहाराचीं तीं स्मारकें आहेत.

इ. स. १३०३ सालची गोष्ट ! अल्लाउद्दिनने गडाला वेढा घातला, त्याला सहा महिने लोटून गेले होते. त्याच्याशी लढतां लढतां राणा लक्ष्मणसिंहाच्या साती पुत्रांनी ' हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं ' हा भगवान् श्रीकृष्णाचा उपदेश उरांत सांठवून अल्लाउद्दिनाला सामना दिला होता. अंतीं ते सगळे वीरगतीला गेले होते. वृद्ध लक्ष्मणसिंह निपुत्रिक होऊन मागे उरला. पण त्यानेहि नंतर निर्वाणीच्या युद्धाची तयारी केली. आपल्याला विजय मिळणार नाही, हें त्याला कळून चुकलें होतें. पण मुसलमानांच्या पारतंत्र्यांत कुजून मरण्यापेक्षा लढून मरावें, असें त्याने ठरविलें. गडावरचे सारे सैनिकहि त्या आत्मघाती युद्धाला सज्ज झाले.


हें सगळें झालें खरें, पण त्यापूर्वी त्यांना आणखी एक दिव्य करायला हवें होतें. ते तर मारितां मारितां मरणारच होते; पण मग गडावरच्या त्यांच्या मायबहिणींची, त्यांच्या पत्नी–पुत्रींची वाट काय ? त्या तरी जगून काय करणार होत्या ! पुरुष जाऊन त्या मागे राहिल्या असत्या, तर त्यांच्या विटंबनेला पारावारच उरणार नव्हता.

पण पुरुषांच्या मनांत हा विचार येण्यापूर्वीच सती पद्मिनीच्या मनांत तो आला. तिने स्वतः होऊन आपल्या सतीत्वरक्षणासाठी अग्निदिव्य करायचें ठरविलें. पद्मिनीचा तो विचार गडावरच्या सर्वच स्त्रियांनी ' आपला ' म्हटला आणि क्षणाचाहि विलंब न लावतां त्या आपल्या पुढल्या मार्गाला लागल्या.

लगोलग त्या सर्वजणी एकत्र जमल्या. कोणी आपल्या तान्हुल्यांना शेवटचें पाजून आल्या, कोणी भरल्या डोळ्यांनी आपल्या पतींचा निरोप घेऊन आल्या. त्यांनी भीमलत्ता कुंडांत स्नान केलें. आपला ' सकळै शृंगार ' केला.

जवळच्या शिवमंदिरात जाऊन त्यांनी त्या शिवशंकराचें दर्शन घेतलें. मग त्या सगळ्या जवळच्या तळघरांत जाऊन बसल्या. सर्वजणींच्या मध्यभागीं ती चितोडची स्वामिनी पद्मिनी! तिने आपल्या भोवती जणू तें दिव्य सहस्रदल पद्मच बनविलें. मग त्या सर्व सती साध्वी एका सुरांत मंगलगीतें गाऊं लागल्या. त्यांचें आता मंगलच व्हायचें होतें. मंगलमय परमात्म्याच्या दिव्य लोकांत त्या आता लीलाविहार करायलाच जाणार होत्या.

त्यांच्या पति-पुत्रांनी मग त्या तळघरांत चहूंबाजूंनी ज्वालाग्राही पदार्थ भरले आणि त्या तळघराला अग्नि लावला. त्या वेळीं त्या पुरुषांचा हात कांपला असेल का? त्यांच्या छातींत धडधडलें असेल का? त्या रणमर्दांच्या नेत्रांत एक तरी अश्रूचा थेंब जमला असेल का? कोण सांगणार? तिथल्या त्या दगडगोट्यांना वाचा असती तर त्यांनीं सांगितलें असतें.



जोहाराचें स्थान-चितोडगड

तळघराला अग्नि लागतांच एकलिंगजीचा जयघोष प्रचंडपणें उठावला. त्या जयघोषांत त्या जळत्या नाजूक फुलांचा चीत्कारहि मग कोणाला ऐकूं आला नाही. अग्निनारायणाने त्या सर्व पतिव्रतांच्या शील-चारित्र्याभोवती आपल्या ज्वाळांचें कडें केलें आणि त्यांचे पुण्यपावन आत्मे सरळ स्वर्गलोकीं धाडून दिले.

मग थोड्याच वेळांत अल्लाउद्दिनावर तुटून पडलेले राजपूत वीरहि धारातीर्थी पडून स्वर्गवासी झाले. अल्लाउद्दिन चितोडगड काबीज करून वर आला. तो पद्मिनीच्या अभिलाषेने आला होता. पण गडावर शिल्लक होतेंच काय! तिथे तर सारा स्वाहाकार होऊन गेला होता. गडावरचें कुत्रेंसुद्धा यवनांच्या गुलामगिरींत राहायला तयार नव्हतें. तिथे कुठे चैतन्याचा उच्छ्वासच शिल्लक उरला नव्हता. सारें कांही बेचिराख अन् उजाड! सारें शांत शांत! धुंद होऊन वर आलेल्या अल्लाउद्दिनाने कपाळावर हात मारून घेतला. त्या यवन सुलतानाचा तो विजय नव्हता. त्याच्या काळजावर बसलेला तो चिरंतन जळता डाग होता.

"चितोडच्या इतिहासांतला हा पहिला 'शाका' अन् पहिला जोहार म्हणून सर्वत्र महशूर आहे." आमचा मार्गदर्शक म्हणाला.

"मग आणखी एखादा असा शाका आहे की काय?" मी विचारलें.

"होय; आहे तर! हा शाका राणी कर्मवतीच्या प्रसंगाचा."

बोलत बोलत त्याने आम्हांला आणखी थोडें चालविलें अन् एका मोकळ्या समतळ जागीं आणून उभे केलें. त्या जागेच्या भोवतीं कांही वृक्ष उभे होते अन् ते त्या स्थानावर सदैव छाया करीत होते. त्यावर पहारा ठेवीत होते.

१५३४ सालची गोष्ट. मेवाडच्या गादीवर विक्रमजित नांवाचा राणा बसला होता. तो चांगला शिकारी होता, पण चांगला राजा मात्र नव्हता. त्या बाबतींत त्याची सगळीच नालायकी शाबीत झाली होती. त्यामुळे राज्याचा बंदोबस्त ढिला झाला होता. मेवाडचे आधारस्तंभ असलेले सरदार, सेनापति त्याच्या उर्मटपणाला उबगून सरळ मुसलमानांना जाऊन मिळाले होते. ज्यांच्या देशद्रोहाची तिथवर मजल गेली नाही, ते 'तुष्यतु दुर्जनः' म्हणून आपापल्या जागीं स्वस्थ बसले होते.

नेमकी हीच संधि गुजरातच्या बहादुरशहाने साधली. आजवर मेवाडच्या राण्यांनी गुजरातच्या सुलतानांचा जो वारंवार पाडाव केला होता, जी वेळोवेळीं त्यांना खाली मान घालायला लावली होती, ते सारे हुतात्मे आणि प्रेमात्मे बहादुरशहाच्या काळजांत शिरून त्याला सूडाची प्रेरणा देत होते. त्या प्रेरणेला

अनुसरून बहादुरशहा होतें नव्हतें तेवढें बळ एकत्र करून चितोडवर धडकला होता.

त्या वेळीं लढून लढून अन् मरून मरून सारा मेवाडच दुर्बल झाला होता. शिवाय लोकांचीं मनें फुटलीं होतीं आणि जीव दुभंगले होते. गडावर शिबंदीहि फार थोडी होती. जी होती तिला अन्नसामुग्रीचीहि तूट होती. या सर्व गोष्टींची चिंता विक्रमजिताला लागण्याच्या आधी त्याची माता राणी कर्मवती हिला लागली. तिला स्पष्टपणें कळून चुकलें, की बहादुरशहा साऱ्या मेवाडचा सत्यानाश करायच्या निर्धाराने सरसावला आहे. त्यामुळे तिचा जीव थाऱ्यावर राहिला नाही. तिने मग मेवाडच्या समस्त सरदारांना उद्देशून हृदय पिळवटून टाकणारें एक पत्र लिहिलें —

"मेवाडचे सुपुत्र हो अन् सरदार हो! माझा पोरगा अन् तुमचा धनी विक्रमाजित नालायक निपजला हें देशाचें दुर्भाग्य! पण मी तुम्हांला विचारतें, राज्य कोणाचें? त्याचें का तुमचें? चितोड पडलें, तर त्याबरोबरच तुम्हा साऱ्या राजपुतांची धवल यशःपताका खाली पडून मातींत मिळणार आहे. शत्रु समुद्रासारखा चहूंबाजूंनी खवळून आला आहे. चितोडची नौका या वादळांत तारायची का बुडूं द्यायची, हें आता तुम्हीच ठरवा. मी या गडाच्या किल्ल्या तुमच्या स्वाधीन करून मोकळी होतें."

त्या पत्राचा योग्य तो परिणाम झाला. त्यायोगें सगळे रजपूत सरदार मागचें सगळें विसरून देश आणि धर्म यांच्या अभिमानाने धगधगून एकवटले. त्यांनी साऱ्या सामर्थ्यानिशी चितोड लढवायचें ठरविलें. पण...पण ती पतंगांनी प्रखर दिव्यावर घातलेली झडप होती. त्यांत दिवा विझणार नव्हता, तर पतंगच पंख होरपळून गतप्राण होणार होते.

कर्मवती एवढेंच करून थांबली नाही. तिने दिल्लीपति हुमायूँ याला एक धर्मभगिनी या नात्याने राखी पाठवली. 'द्रौपदीच्या लज्जारक्षणासाठी द्वारकेचा कृष्णबंधु धावून आला तसा तूं माझ्या परित्राणासाठीं ये,' म्हणून त्याला आर्त विनवणी धाडली. पण तिथेंहि कर्मवतीचें दुर्दैव पाठलाग करीत गेलें. हुमायूँ दिल्लींतच नव्हता. तो गेला होता दुसऱ्या कुठल्या तरी मोहिमेवर.

इकडे बहादूरशहाचा तोफखाना गोळे ओकूं लागला. गडाला प्रचंड भगदाड पडलें. तिथला प्रतिकारहि कोसळला. सगळीकडूनच आकाश फाटलें. राजपूत वीर असे धारातीर्थी पतन पावल्यावर मागे उरणाऱ्या राजपूतींच्या अब्रूची शाश्वती नव्हती. अशा अवस्थेंत त्यांना मृत्यु स्वागतार्ह वाटला. तो त्यांचें शील अधिक उज्ज्वल करून त्यांना देवयान मार्ग खुला करून देणार होता. महासाध्वी पद्मिनीने घालून दिलेला धडा त्या विसरल्या नव्हत्या. तिच्याच मार्गाने मग त्यांनीहि जायचें ठरविलें. कर्मवतीने त्या दिव्याचा पुढाकार घेतला. ती मळवट भरून अग्निनारायणाची प्रार्थना करीत या जागीं बसली. लगोलग तिच्या सांगातिणी, सरदारिणी, लेकीसुना, दासी-बटकी, साऱ्या तिच्याभोवती गोळा होऊन बसल्या. जोहार करणाऱ्या या स्त्रियांची संख्या तेरा हजार होती, असें इतिहास ठासून सांगतो. त्या सुवासिनींचा असा थाट मांडल्यावर पुरुषांनी आवती भोवती ज्वालाग्राही पदार्थांचे डोंगर रचले आणि सूर मल्लाचा पुत्र बाघजी याने ' जय एकलिंगजी ' म्हणून त्या स्थानाला अग्नि लावला. चहूंबाजूंनी आगीचे लोळ गगनाला भिडले अन् मग त्या मांगल्यमूर्ती सुवासिनींचें नखहि कोणाला दिसलें नाही.


कर्मवतीचा सांगावा मिळतांच हुमायूँ माळव्याच्या मार्गें आपल्या धर्मभगिनीच्या रक्षणार्थ निघाला होता. पण तो चितोडला पोंचण्याच्या आंतच तिथला सगळा कारभार आटपला. त्याने गुडघे टेकून त्या चितास्थानावर दोन अश्रु ढाळले. पण तेवढ्याने ती धुमसती चिता विझण्याजोगी नव्हती.

हें सारें मी वाचलें होतें आणि व्याख्यानांतून, कीर्तनांतून कानभर ऐकलें होतें. पण इतर ठिकाणचें वाचणें ऐकणें अन् समक्ष त्या स्थानावर, त्या भूमीवर प्रत्यक्ष उभा राहून तें ऐकणें, यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें. तिथे त्या प्रत्येक शब्दाला अर्थांचे एकांतून एक धुमारे फुटत होते. त्यामुळे माझे प्राण थोडा वेळ गोठल्यागत झाले. कांही क्षणांनी मी त्या मदनलालला म्हटलें,

" शर्माजी, इस जौहर की कुछ गवाही ? "

तो म्हणाला, " हां हां ! या माझ्याबरोबर. " त्याने मला पंधरावीस पावलें पुढे नेलें. तिथें एक पुरुषभर खोलीचा खड्डा होता. त्यानें मला त्या खड्ड्यांत

उतरायला सांगितलें. मी उतरलों अन् पाहिलें. वरच्या हातभर मातीच्या थराखालीं सारी राखच राख होती. मातींत मिसळून तिलाहि स्वतःचा रंग



राणा प्रतापचें जन्मस्थान—चितोडगड

देणारी ती राख! मी हलकेच हात घातला. ती पवित्र रक्षा थोडी उचलली. ती कपाळाला लावतांना माझें सर्वांग शहारून उठलें. भारतीय साध्वींच्या कोवळ्या प्राणांची ती विभूति होती. ज्या सतीत्वाचा डंका इतिहासपुराणांनी वाजविला, त्या दिव्य नैतिक मूल्यांचें तें सहस्रपुटी भस्म होतें. नास्तिकाला आस्तिक, अश्रद्धाला सश्रद्ध, अन् पाप्याला पुनीत करण्याचें सामर्थ्य त्या भस्मांत होतें. त्या विभूतीने मला क्षणभर डोळे मिटून कांही तरी चिंतायला लावलें. हरिद्वारची गंगा आणावी, त्याहूनहि अधिक आदराने मी त्या राखेची लहानशी पुडी बांधून खिशांत घालून आणली.

तिथून थोड्याच अंतरावरचा तो समिद्धेश्वर महादेव! समिद्ध म्हणजे पेटलेला. त्याचें तें नांव तिथे मला सार्थ वाटलें. योगाग्नीने आपली काय

दग्ध करणाऱ्या सतीचा तो भस्मीभूत देह खांद्यावर टाकून भोळा सांब भारतभर वेड्यासारखा भटकला होता. मग ती पद्मिनी, ती कर्मवती, त्या सहस्रावधि राजपुती, जितेपणीं पेटत असलेल्या पाहून तो सश्मिमेद्धिरहि तसाच पेटला असेल. मी त्याचें दर्शन घेऊन मनोमन त्याला म्हटलें,

"देवा, शूलपाणे, तूं स्मशानवासी उदास जोगी! चिताभस्माचा आलेप हें तुझें आवडतें प्रसाधन! तूं खरोखरच इथे एका पवित्र महास्मशानांतच बसला आहेस. इथे तुला युगानुयुगें चिताभस्मांची वाण पडणार नाहीं!"



७३८६७

REFBK-0013667

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38270 वि: भूप्रवास
क्रमांक 332 नों: दि: 9/8/68